म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ख्या. वा
दा. क्र. 23608

IRBK-0102374

IRBK-0102374

म. ग्रं. सं. वा
विषय
क्र.

हा. कृ.- २३५४.

२३५४

# नव्या भारताचे नवे नेते

( राजकीय जीवनकथा )

## राहुल सांकृत्यायन

राज्य ग्रंथ संग्रहालय
22836
विभाग ... बा.वा.
क्रमांक ... 9092
नों. दि. 3/3/41

अनुवादक

**दा. कृ. पैठणकर**

IRBK-0102374

प्रकाशकः—
शं. वा. कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथभांडार मुंबई, ४.

( सर्व हक्क राहुल सांकृत्यायन यांचे स्वाधीन )

जुलै १९४६

किंमत २॥ रुपये

मुद्रक—ज. ग. जोशी,
जनार्दन सदाशिव लि. चा प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २

# अर्पणपत्रिका

★

समाजसत्तावादी विचारसरणीनें
नवे भारत निर्माण करणाऱ्या
कार्यतत्पर तरुणांस—

# अनुक्रमणिका

## राजकीय जीवन कथा

१ सय्यद जमालद्दीन बुखारी
२ महमंद शाहीद
३ " काश्मीरचा वाघ "
४ कॉ. युसूफ
५ बाबा सोहनसिंह भाकना
६ अजय घोष
७ गोपेन्द्र चक्रवर्ती

अनुक्रम ९८८३
विभाग वी·वा·
क्रमांक १०१२
नों. दि ३१/३/४९

# सय्यद जमालुद्दीन बुखारी



असल्या विचित्र व्यक्ती तुम्हांला क्वचितच बघायला मिळतील! हीं माणसं प्रवासांत चुटकीसरशी तुमचे मित्र बनतील. अन् थोड्या वेळांत मित्रप्रेमाच्या आनंदाची चुणूक दाखवतील. पण अशा लोकां-पासून जरा सावधही रहायला हवं. कारण एखाद्या कामांत ते साथ देतील किंवा एखाद्या गंभीर ध्येयावर दृढ विश्वासानं उभे राहतील अशी यांच्यापासून अपेक्षा नसते. पण 'बुखारी' या नियमाला अपवाद राहिला. त्याच्यांत या दोन्ही गोष्टींचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणांत आहे. त्यानं व्यवसायही केला अन् थोड्याच दिवसांत खोऱ्यांनीं पैसा कमवला. पण पैसे जमवून ठेवणं तो शिकला नाहीं अन् असलं ऐषआरामाचं आयुष्य त्याला पसंतही पडलं नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी तो आपल्या ध्येयाचा प्रचार करी तेव्हां देशभक्तांना शंका वाटे, हा सरकारचा माणूस असावा; अन् पोलिसांना वाटे, याच्या डोक्यांत कांहींतरी फितुरी आहे. पण कामगार जीवनाशीं समरस होणं त्याला साधलं. त्यानं जहाजांत खलाशाची नोकरी पत्करून कामगाराचं जीवन अनुभवलं आहे.

सय्यद बुखारीचा जन्म १४ जुलै १९०२ मध्यें अहमदाबादच्या सैय्यदवाडा विभागांत झाला. बुखारीचा वंश गुरू घराण्यांतल्या कुटुंबांत मोडला जातो. तो जातीनं शिया असूनही त्याचे सुन्नी जातीचे चेले जास्त आहेत. प्राचीन गुजराथी बादशहांच्या वेळेसही या वंशांतले लोक दरबारी गुरू होते. सय्यदवाडा विभागांतले सय्यद

बुखारांतून आले नि त्यांनीं मुलतान जिल्ह्यांत वस्ती केली. नंतर तेथून ऐशीं नव्वद वर्षांआधीं अहमदाबादेंत येऊन स्थायिक बनले.

बुखारींचे वडील जैतूल आबदीन, फारशी व अरबी भाषेचे पंडीत होते. ते इंग्रजी व संस्कृत भाषाही शिकले होते. सुफीवाद अन् वेदान्त यांवर त्यांचं प्रभुत्व होतं. पण धार्मिक बाबतींत म्हणावे तसे कर्मठ नव्हते. त्यांना एक जहागीरही होती. आणि एका शाळेंत ते फारशी भाषेचे शिक्षक होते.

बुखारीची आई शरिफुन्निसा, बुखारी दोन वर्षांचा असतांना वारली. तो पांच वर्षांचा होईपर्यंत त्याचं पालनपोषण त्याच्या आतेनं केलं. त्याची आत्या त्या जुन्या काळांतील सुशिक्षित महिलांपैकीं एक होती. आपल्या भाच्यावर तिचं प्रेम होतं. ती त्याला रीतीभाती शिकवीत असे. आपल्या वंशांतल्या महान् व्यक्तींच्या गोष्टी त्यानं तिच्या तोंडूनच ऐकल्या होत्या. मोठमोठे राक्षस व भुतं, जीं कुणाला आवरतां येत नसत तीं, या सैय्यद लोकांना बघतांच पळत असत. अशा भुताखेतांच्या गोष्टी त्यानं आत्याकडून ऐकल्या. आपल्या मुलाला भुताखेतांपासून वांचविण्याकरितां आत्यानं त्याच्याकडून कुराणामधले कांहीं मंत्रही पाठ करून घेतले. गुजराथ प्रांतांत तो रहात असूनही बुखारीच्या घरांत उर्दू भाषा बोलली जात असे. नोकर लोकही उर्दू भाषाच बोलत. त्यामुळें बरेच दिवस त्याला गुजराथी भाषा माहीत नव्हती. त्याचे नोकर त्याला राजाराणींच्या गोष्टी ऐकवीत. आणि, लहानपणापासूनच सर्वांनीं " तूं मोठा आहेस अन् बाकीचे लहान आहेत " असा त्याचा समज करून दिला होता.

लहानपणीं त्याला खेळण्याचा भारी नाद असे. खेळांत हुतूतू, आट्यापाट्या, झाडावर चढणं वगैरे त्याला आवडे. त्यानं गुपचूप नजरा चुकवून पोहणंही शिकून घेतलं होतं. त्याला बाहेर खेळायला

जाण्याची मनाई असे, पण त्याला राहवत नसे. घरीं खऱ्या गोष्टी सांगितल्या तर चार अपशब्द कानांवर पडत. वडील तर फारच गरीब स्वभावाचे होते. मुलावर ते नियंत्रण ठेवित नसत. पण आत्या अन् काकी मुलाच्या अशा वर्तनाला वाह्यात् समजत.

वयाच्या पांचव्या वर्षीं बुखारीनं मौलवीजवळ अरबी धुळाक्षरं शिकायला सुरवात केली. त्या पहिल्या दिवशीं नातेवाईकांकडून मुलाला बऱ्याचशा भेटी आल्या. घरीं तो आत्या पित्याजवळ फारशी शिके. अशा रीतीनं दोन वर्षं तो घरींच शिकला. त्या वेळेस त्याला आपली जात शिया आहे हें कळलं. पण सुन्नी चेल्यांना भेदभाव वाटूं नये म्हणून त्याला सावध रहावं लागे. संन्यासी व वेदांत्याकडे जातांना त्याचे वडील त्याला बरोबर घेऊन जात. भाट त्याच्या वंशाची प्रशंसा करीत. पूर्वजांपासून तों अद्यावत् वंशाची कारकीर्द ते म्हणून दाखवीत. त्याला हा काव्यप्रकार आवडे. लहानपणीं तो फार हट्टी स्वभावाचा होता.

वयाच्या सातव्या वर्षीं खानदानी नियमाप्रमाणं जमालुद्दीननं पहिल्यांदा रोजा पाळला अन् नमाज पढला. नातेवाईकांकडून याही वेळेस भेटीदाखल मिठाई मिळाली.

वडील धर्मगुरू होते. तरी पण इंग्रजांच्या गुणांची त्यांना पारख होती. त्यांच्या घराजवळ एका ख्रिश्चन बाईनं लहान मुलांमुलींकरितां वर्ग उघडला होता. तिथं सैय्यदाचीं चार मुलं अन् चार मुली शिकत होत्या. वडील जमालुद्दीनलाही त्या बाईकडे शिकायला पाठवीत. बाई मुलांना इंग्रजींत कहाण्या, इतिहास, भूगोल शिकवी व बोलतां बोलतां येशू ख्रिस्ताबद्दल एक दोन गोष्टीही सांगून टाकी. जमालुद्दीननं ऐकलं होतं कीं, येशू ख्रिस्तसुद्धां महंमदसारखा ईश्वरानं पाठविलेला पैगंबर आहे. मग तो तिच्या गोष्टी ऐकून चिडेल

कशाला? ती मेम त्यांना हिशेब अन् ड्रॉइंगही शिकवी. त्याची स्मरणशक्ति चांगली होती पण त्याला गणित आवडत नसे. त्याला गाणं ऐकण्याचा नाद असे. त्याच्या खानदानी महात्म्याच्या समाधी-वर धर्मार्थ नाचण्याकरितां कलावंतिणी येत. त्या वेळेस जमालुद्दीनही आपल्या काकाबरोबर त्यांचा नाच अन् गाणं ऐकायला जाई. हिंदु-वस्तींत रामलीला, कंसवध वगैरेचीं सोंगं घेतलीं जात, तीं पाहण्या-करितां तो जाई. डफ आणि बांसरी वाजविण्याचा त्याला नाद होता.

तो मोठ्या कुतूहलानं चेला होण्याचा समारंभ बघे. ज्या फकि-राला इच्छा होई तो त्याच्या खानदानी गुरू ( बुखारी परिवारा ) कडे शरिरावर मुद्रा लावून घेण्याकरितां येई. मुद्रा लावण्याकरितां अगोदर कागदाचा किंवा कापसाचा बोळा मांसल भागावर ठेवून तो तिथंच जाळला जाई. मग साहजिकच तिथं जळकी जखम होऊन नेहमी-करितां तो डाग कोरला जाई. अशा रीतीनं तो साधू आपलं पाप धुवून टाकून त्यांचा चेला बनत असे. बुखारीला या गोष्टी आवडत नव्हत्या. पण कलंदरी साधू, पिराचं गीत गात, नगाऱ्याच्या तालावर धम्मार नाच नाचत, त्या वेळेस बुखारीला तें पाहण्यांत आनंद होई. अहमदाबादला "पीर कुत्बे-आलम" नांवाची बुखारी वंशांतल्या एका गुरूची ही कबर आहे. या कबरीजवळच्या दरग्यांत कितीतरी साधू येऊन रहात असत. त्या कबरीला सात प्रदक्षिणा घातल्या कीं, हजार पुण्याचा लाभ होतो असा समज होता. तिथं मुक्काम ठोक-णाऱ्या साधूंकडे बुखारी नेहमीं जाई.

आतांपर्यंत कुटुंबाची आर्थिक परिस्थिति फार चांगली होती. वडील सुखवस्तु व उदार स्वभावाचे होते. बुखारीला आठवतं, तो चार पांच वर्षांचा असतांना त्याचे चुलते कुटुंबांतून विभक्त होऊं लागले. मुसलमानांच्या वारसा नियमाप्रमाणं कुटुंबावर मुलींचाही

हक्क असतो. वडिलानं बहिणीला इस्टेटीचा जास्त वांटा देण्याचा विचार केला. पण चुलत्याला ही गोष्ट पसंत नव्हती. बुखारीही बापासारखाच उदार होता. चुलता म्हणत असे, " तूं एक बादशाहा व्हायला पाहिजे होतं किंवा साधू फकीर ! " पण नवव्या वर्षीं घरावर संकट ओढवूं लागलं. बँकेंत ठेवलेली रक्कम बुडाली. आतां गांवची जहागीर हीच एक मिळकत होती. जहागिरीच्या गांवांतून गवत अन् बाभळीचं उत्पन्न येतं. आणि राहिलेल्या थोड्याशा शे दोनशें एकरांत शेती होई.

लहानपणीं बुखारीनं आपल्या वर्गमैत्रिणीवर ओव्या लिहायला सुरवात केली. १९१२ च्या सुमारास मेम अजमीरला जात होती. बुखारी तिच्याबरोबर सहा महिने अजमीरला राहिला. अबूच्या पर्वतावरील निसर्गशोभा त्याला फार आवडली.

लहानपणीं तो एकदां आपल्या जहागिरीच्या गांवीं गेला होता. एका दुकानासमोरून जात असतां त्यानं बघितलं, एक चांभार दुकानाबाहेर बसून कपड्याचे पैसे देत आहे. त्यानं पैसे दुकानाच्या उंबरठ्यावर ठेवले. दुकानदार मारवाड्यानं बुखारीला पैशाला हात लावायला सांगितला. बुखारीनं हात लावला. पैशावरला चांभाराचा विटाळ गेला आणि मारवाड्यानं पैसे उचलले. त्यानं घरीं येतांच वडिलांना हा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनीं हिंदूच्या स्पृश्यता, अस्पृश्यता व जातीपातीच्या गोष्टी समजावून दिल्या. त्यांवर त्यांनीं आपलं मत दिलं, " हें सर्व चूक आहे. साऱ्या मनुष्यजातींत बंधुभाव असला पाहिजे असं मौलवी आणि पंडित म्हणत असतात. " वडील अधिकाऱ्याच्या आहारीं कधीं जात नसत. ते स्वतंत्र वृत्तीचे चाहते होते. आणि त्या वेळचे सर सय्यद अहमद व राजा राममोहनराय यांची ते प्रशंसा करीत.

बुखारी अहमदाबादच्या एका हाय स्कूलमध्यें सहा महिने शिकला. नंतर धंधुकाच्या शाळेंत त्याचे वडील फारशीचे शिक्षक होते, त्याच शाळेंत तोही शिकूं लागला. गुजराथी व हिंदी घेऊन तिथं तो मॅट्रिकपर्यंत शिकला.

बुखारीला घोड्यावर बसण्याचा नाद होता. एकदां तो घोड्यावरून पडला. एका नातेवाइकाकडे जाऊन त्यानं मलमपट्टी केली. त्यानं घरीं ही गोष्ट कळवली नाहीं. त्या वेळेस त्याची शरीरप्रकृति उत्तम होती. चांदण्या रात्रीं हॉकी खेळणं त्याला आवडत असे. तो पत्तेही खेळत असे. वडील त्याला एकदां म्हणाले, 'पत्ते खेळतां खेळतां जुव्वाही खेळूं लागशील.' पण मुलावर आपला वडिलकीचा हक्क त्याचे वडील गाजवीत नसत. बुखारीनं याचा भलताच फायदा घेतला. तो घरीं कधीं येतही नसे. वडिलांचं मुलाबद्दलचं मत वाईट झालं होतं. एकदां संध्याकाळीं वडील आजारी पडले. बुखारी फेरफटका मारायला गेला होता. तो अर्ध्या रात्रीं परतला. नोकरानं वडील आजारी असल्याचं सांगितलं. तो वडिलांच्या पलंगाजवळ उभा राहिला. वडिलांनीं नोकराजवळ पाणी मागितलं. पण बुखारी स्वतः पाणी घेऊन आला. तोंपर्यंत वडिलांना झोंपही लागली. तो तसाच हातांत पाण्याचा ग्लास घेऊन वडिलाजवळ सकाळपर्यंत उभा होता. जागे होतांच पित्यानं आपल्या मुलाला त्या तशा स्थितींत बघितलं. त्यांनीं त्याच्या डोक्यावर प्रेमळपणानं हात फिरविला. त्या वेळेस त्यांना कळलं कीं, वरून थिल्लर दिसणारा बुखारी आंतून गंभीर स्वभावाचा आहे.

आतां मुलाच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला. वडिलांनीं बुखारीला १९१६ त अलिगढ विद्यापीठांत पाठवून दिलं. तो तिथूनच १९१८ त सीनियर कॅंब्रिजची परिक्षा पास झाला, व इंटर आर्ट्सच्या

वर्गांत तो दाखल झाला. अर्थशास्त्र अन् इतिहास हे त्यानं विषय घेतले. तो १९२१ त बी. ए. झाला. अलिगढ हें मुसलमानांचं मोठं शिक्षणकेंद्र आहे. तिथं निरनिराळ्या भागांतून मुलं शिकण्याकरितां येतात. १९ व्या शतकांत मुसलमानांत राजकीय जाणीव उत्पन्न झाली. या जाणिवेनं पुष्कळदां इंग्रजांच्या विरुद्ध बंड उभारलं. हे लढावाले लोक "मुजाहिदीन" नांवानं ओळखले जाऊं लागले. त्यांच्यांतल्या कितीतरी लोकांनीं पळून जाऊन संयुक्त प्रांतांत स्वतंत्र जातीची वस्ती केली. सरहद्द हिंदुस्थानांतल्या मुजाहिदीन जातीचा एक मुलगा बुखारीचा वर्गमित्र होता. त्या मुलानं बुखारीच्या मनांत हिंदी स्वातंत्र्याचे विचार जागृत केले. पण त्या जाणिवेंत एकांगीपणा होता. त्यांत इस्लामवादावर आधारलेला ब्रिटिशांबद्दल विरोधभाव होता. जणूं काय हिंदुस्थानांत सारे मुसलमानच राहतात अन् स्वातंत्र्य उपभोगण्याची जबाबदारी फक्त मुसलमानांकडेच आहे. पण बुखारीच्या खोलींत टिळकांचा फोटो होता. गॅरिबॉल्डी व जोसेफ मॅझिनी या देशभक्तांचीं चरित्रं तो वाचीत होता. १९१९ त एकदां वडिलांकडून त्यानं बोल्शेविक अन् रशियन क्रान्तीच्या गोष्टी ऐकल्या. व रशियाबद्दल त्याला आकर्षण वाटूं लागलं. सुफीवादी वेदांताच्या गोष्टी वडील त्याला सांगत असत. त्यावरून मनुष्य मात्राच्या समानतेचे विचारप्रवाह त्याच्या डोक्यांत शिरूं लागले. कॉलेजमध्यें असतांना मार्क्सच्या आर्थिक सिद्धान्ताबद्दलही त्यानं कांहीं गोष्टी ऐकल्या होत्या. घरचे पीर मुरीद ( गुरू-चेले ) हे आतां तो ढोंग समजूं लागला. ईश्वरावरील भरंवसा उडून गेला. रोज नमाजला हरताळ फासला गेला. त्याचे अलिगढ कॉलेजांतील दिवस आनंदांत जात होते. तो गप्पा ठोकण्यांत अन् मित्रांना आनंदी ठेवण्यांत प्रवीण होता.

**चमरकंद आणि बुखारीची यात्राः**—त्याच्या राजकीय भावना अनावर झाल्या होत्या. इकडे असहकारिता अन् खिलाफतच्या चळवळींचा बुखारीच्या मनावर परिणाम होत होता. त्यानं विचार केला कीं, या गुलाम देशांत राहणं चांगलं नाहीं. दुसऱ्या देशांत जाण्याचा त्यानं विचार केला. खिलाफत चळवळींत ब्रिटिश राज्यकर्त्यांना हाकून लावण्याच्या गोष्टी सुरू केल्या होत्या. कधीं त्याला वाटे, आपला देश सोडून जाणं दुबळेपणा आहे. तर दुसरा त्यानं असा विचार केला कीं, बाहेरच्या देशांत जाऊन स्वातंत्र्य मिळविण्याचं शिक्षण घेऊं अन् मित्रापाशीं त्यानं विचारविनिमय केला. काबुलच्या सीमेपाशीं राहणाऱ्या चमरकन्दमधल्या मुजाहिदीन लोकांत आपण मैत्री जोडूं असा त्यानं ठाम विचार केला. त्याच्या मित्रानं त्याला जाण्याचा रस्ता दाखविला व तेथल्या ओळखीकरितां पत्रं लिहून दिलीं.

बुखारी अलिगढहून अहमदाबादला आला. घरून पैसा घेतला. दिल्लीहून पेशावरला गेला. तिथं एका ओळखीच्या मुजाहिदीन माणसाला भेटला. त्यानं बुखारीला पठाणाचा वेष देऊन चारपांच दिवसांत एका गाढवाच्या काफिल्याबरोबर चमरकन्दला पाठविण्याची व्यवस्था केली. या वेळेस हिंदुस्थानांतून पासपोर्ट घेण्याचे नियम इतके कडक नव्हते. आणि सरहद्दींवरही फारशी टेहळणी होत नव्हती.

बुखारी दोन दिवसांत चमरकन्दला पोहोंचला. तिथल्या लोकांवर मुजाहिदीनांचं बरंच वजन होतं. चमरकन्द शंभर घरांचं गांव आहे. त्यांत. १५—२० घरं मुजाहिदीनांचीं आहेत. मुजाहिदीन मौलवी, इंग्रजाविरुद्ध लोकांना भडकवित असतात. पण हिंदी स्वातंत्र्य अशा रीतीनं मिळेल हें बुखारीला समजलं नाहीं. एवढं मात्र खरं

कीं, लोकांना इंग्रजांविरुद्ध भडकविण्यानं मौलवींचा दरारा राही व त्यांना लोकांकडून भेटी व नजराणे मिळत.

या उन्हाळ्या दिवसांत तो महिनाभर चमरकन्द इथं राहिला. इथले पहाड इतके रुक्ष नाहींत. गावांपासून दूर एक सरोवर आहे. बायका तिथून पाणी आणतात. पडद्याची चाल तिथं कमी प्रमाणांत आढळून येते. शेती आणि मालाची नेआण करणं ही लोकांची मेहनत आहे. लोक मनमिळाऊ होते. पण महिन्यानंतर बुखारीचं मन उडून गेलं. तो तिथं स्वातंत्र्याचं शिक्षण घ्यायला आला होता. पण तिथं त्याला बळजबरीनं नमाज पढावा लागे. मुजाहिदीन लोक रशियाच्या सीमेजवळ रहात. त्यांनीं रशियन क्रान्तीच्या गोष्टी ऐकल्या होत्या. पण त्या गोष्टी त्यांना आवडत नसत बोल्शेविक ईश्वराला मानीत नाहींत वगैरेसारख्या त्यांच्या निंदा बुखारीला प्रशंसेसारख्या वाटत. तो पुढं जाण्याकरितां तयार झाला.

**काबुलांत:—**बुखारी आपण स्वतः मुजाहिदीनवादी आहे असं सांगे. त्यानं आपला कार्यभाग साधून घेण्याकरितां काबुलहून पुढं जाण्याचा विचार केला. मुजाहिदीननं आपल्या इतर लोकांबरोबर त्याला पुढच्या प्रवासास रवाना केलं. चार दिवस पहाडांतून प्रवास करून तो नंतर काबुलला पोंचला. तिथं तो एका पंजाबी खोजा जातीच्या हिंदुस्थानी व्यापाऱ्याकडे उतरला. बुखारी काबुलांत १॥ महिना राहिला. अमानुल्लाच्या पुढारीपणाखालीं अफगाणिस्थान स्वतंत्र देश झाला होता. स्वातंत्र्यप्रिय अफगाण लोक भारतीय स्वातंत्र्याच्या गोष्टी मन लावून ऐकत असत. हिंदुस्थानांतून यात्रेच्या निमित्तानं बाहेर पडलेल्या बऱ्याचशा लोकांची त्याची तिथं भेट झाली. बुखारीला आतां कळलं, भारतीय स्वातंत्र्य लोकांनीं भारताबाहेर निघून मिळणार नाहीं. आणि दुसऱ्या देशाची भाडोत्री मदत

घेऊन तें मिळवणं तर शक्यच नाहीं. काबुलमध्यें त्याला बोल्शेविकाबद्दल बऱ्याचशा गोष्टी कळल्या. त्यांत जरी निंदा होती तरी पण त्याला एक गोष्ट कळली, तिथं कामगार शेतकऱ्याचं राज्य आहे. गरीब श्रीमंत भेद नाहीं. याशिवाय त्याला आणखीन् काय पाहिजे होतं ?

**मजारे शरीफ**:—बुखारीनं आपल्या मित्रापाशीं मुसलमानांच पवित्र क्षेत्र 'मजारे शरीफ'ला जाण्याची इच्छा बोलून दाखविली. मित्रापैकीं एकाचं तिथं चिनीमातीच्या सामानाचं दुकान होतं. त्यानं त्याला पाठविण्याची व्यवस्था केली. बुखारी गाढव व खेचरं बरोबर घेऊन तो हिंदुकूशकडे रवाना झाला. तिथं त्यानं बगीच्यांत कोहदामची टपोरीं पिवळीं पिवळीं द्राक्षें पाहिलीं अन् चाखलीं. त्याला वर चढतांना गारवा भासत होता पण उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळं तिथं बर्फ नव्हता. दोन्हीं बाजूला पहाडाच्या भिंती अन् मधून लहानशा पाऊल वाटेनं चालतांना मनासमोर निरनिराळी भीती उभी राही. प्रवासांत तो पुष्कळ थकूनही गेला. कांही वेळ पायीं व कांहीं वेळ खेचरावर बसून मार्ग आक्रमित शेवटीं तो मजारे शरीफला पोंचला. अगदीं उजाड अन् रेताड मैदानांत त्याला मजारे शरीफची वस्ती दिसली. त्या वस्तींत पिराच्या समाधी (मजार) च्या उंच इमारतीशिवाय बाकी कोणतंच दर्शनीय स्थळ दिसत नव्हतं. त्यानं हिंदुस्थानांत यांहीपेक्षां मोठमोठ्या मशिदी पाहिल्या होत्या. त्याला इथून रशिया व मध्य आशियांत जावंसं वाटूं लागलं. त्याचा सर्व पैसा इथं संपून गेला. फारशी भाषा येत असल्यामुळं त्याला अडचण भासली नाहीं. त्यानं नवीन मित्र केले. मध्य आशियाकडे जाण्यासाठीं मोर्चा वळविला.

अनुक्रम ... ६३
विभाग ... ता.
क्रमांक ... १२
ता. दि. ३१।३।६६

**तेर्मिज**:—मजारे शरीफहून एक प्रवाशांचा तांडा मध्य आशि-यांत जात होता. बुखारीही त्यांत सामील झाला. या तांड्यांत यात्रेकरितां निघालेले तीन चार बेरड लोकही होते. **ओमू नदी**-पर्यंत पायीं जाऊन नंतर नावेंतून तेर्मिजला पोहोंचला. तेर्मिजमध्यें पूर्वीं रहात असलेल्या श्रीमंतांचीं कितीतरी घरं त्याला पहावयाला मिळालीं. पण आतां त्यांची राज्यसत्ता तेथून निघून गेली. केमाल-पाशानं तुर्कस्थानहून हाकलून लावलेला अमरपाशा आपले कांहीं लोक घेऊन मध्य आशियावर ताबा घेण्याच्या विचारांत होता. तेर्मिजमध्यें त्याचे लोक होतेच. पण काबुलमध्यें आल्यानंतर बुखारीचा इस्लामवाद नष्ट झाला होता. तांड्यांत सिंधी अन् पंजाबी कितीतरी व्यापारी होते. त्याची खाण्यापिण्याची आबाळ झाली नाहीं. तेर्मिजला तीन चार दिवस राहून तो पुढच्या प्रवासास निघाला.

**समरकन्द**:—तांड्याबरोबर चालून चालून प्रवासांत तो थकून गेला होता. रस्त्यानं व्यापारी बोल्शेविकांचं भय दाखवीत होते. तो नोव्हेंबरचा महिना होता. थंडीचे दिवस होते. समरकन्दला सिंधी अन् पंजाबी व्यापाऱ्यांचीं दुकानं होतीं. तो त्यांच्या इथंच उतरला. आपल्या देशबांधवाची योग्यता परदेशांत जाणवते. बुखारीसारख्या सुशिक्षित तरुणावर तांड्यांतील सर्वच हिंदी लोक प्रेम करीत होते. मौलवी बोल्शेविकांना फारच घाबरत असत. ते शिव्या देऊन सांगत कीं, "हे बोल्शेविक इस्लामधर्म नष्ट करूं पहात आहेत." बुखारी त्यांना विचारी, "धर्म उरला आहे कुठं?" मौलवीचं लोकां-वर अजूनही वजन होतं. बुखारीला तिथले सरळ साधे लोक पसंत पडले. त्यांत कांहीं लोक बोल्शेविकांची प्रशंसाही करीत. "बोल्शे-विक समानता फैलावत आहेत, इस्लाम धर्मांत तरी हेंच सांगितलं आहे. बघा स्त्रियांच्या बाबतींत त्यांनीं किती सुधारणा केली आहे!"

अजून बोल्शेविकांचा देश दूर होता. पण वातावरणांत अनुकूल प्रतिकूल मतांचा जोर मावत नव्हता. बुखारी इथं दहा दिवस थांबून ताशकन्दकडे रवाना झाला.

**ताशकन्दः**—पांच दिवस पायीं प्रवास केल्यानंतर तो ताशकन्दला पोंहोचला. अनवरच्या मुजाहिदीन वादाबद्दल त्याला आणखी बऱ्याच गोष्टी कळल्या. पण बुखारीला बघायचं होतं बोल्शेविकांना. ताशकन्दाला रशियन लोक फारच कमी दिसले. पण तिथं त्याला कांहीं उज्बेकमधले बोल्शेविक भेटले. त्यांनी बुखारीला सर्व कांहीं समजाऊन दिलं. त्याच्या डोक्यांत प्रकाश पडला. अनवर आणि त्याचे दोनचार पुढारी म्हणजे कांहीं सर्व नाहीं. खरी म्हणजे जनता आणि तिचं नेतृत्व करणारी सुसंघटित पार्टी ! लोक त्या लढाईपासून तोंड फिरवूं शकत नाहींत. कारण ती त्या लोकांच्या हिताकरितां झगडली जात असते. कामगार अन् शेतकरी असं समजतात कीं, **श्रीमंत वर्गाकडून** पिळवणूक करून घेण्यांत आपलं हित नाहीं. बोल्शेविक या सरंजामशाही समाजयंत्राचा नायनाट करायला शेतकरी अन् कामगारांना मदत करतात. बुखारी दीड महिना ताशकन्दला राहिला. त्याचे विचार निश्चित झाले. धर्माला त्यानं चाट दिली. ताशकन्दमध्यें अजूनही श्रीमंती राज्यसत्ता कोसळूं पहात होती. बुखारी तिथं एका सिंधी चहाव्यापाऱ्याकडे राहिला. व्यापारी घाबरून गेले. त्यांच्याजवळ झारशाहीच्या वेळच्या नोटा होत्या; पण त्यांना आज किंमत नव्हती. बोल्शेविकांनीं झारशाहीचीं कर्जं, देणीं घेणीं व चलन याला मूठमाती दिली होती. पण अजूनही व्यापाऱ्यांना नोटा चालविण्याची आशा वाटे.

**बुखाराः**—या सुमारास कांहीं व्यापारी ताशकन्द सोडून पळूं लागले. बुखारीही त्यांच्याबरोबर समरकंदवरून १०–१२ दिवसांत

बुखाऱ्याला पोहोंचला. बुखारीनं ऐकलं होतं, त्याच्या वंशांतले लोक इथूनच अहमदाबादला गेले होते. जगप्रवासी सैय्यद लोकांत स्वामी जहानियाच्या गोष्टी प्रसिद्ध होत्या. ते लोक या बोल्शेविकांना भेटण्यास टाळीत होते. ते म्हणत, "ही नवी समाजरचना पृथ्वीवर एक मोठं पाप आणून सोडीत आहे." बुखारी कांहीं सर्व साधारण लोकांत भाषण करीत नव्हता. या धर्ममार्तण्डांसमोर तो संभाळून बोलत होता. मध्य आशियाची यात्रा करून त्याला एक निश्चित साम्यवादी विचारसरणी मिळाली होती. ताशकन्दपासून त्यानं एक ठाम विचार करून टाकला कीं, आतां आपण लौकर हिंदुस्थानला जाऊन ही नवी विचारसरणी फैलावली पाहिजे.

**हिंदुस्थानांत**:—बुखाऱ्यांत दहा पंधरा दिवस राहून नंतर तेर्मिज, मजारे शरीफ, काबूल वरून तो पेशावरला आला. जमरूद्मध्यें पोलिसांनीं त्याला पकडलं व धमक्या द्यायला सुरवात केली. पण सिंधी व्यापाऱ्यांनीं सांगितलं, हा आमचा माणूस आहे. त्याची सुटका झाली. १९२२ मध्यें प्रवासानंतर तो हिंदुस्थानांत परत आला.

**असहकारितेची चळवळ**:—लाहोरला येतांच त्याला कळलं कीं, त्याचा वडील भाऊ जहूर हुसेन (एम. ए. लेक्चरर) यानं नोकरी सोडून असहकारितेच्या चळवळींत भाग घेतला आहे. याचा त्याला फार आनंद झाला. त्याला हेंही कळलं होतं कीं, मौलाना महम्मद अलिगढमध्येंच आसन ठोकून बसले आहेत. अहमदाबादहून तो अलिगढला गेला. मौलानाला बुखारीच्या ताशकन्द यात्रेची माहिती होती. तो तिथं कांहीं दिवस राहिला. तो मुलांना, विद्यार्थ्यांना, जो कोणी भेटेल त्याला, सांगू लागला, "कामगार आणि शेतकऱ्यांत अगदीं मन लावून काम केलं पाहिजे."

**राजकीय क्षेत्रांत**:—अलिगढहून तो कराचीला आला. तेथील कामगारांत तो काम करूं लागला. हिंदुस्थानी खलाशांशीं त्यानं संबंध जोडले. त्यांच्यांत छापील पत्रक वाटलीं. कामकरी राज्यावर आवेशपूर्ण व्याख्यानं दिलीं. १९२२ मध्यें तो पकडला गेला. १२४ ए कायद्यान्वयें त्याला दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली.

कराचीचा तुरुंग जुना होता. त्यांत राजकीय बंदी अजून घेतले गेले नव्हते. बुखारी तुरुंगांतली वाईट वागणूक सहन करायला तयार नव्हता. तो विरोध करूं लागला. व एक छडीची शिक्षा सोडली तर तुरुंगांतल्या बाकीच्या साऱ्या शिक्षा त्याला मिळाल्या. १९२३ मध्यें तो तुरुंगांत असतांना त्याचे वडील वारल्याची त्याला बातमी कळली. बुखारीनं जेलमध्यें कम्युनिझमवर बरीच पुस्तकं वाचलीं. अजून जेलचे अधिकारी मार्क्सच्या "कॅपिटल" ला व्यापारी ग्रंथ समजत होते. १९२४ मध्यें बुखारीची सुटका झाली. तो एकसारखीं व्याख्यानं देऊं लागला. कामगारांना कामकरी राज्य मिळवून देण्याकरितां संघटनेचे धडे देऊं लागला. त्यानं खलाशांची यूनियन स्थापन केली. खलाशांचं जीवन त्यानं जवळून बघितलं. त्याला असं वाटलं, खलाशांत एक अशी अपूर्व शक्ति आहे आणि तिच्या जोरावर एका देशांतून दुसऱ्या देशांत क्रान्तिकारक संबंध जोडले जाऊं शकतात.

**जहाजांतला खलाशी**:—बुखारीनं नानाविध प्रयत्न करून १९२४ मध्यें हंसा लाईन कंपनींत एका मालाच्या जहाजांत फायरमनची नोकरी मिळविली. नंतर त्याला परिचारकाचं काम मिळालं. पासपोर्टचं कांहीं काम नव्हतंच. फक्त खलाशांच्या म्होरक्यानं शिफारस करतांच ही नोकरी मिळे. कांहीं खलाशी बुखारीची खलाशी

यूनियन ओळखत होते. एडन्, पोर्टसईद, जिब्राल्टर, लिवरपूल वगैरे मार्गानं तो इंग्लंडला पोहोंचला. त्यानं लंडन शहर बघितलं. जर्मनीच्या हाम्बर्ग बंदरावरून जातां जातां आपल्यासारख्या सहविचाराच्या खलाशांशीं ओळखीही करून घेतल्या. असाच फिरत फिरत मग तो मुंबईला आला. बुखारीला २५ रुपये पगार मिळत होता. त्याला प्रत्येक विदेशीय साम्यवादी पार्टीशीं परिचय करून घ्यायचा होता. जहाजांत त्याला फारच सावध रहावं लागे. आपण एका विद्यापीठाचे पदवीधर व क्रान्तिकारक विचाराचे तरुण आहोंत याची कोणाला शंका न येईल याची तो काळजी घेई. बुखारीनं त्याकरितां खलाशांची भाषा आत्मसात् केली. तो त्यांच्यांत मिसळून जाई. बुखारी या यात्रेतही यशस्वी होऊन परतला. त्याला मार्क्स-वादी वाङ्मय वाचायला मिळालं. या यात्रेनंतर त्याला कुठं कळलं कीं, तो एका विशाल विश्वव्यापी सेनेचा एक सैनिक आहे. अन् तीं कम्युनिस्ट समाजरचना वास्तवतेंत आणणं कांहींच अशक्य नाहीं. आतां मात्र तो पुन्या आत्मविश्वासानं आपल्या राजकीय कामांत गढून गेला.

**राजकीय कार्यक्षेत्र**:—१९२५ च्या सुरवातीपासून त्यानं आपल्या राजकीय कार्यास खरी खुरी सुरवात केली. आतां तो एक-टाच कार्य करण्याकरितां उभा राहिला. सहकाऱ्यांना मदत करण्याकरितां पैशाची आवश्यकता होती. त्याच्यासारख्या बेकार माणसांवर पोलि-सांची नजर फिरत होती. तो विमा एजंट बनला व देशविदेशांचं आयात निर्यात मालांचा ठेका घेण्याचं कामही त्यानं सुरू केलं. आतां त्याला पैसे मिळूं लागले होते. कामाच्या निमित्तानं तो सिंध, पंजाब अहमदाबाद व अलिगढला जात असे. १९२१ मध्यें कराचींत रेल्वे कामगारांची यूनियन स्थापन केली होती. तिथं त्यानं आपले

हितसंबंध जोडले. तो नॉर्थ वेस्टर्न रेल्वेच्या युनियनचा डिव्हिजनल सेक्रेटरी होता. त्याच वर्षी १९२५ मध्यें त्यानं "आजादी" या नांवानं एक उर्दू साप्ताहिक काढलं. तसेंच सिंधी भाषेंत निघणारं "अलवहीद" त्या वेळेस खिलाफत कमिटीकडून चालवलं जात होतं. आज तें लीगचं मुखपत्र आहे. त्यांतही तो त्या वेळेस लेख लिहीत होता. त्याची उत्साहभरित क्रान्तिकारी व्याख्यानं ऐकून पोलिसांना वाटे, हा अर्धवेडा आहे. याच्या वाटेला न गेलेलंच चांगलं. अजून तितक्या संघटणेनं कार्याला सुरवात झाली नव्हती. म्हणून पोलिसांचा समज साहजिकच होता. पण कॉंग्रेसवाल्यांना हीं व्याख्यानं ऐकून असं वाटे कीं, हा कुणीतरी सी. आय्. डी. चा मनुष्य असावा. वर्षभराच्या स्वानुभवानं बुखारीला कळलं कीं, कामगारांना त्यांच्या गोष्टी चांगल्या प्रकारें कळतात. १९२४ च्या कानपूर बोल्शेविक कटांशीं त्यांचा प्रत्यक्ष असा कांहीं संबंध नसल्यामुळं तो आपलं कार्य करायला त्याच्यापासून अलगच होता.

१९२७ मध्यें सकलातवाला हिंदुस्थानांत आले होते. कराचींत बुखारीच्या पुढारीपणाखालीं तिथल्या कामगारांनीं त्याचं स्वागत केलं. लाहोरपर्यंत बुखारी सकलातवालाबरोबर होता. सकलातवाला गांधी-वादाचा उघड विरोध करीत होते. याच वर्षी बुखारीनं सिंधमध्यें कामगार शेतकरीपार्टी स्थापन केली. पण ही पार्टी अजूनपर्यंत फक्त नामधारी पार्टी होती.

१९२८ डिसेंबरमध्यें कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळेस कामगार शेतकरी पार्टीचं अधिवेशन भरलं होतं. बुखारी सिंधचा प्रतिनिधी या नात्यानं तिथं हजर होता. जवाहरलालनीं भारत–स्वतंत्रता–संघ स्थापन केला. बुखारीनं सिंध प्रांतात त्याचा प्रचार केला. कलकत्त्याच्या

अधिवेशनांत हिंदुस्थानांतल्या इतर कम्युनिस्टांना भेटण्याची त्याला संधी मिळाली.

बुखारी सर्वपक्षीय संमेलनाचा सभासद होता. संमेलनास हजर राहण्याकरितां तो मुंबईस आला. त्या वेळेस मुंबईस कामगारांचा संप चालू होता. बुखारीनं पहिल्यांदा मुंबईच्या कामगारापुढें व्याख्यान दिलं.

१९२९ मध्यें अजमीरला कामगार शेतकरी पार्टीची बैठक भरणार होती. पण आधीं सारे पुढारी मिरत कटांत गोंवले गेले होते. बुखारी त्यांतून वांचला. " पयामे मजदूर " या पत्रकांत तो लिहित होता. आतां त्यान कराचीहून आपलं एक " चिनगारी " नांवाचं उर्दू साप्ताहिक सुरू केलं. हें साप्ताहिक फारच लोकप्रिय झालं. या पत्रानं कॉ. शाहीदसारख्या कितीतरी लोकांना मार्ग दाखविला.

आतां मुंबई सरकारची नजर बुखारीकडे वळली. कराचीहून एक आठवडा तो दिसेनासा झाला. त्याच्या गैरहजेरींत त्याच्या ऑफिसची झडती घेतली गेली. मिरतच्या खटल्यांत बुखारीचाही उल्लेख केला गेला. अमृतसरमध्यें एक आठवडा राहून बुखारी कलकत्त्याला पोहोंचला. तिथं कॉ. हलीम बरोबर तो ज्यूट मजुरांत काम करूं लागला. त्याच वर्षीं प्रथमच रशियन क्रान्तिदिन हिंदुस्थानांत साजरा करण्यांत आला. श्रद्धानंद पार्कमध्यें मोठी सभा झाली. बुखारी ट्राममधून जात असतांना त्याला कॉ. अमीर हैदरखान समजून पकडण्यांत आलं. नंतर त्याला सोडूनही दिलं. त्या वेळेस भगतसिंगाचा खटला चालला होता. बुखारीनं फंड जमा करण्यास मदत केली. तो " सी–मेन्स यूनियन "चं कामही पहात होता.

नागपूरच्या ट्रेड यूनियन अधिवेशनांत चार पंथांची बाचाबाची चालली होती. कांहीं मवाळ कामगार नेते "**हिटेल कमिशन**"शीं

सहकार करूं पहात होते तर बुखारी त्यांच्यांत भांडण लावून देणाऱ्यांपैकीं एक होता. त्यामुळं सहकाराचा ठराव पास होऊं शकला नाहीं.

बुखारी मुंबईला निघून आला. मदनपुऱ्यांत राहून कामगारांत काम करूं लागला. १९३० चा लेनिनदिन काँग्रेस भवनांत साजरा करण्यांत त्यानं यश मिळविलं.

१९३० च्या प्रारंभापासून त्याच्या वैयक्तिक जीवनाचा शेवट झाला. तेव्हांपासून त्यानं पार्टी सभासद व अघाडीचा पार्टीसैनिक या रीतीनं जीवन व्यतीत करायला सुरवात केली. जी. आय्. पी. रेल्वे संपांत त्यानं भाग घेतला. बुखारीची कार्यशक्ति बघून कामगारविरोधी नेते त्याला घाबरूं लागले. आणि याही पुढें जाऊन त्यांनीं बुखारीला ठार मारण्याकरितां कांहीं गुण्डही पाठविले होते. पण त्याच्या इतर सहकाऱ्यांना बघून गुण्डांना त्याला ठार मारण्याची छाती झाली नाहीं. कल्याणला कामगारांची सभा चालू होती. बुखारी तिथं बोलायला गेला. विरोधकांनीं आपले पित्ते सभेंत पाठविले होते. त्यांपैकीं एका म्हाताऱ्या मुसलमानानं बुखारीला लाथ मारली. लोकांनीं त्या म्हाताऱ्याला बाहेर हाकलून लावलं. मग कोणीतरी त्याला समजावून सांगितलं: बुखारी एका सन्मान्य पीर वंशांतला सय्यद आहे. त्यानं कामगारांच्या सेवेसाठीं किती कष्ट सहन केले आहेत! ऐकणाऱ्या सर्वांना झालेल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप वाटला अन् तो म्हातारा मुसलमान तर समजूं लागला कीं "झालं! आतां त्याचा रोजा नमाज सारं संपलं!" पीरजादा सैय्यदला लाथ मारल्यानंतर आतां त्याला स्वर्गांत जागा मिळणं शक्य नाहीं. कामगारांनीं सभेंत जाहीर केलं कीं, जोंपर्यंत बुखारी सभेंत हजर राहणार नाहीं तोंपर्यंत कल्याणमध्यें कोणताही कार्यक्रम होणार नाहीं.

कामगारांनीं बुखारीला विनवून माफी मागितली. याच सुमारास कैक विदेशीय पुढाऱ्यांशीं भेटण्याची त्याला संधी मिळाली. कॉंग्रेस, तरुण संघ व कामगारांत तो काम करीत होता. २६ जून १९३० ला " वर्कर्स वीकली " कामगार साप्ताहिकाचा पहिला अंक निघाला. बुखारी २० हजार कामगारांसह चौपाटीवर भरलेल्या स्वातंत्र्य-दिनाच्या सभेंत हजर राहायला येत होता. पण वर्तमानपत्र आणण्याकरितां त्याला प्रेसमध्यें जाणं जरूर होतं म्हणून तो तिथं जाऊं शकला नाहीं. कामगारही स्वातंत्र्यदिनाच्या सभेंत तिरंगी झेंड्याऐवजीं लाल झेंडा उभारूं पहात होते. पण कांहीं कार्य-कर्त्यांचीच चूक झाली. त्यांच्याबरोबर मदनपुऱ्याच्या कांहीं स्वयं-सेवकांनींही तिरंगी झेंड्याच्या ऐवजीं लाल झेंडा उभारायचं ठरविलं. सभेच्या संचालकांची ही इच्छा नव्हती. ह्या प्रकरणामुळं कितीतरी कॉंग्रेस पुढारी कम्युनिस्टविरोधी प्रचार करूं लागले. कामगार, त्यांचे पुढारी व कम्युनिस्टांचा या प्रकरणांत मुळींच हात नव्हता. तसं पाहिलं तर २५ जानेवारीच्या रात्रीं गिरणी कामगार यूनियनच्या वतीनं एफ् वॉर्ड कॉंग्रेसच्या कम्युनिस्टांनीं भाग घेऊन तिरंगी झेंड्या-शेजारीं आपला लाल झेंडा फडकविला होता. त्या वेळेस कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं आपला विरोध दाखविला नव्हता.

बुखारी एका विदेशीय कार्यकर्त्याबरोबर कलकत्त्याला गेला. ज्यूट कामगारांत काम करून त्यांची यूनियन कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालीं काम करूं लागली. कलकत्त्याच्या गाडीवाल्यांनीं सरकारच्या अरेरावीला कंटाळून संप पुकारला. बुखारीनं पत्रकं काढलीं. लोकांना समजावलं. शिपायांनाही समजाविण्यांत आलं. पण गोळीबार झाला. जमावांतील बरेचशे लोक मेले. या वेळेस हिंदी, बंगाली, इंग्रजीमध्यें पत्रकं वाटलीं गेलीं. सेनगुप्ताच्या अध्यक्षतेखालीं

एक सभा घेण्यांत आली. त्यांत “ कम्युनिस्ट पार्टी जिंदाबाद ” हा जयघोष झाला. “ स्टेट्समन ” नं या प्रकरणावर ताशेरा झाडला. सार्वत्रिक संपाचं वातावरण बघून सेनगुप्तानं सभेंतून पोबारा केला. मग डॉ. भूपेंद्र दत्तानं सभेचं अध्यक्षस्थान स्वीकारलं.

आतां बंगालमधील कम्युनिस्ट आपल्या मतांचा प्रचार करूं लागले. राजशाही कॉन्फरन्सच्याच वेळेस तरुण कॉन्फरन्स भरली होती. त्याचं अध्यक्षस्थान बंकीम मुकर्जीला देण्यांत आलं होतं. एप्रिलमध्यें बुखारीवर वारण्ट निघालं. १९३० चा “ मे दिन ” साजरा होण्याची तयारी जोरांत होऊं लागली. ८००० पत्रकं वाटलीं गेलीं. बस व ट्राम कामगार आणि इतर दुकानदार आपापलीं कामं सोडून या दिनाच्या कार्यक्रमांत येऊन मिळाले. बुखारी उघड फिरूं शकत नव्हता. जूनमध्यें ईदच्या दिवशीं त्याला पकडण्यांत आलं. बुखारीला स्पेशल वॉर्डांत ठेवण्यांत आलं. यावर त्यानं हरकत घेतली. हातघाईवर येऊन त्यानं दोनचार थपडा खाल्या. बुखारीनं खिशांत हात घातला. त्याच्या खिशांची झडती झाली असूनही इंग्रजी अधिकारी घाबरला. मग त्यानं बुखारीला विजेचे पट्टे मारायला व इतर शारीरिक त्रास द्यायला सुरवात केली. बुखारी म्हणाला, “ मी दुधखुळा नाहीं. तुम्हांला जें करायचं असेल तें करून द्या.” अधिकाऱ्यानं, “ तुझा मेंदू गरम आहे. तुला वीस वर्षांकरितां कोंडून ठेवीन ” अशी धमकी दिली. पण त्याच्याकडून कांहींच थांगपत्ता लागत नाहीं असं पाहून १८१८ च्या रेग्युलेशन नियमानुसार त्याला नजरबन्द करण्यांत आलं. बुखारीला एक आठवडा हावरा जेलमध्यें ठेवून नंतर ब्रह्मपूरच्या तुरुंगांत पाठवून दिलं. तुरुंगांतही तो स्वस्थ बसला नाहीं. त्यानं दहशतवादी कैद्यांकरितां मार्क्सिस्ट अभ्यासमंडळ स्थापन केलं व त्यांना शिकवूं लागला. व

जेलच्या अव्यवस्थेविरुद्ध लढ्यांत तो सामील होऊं लागला. त्याच्या या कामामुळं कितीतरी दहशतवादी बंगाली तरुण मार्क्सवादाकडे ओढले गेले. दहशतवाद्यांनीं अन्नसत्याग्रह सुरू केला. बुखारी त्यांत सामील होताच. त्यांनीं एक मोठी मिरवणूक काढली. तो मिरवणुकीच्या पुढं होता. अन् शेवटीं सभेचा अध्यक्ष बनला. जेलमधली धोक्याची घंटी वाजली. शिपायी लाठी घेऊन आले व राजकीय कैद्यांना पिटून काढलं. लाठीमारानं साठसत्तर कैदी घायाळ झाले. बुखारी सारी रात्र त्यांची सुश्रुषा करीत होता. बुखारीवर या प्रकरणाबाबत खटला चालविण्याची तयारी केली जात होती. पण जेलरही या दरम्यान पिटला गेला. तो भ्याला. बुखारीनं त्याची समजूत घातली.

पण आतां बुखारीला ब्रह्मपुरी जेलमध्यें ठेवणं सरकारला धोक्याचं वाटलं. त्याची बदली राजशाहीच्या तुरुंगांत झाली. तिथंसुद्धां त्याचा मार्क्सवादाचा प्रचार बघून अधिकारी घाबरूं लागले. आणि पंधरा दिवसांतच त्याची भूतानच्या सीमेवर असलेल्या बुसका किल्ल्यांत रवानगी झाली. इथं मोठे मोठे दहशतवाद्यांचे प्रमुख व आद्य पुढारी बंदिस्त होते. बुखारी कम्युनिस्ट आहे, असं समजतांच त्यांनीं त्याच्यावर बहिष्कार टाकला. शेवटीं कांहीं झालं तरी दहशतवाद्यांना आतां थारा उरलाच नव्हता. जिथं त्यांचे सारे शिष्य मार्क्सवादी बनले होते तिथं गुरूंची काय कथा ? बुखारीनं हळू हळू आठ लोकांचं मंडळ स्थापन केलं. सगळे बरोबर खातपीत व निजतबसत असत. लष्करी जेलर बुखारीला आंतरराष्ट्रीय वृत्तीचा समजत होता. बुखारीला मार्क्सवादावरील मूलग्रंथ पाहिजे होते. पण जेलर त्या पुस्तकांना आंत येऊं देत नव्हता. त्याच वेळेस बंगालचा एक होम् मेंबर बुसका तुरुंगाची पहाणी करण्याकरतां आला. त्याच्यापुढं बुखारीनं

"आम्हांला हीं पुस्तकं मिळालीं पाहिजेत." असं ठासून सांगितलं. होम मेंबर म्हणाला, "नाहीं, फक्त लेनिन आणि ट्रॉट्स्कीची पुस्तकं मिळणार नाहींत." मग फौजी कमांडरनं हुकूम दिला कीं, "यांना मार्क्स आणि ॲंगेल्स यांचीं पुस्तकं मिळतील." पुस्तकं मिळाल्यानंतर शिकायला अन् शिकवायला खूपच मोकळीक मिळाली.

१९३१ मध्यें त्याची प्रकृति ढांसळली. त्याची प्राणांतिक अवस्था बघून बंगाल सरकारनं त्याला इथून रजा दिली व त्याला मुंबई सरकारच्या स्वाधीन केलं. बुखारीनं आतां पुन्हां "पयामे मजदूर" नांवाचं साप्ताहिक चालू केलं. बुखारीला पार्टीच्या कार्यकारी मंडळांत जागा मिळाली. तरी पण खऱ्याखुऱ्या संघटित पार्टीची स्थापना करण्याकरतां मिरतचे कार्यकर्ते सुटून येईपर्यंत त्यांना वाट पहावी लागणार होती.

१९३२ मध्यें बुखारी यात्रेच्या नांवाखालीं दुसऱ्यांदा जगपर्यटन करण्याकरतां जहाजांत बसला. सरकारला ही खबर कळली व त्याला जहाजामधून उतरावं लागलं.

एकदां मदनपुऱ्यांत पोलिसांनीं त्याच्या घराला वेढा घातला. पण बुखारी रात्रींच अहमदाबादला पसार झाला होता. तिथं तो कामगार बनून त्यांच्यांत तीन महिनेपर्यंत काम करीत होता. कितीतरी कामगारांना त्यानं त्या महान् कामाकरितां तयार केलं ! कॉम्रेड गुलाम महम्मद्—जे आजकाल अखिल भारतीय ट्रेड युनियनचे अध्यक्ष आहेत, त्यांच्यांतही प्रेरणा देण्याचं काम त्या वेळेस बुखारीनंच केलं. अहमदाबादच्या कामगारांत एक गांधीवादी कामगार संस्था होती. ती संस्था कामगारांना चुकवून मिलमालकांना धर्मावतार मानण्यास लावीत असे. आणि अशा रीतीनं कामगारांना क्रान्ति-विन्मुख ठेवण्यांत दक्ष असे. पण त्या मजूर महात्म्याचा दबाव

साधारण सूत कांतणाऱ्या कामगारांवर होता. व कपडा विणणाऱ्या कामगारांवर नव्हता. त्या वेळेस कपडा विणतांना जराही चूक झाली तर मालक कामगाराला दंड करी. बुखारीनं कपडे विणणाऱ्या कामगारांची संघटना करून या अन्यायाच्या विरुद्ध मालकांशीं भांडण्याकरतां, त्यांच्यांत चेतना उत्पन्न केली. त्याच्यावर वारंट निघालं. एके दिवशीं कामगारांत नवी नवी वर्गणी गोळा करण्यासाठीं तो गेला असतांना तिथं पोलीस येऊन पोहोचले. बुखारी थोडक्यांत वांचला. त्यानं तिथून धूम ठोकली अन् तो कराचीला पळाला. मग चारदोन दिवसानंतर तो मुंबईला आला.

जानेवारी १९३३ मध्यें तो शेवटीं पकडला गेला व त्याला ५॥ वर्षांची शिक्षा मिळाली.

मार्च १९३५ मध्यें तो येरवडा जेलमध्यें होता. तिथं त्यानं कॉंग्रेसच्या कैद्यांशीं चर्चा केली. मुंबई कॉंग्रेसच्या तीन दिवस आधीं तो सुटला. मिरत कटांतून सुटून आलेल्या पुढाऱ्यांची त्याची भेट झाली. मग तो मदनपुऱ्यांत राहून कामगारांत काम करूं लागला. १९२९ त तो पार्टीच्या मध्यवर्ती कमिटीवर होता. पण पार्टी अजून संघटित झाली नव्हती. तरी पण पार्टी संघटित स्वरूपांत आगेकूच करीत होती.

१९३६ मध्यें लखनौ कॉंग्रेसचं अधिवेशन जवळ आलं. पैशाची आवश्यकता होती. बुखारी आपल्या घरीं गेला अन् इस्टेट विकून त्यानं पांच हजार रुपये बरोबर आणले. स्वामी सहजानंदानं किसान सभेचा झेंडा बिहारमध्यें लोकप्रिय करून टाकला होता आणि त्यांच्या कार्याचा पवित्र सुगंध साऱ्या भारतांत पसरला होता. बुखारीनं स्वामीजींचं नांव ऐकलं होतं. त्यानं स्वामीजींची भेट घेतली अन् चर्चा केली. अखिल भारतीय किसान अधिवेशनांत त्यानं भाग घेतला.

१९३७ मध्यें त्यानं सिंध प्रांतांत "हारी" (किसान) कमिटी स्थापन केली. तेथील गावांत त्यानं दौरे काढले. तसंच मध्यप्रांत, संयुक्तप्रांतांतही तो गेला व तेथील शेतकऱ्याला त्यानं जागं केलं.

१९३८ मध्यें हरिपुरा काँग्रेसच्यावेळीं शेतकऱ्याची मिरवणूक काढण्यांत बुखारीनं प्रामुख्यानं भाग घेतला. १९३९ च्या त्रिपुरी काँग्रेसनं मुस्लीम जनतेसंबंधीं कमिटया स्थापन केल्या होत्या. त्यांत बुखारी मुंबई शाखेचा अध्यक्ष होता.

१९४० मध्यें पळासाला भरलेल्या अखिल भारतीय किसान सभेचा तो संयुक्त अध्यक्ष म्हणून निवडला गेला. एप्रिलमध्यें तो पकडला गेला व येरवडा व नाशिक तुरुंगांत त्यानं हा काळ घालवला. तिथून मग १९४१ ऑगस्ट महिन्यांत त्याची सुटका झाली.

आज सिंध प्रांतांच्या कम्युनिस्ट पार्टीचा बुखारी सेक्रेटरी आहे. आणि अत्यंत उत्साहानं अन् आवेशानं सिंधवासीय जनतेला कामगार शेतकऱ्याबरोबर स्वातंत्र्याकडे नेण्याचं तो अविरत कार्य करीत आहे.

## महंमद शाहीद : : २

हम वो हैं बेरूखी करते नही,
हम वो हैं जो मौतसे डरते नही,
हम वो हैं जो मरने भी मरते नही,
चुकी लाल झंडा है हमारे हाथमे,

लहानपणापासूनच शाहीदनं दारिद्र्याचा मनमुराद आस्वाद घेतला. वयाच्या तेराव्या वर्षीं आपल्या पायावर उभं रहाण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. त्यानं कांहीं दिवस नोकरी केली तर कितीतरी दिवस बेकार बनून अन्नपाण्याविना फूटपाथवर झोंपून काढले. त्यानं स्वतः अनेक कारखान्यांत कामं केलीं आहेत अन् कामगारांच्या अडचणी समजून घेतल्या आहेत. त्याचे कामगार सहकारी जेव्हां न्याय्य हक्काकरितां कंबरा कसून भांडायला उभे राहिले तेव्हां तो त्यांच्यांत मिसळून गेला. आपल्या कामगार बंधूंकरितां त्यानं तुरुंगांतल्या शिक्षा भोगल्या. मोहपाशापासून दूर रहाण्याकरितां तो अविवाहित राहिला. पूर्वापार चालत आलेल्या रूढी व अनुवंशिक बंधनाची वारंवार त्याच्यावर पकड येत असतांनाही त्यानं आपल्या हिंमतीनं, गुणानं, अन् स्वार्थत्यागाच्या जोरावर या सर्व गोष्टी दूर भिरकावून दिल्या आणि आज कितीतरी वर्षांपासून तो मुंबईच्या कामगारांचा नेता म्हणून ओळखला जात आहे.

लखनौजवळ **बाराबंकी** जिल्ह्यांत **सरथरा** नांवाचं गांव आहे. या गांवांतील बनीद घराण्यांतील लोक पोटासाठीं भटकत दूरवरच्या

शहरांत पसरले आहेत. आपल्या भागांत नोकरी मिळत नाहीं असं बघून शाहीदचे वडील नजीमअली घरदार सोडून मुंबईस आले. त्यांनीं हस्तगत केलेली हातमाग व गादी विणण्याची विद्या कामास आली. १९०७ मध्यें ते मदनपुऱ्यांत आपल्या इतर कामगारांबरोबर राहून गाद्या गिरद्या बनवण्याच्या धंद्याला सुरवात केली. कधीं हा धंदा जोरांत चाले व ते आपली गुजराण करून कांहीं पैसे घरीं पाठवीत; तर कधीं धंद्यांत अतिशय मंदी येई तेव्हां दिवसाचे दिवस उपास तापास सहन करीत, धंद्यानिमित्त ते सुरत, पंजाब, कलकत्त्या-लाही कापूस पिंजण्याच्या कामावर गेले होते. ते रोजा नमाज पाळीत नसत पण ईश्वरावर त्यांचा विश्वास होता.

नजीमअलीची बायको नजमुनिसा साधीभोळी, भाबडी बाई होती. पतीसह गरिबींत नेटानं आपला संसार चालविणं ती आपलं कर्तव्य समजे. ईश्वर जो आम्हांला त्रास देत आहे तो आमचं बरं करण्याकरितां अशी तिची भावना होती. ती रोजा व नमाज पाळीत असे. अन् " अच्छामियां"ची करुणा भाकित असे.

कॉम्रेड महंमद शाहीदचा जन्म १९०३ मध्यें झाला. शाहीदला अगदीं आपली लहानपणची पहिली आठवण होते, त्या वेळेस तो साडेतीन वर्षांचा होता. कोयत्याशीं खेळत असतांना त्याच्या उजव्या हाताच्या करंगळीवर वार बसला. हाडापर्यंतचं मांस अलग झालं. हात रक्तबंबाळ होऊन तो बेशुद्ध पडला.

त्याला लहानपणीं कथाकहाण्या ऐकण्याची भारी हौस होती. भुतारवेतांच्या व गंधर्वपऱ्यांच्या गोष्टी ऐकून त्याला भीतीही वाटत असे. आपल्या गांवांतल्या लहान मुलांबरोबर खेळण्यांत त्याला आनंद वाटे. कवडी, गोट्या हे खेळ तो खेळत असे.

सहा वर्षांचा असतांना तो मंगलवरपासून दोन फर्लांगवर '**टिकरा**' शाळेंत जाऊं लागला. तेथील मास्तर मुन्शी हरी प्रसाद मारल्याशिवाय शिकवितच नसत. शाहीद तसा शिकण्यांत मागं नव्हता तरी पण मार खात असे. भूगोल त्याला आवडत नसे. तो नेहमीं झाडावर दफ्तर लटकावून खेळण्यांत गुंगून जाई. ल्हानपणीं तो मुलांचा सेनापती होता. त्याच्यांत सेनापतीचे गुण तर होतेच अन् दुसरं म्हणजे तो गांवांतल्या एका सुखसंपन्न मामाचा भाचा! त्याही वेळेस शाहीदची शरीरप्रकृतिही चांगली होती. शाहीद तिसरीपर्यंत शिकला त्या वेळेस तो दहा वर्षांचा होता. आपले वडील इथून लांब अंतरावर मुंबईत रहात आहेत, एवढंच त्याला माहीत होतं.

१९१३ मध्यें त्याच्या वडिलांनीं त्याला अन् त्याच्या आईला मुंबईस बोलावून घेतलं. आईला अन् मुलाला आनंद झाला. शाहीदनं शहर बघितलं नव्हतं. आगगाडींत प्रथमच बसायला मिळालं. मुंबई शहरांतले प्रचंड रस्ते, व विशाल इमारती पाहून त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्याला तिथं रोज एकदोन पैसे खाऊलाही मिळूं लागले.

मदनपुऱ्यांत सारी मजुरांची वस्ती. अन् बहुतेक सारेच मुसलमान. तो तिथल्या सेन्ट्रल स्कूलमध्यें दाखल झाला. तिथं तो गुजराथी व उर्दू शिकूं लागला. शाळेचा मालक गुजराथी होता म्हणून ती भाषा सक्तीनं विद्यार्थ्यांवर लादण्यांत आली होती. त्यानं कुराणातले "**आयत**" पाठ केले अन् नमाज पढणंही तो शिकला. पण युद्धाचं दुसरं वर्ष चाललं होतं, त्याच्या वडलांची आर्थिक स्थिति जिकिरीला येऊन पोहोचली. इंग्रजी शिकण्याकरितां फीचा प्रश्नच

होता. त्याहीपेक्षां घरांतील चौघांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आ वासून उभा राहिला. त्याला शिक्षणाला तिथंच रामराम ठोकावा लागला.

**तेरा वर्षांचा** शाहीद कापूस पिंजण्याचं अन् गाद्या शिवण्याचं काम करूं लागला. धान्य अत्यंत महाग होतं. अन् चार माणसाच्या कुटुंबाला तीस रुपयांपेक्षां कमी खर्च येणं शक्यच नव्हतं. त्यांत पुन्हां सात रुपये भाड्याचं घर. सूत मिळण्याची अडचण. नाहींतर या धंद्यांत त्यांना कमाई मिळालीही 'असती. वडील कुठून तरी कर्ज आणीत. तर कधीं एक एक वेळ तें कुटुंब संध्याकाळची भूक फुटाण्यावर भागवी.

शाहीदला युद्धाच्या बाबतींत इतकीच माहिती होती कीं, जर्मनांच्या व इंग्रजांच्या दरम्यान लढाई होत आहे. कधीं कधीं त्याचे वडील "**पंच बहादूर**" नांवाचं साप्ताहिक आणित असत. त्याच्यांतील स्फुटें तो वाची. आर्थिक हलाखीच्या स्थितींत त्याची प्रकृती चांगली राहणं शक्य नव्हतं. उपासमार, रात्रंदिवस मेहनत आणि आपल्या मुलाबाळांची तारांबळ बघून आई खंगत चालली, व शेवटीं १८१८ त ती क्षयरोगाच्या विकारानं मरण पावली. बापानं मुलीला आजोळीं पाठवून दिलं. बाप व मुलगा उपासमारीशीं झगडूं लागले.

**युद्ध** संपतांच धान्याचे भाव कमी झाले. शाहीद व त्याच्या वडलांना आशेचे दिवस दिसूं लागले. पण गाद्यांचा धंदा मंदावत चालला. आणि १९२० मध्यें त्यांची इतकी वाईट परिस्थिती बनली कीं त्याचे वडील मुंबई सोडून कामाच्या शोधांत पंजाबला निघून गेले. १९२१ ते १९२३ हीं दोन वर्षं शाहीदला अतिशय वाईट गेलीं. खिलाफत व असहकारितेच्या चळवळीनं खादीची मागणी मोठ्या प्रमाणांत वाढली नि गाद्यागिरद्यांचा धंदा अजिबात पडला. गवालिया टॅंक भागांत एक खादी विणण्याचा कारखाना उघडला होता. १९२२–२३त

शाहीद तिथं कामास राहिला. आतां त्याला निदान खाण्यापिण्यापुरते पैसे मिळूं लागले. **खिलाफत चळवळीचा शाहीदच्या मनावर बराच परिणाम झाला.** उर्दू भाषेतल्या स्वस्त कादंबऱ्या त्याला वाचायला मिळत. शाहीद आता ऐन तारुण्यांत होता. जवळ वडिलांचं बंधनही नव्हतं. मधून मधून तो नमाज पढत असे. इतर धार्मिक बंधनाची त्याला विशेष पर्वा नव्हती. तरीही त्या वेळेस तो संयमशील तरुण होता. मदनपुऱ्यांत राहूनही तो कधीं स्त्री व दारू यांच्या मोहांत सांपडला नाहीं.

मजुरी करायची अन् जीवन घालवायचं एवढंच त्याला जगाचं ज्ञान होतं. १९२३ मध्यें गाद्यांचा धंदा पुन्हा सुरू झाला. शाहीदलाही नोकरी मिळाली. पैशाची बचत तर होत नव्हती. पण मधून सिनेमाही बघे. कादंबऱ्या अन् काव्यसंग्रह वाची. मुंबई शहरांत भटकून तो एकीकडे मोठमोठ्या इमारती पाही तर रात्रीं फूटपाथवर आसऱ्याला झोंपणारे हजारों कामगार पाही. गरिबी अन् श्रीमंती दैवाधीन आहे अशीच त्याची अजून कल्पना होती.

मालकाकडे गादी शिवून तो त्याचा हिशेबही ठेवी. व त्याबद्दल त्याला महिना २० रु. मिळत. एक दिवस एका कामगारानं मालकाजवळ आणखीन् थोडे पैसे मागितले. मालकानं नकार दिला. कामगार कुरकुर करूं लागला. शाहीदनं कामगाराची बाजू घेऊन मालकाला सांगितलं : “ आपल्याला भरपूर नफा मिळाला आहे तेव्हां त्यांतले त्याला कांहीं पैसे द्यायला काय हरकत आहे ! ” मालक शाहीदवर गरम झाला अन् त्याला नोकरी सोडावी लागली.

**गिरणी कामगार**:—गादीवाल्या मालकाची नोकरी सोडल्यानंतर शाहीदनं गिरणीकडे मोर्चा फिरवला. १९२७ पासून ससून मिलमध्यें त्याला पिंजाऱ्याचं काम मिळालं. तिथं त्यानं दोन वर्षेपर्यंत

काम केलं. शाहीद आपल्या धंद्यांत कुशल कारागिर होता. साठ, सत्तर, ऐशीं रुपयांपर्यंत तो सहज कमवी. खाण्यापिण्याची आतां ददात नव्हतीच. सुटींत तो वर्तमानपत्रं वाची. पुस्तकं चाळी. कमालपाशाचं व्यक्तित्व त्याला आवडत असे.

शाहीद गिरणी कामगार बनल्या वेळेपासून कामगार चळवळीचं सुधारणावादी पुढारीपण नाहीसं होऊन वर्गविरोधाचं क्रांतिकारक कम्युनिस्ट पुढारीपण लाभलं होतं. दोन वर्षंपर्यंत त्याचा जीवनप्रवाह शांत वहात होता. **आतां जागतिक मंदीचं वारं वहायला सुरवात झाली.** भांडवलवादावर आलेली ही जागतिक मंदीची आपत्ति! मालकांनीं कामगारावर पगारकांटीचं शस्त्र उगारून आपली नुकसान भरपाई करायला सुरवात केली. कुणाचा पगार कमी केला जाई तर कुणाला कामावरून काढून टाकीत. या असंतोषाचा मोठ्या प्रमाणांत भडका उडाला. १॥ लाख कामगार संपावर आले. कामगार चळवळीला क्रांतिकारक पुढारी लाभले होते. कॉ. देशपांडे, रणदिवे सारख्या प्रमुख कम्युनिस्ट पुढाऱ्यांनीं संपाचं पुढारीपण घेतलं होतं. याच सुमारास शाहीद कॉ. देशपांडेच्या सहवासांत आला. त्यांच्याकडून त्याला समाजवाद, सोवियत रशिया आणि कामगार चळवळीची कितीतरी माहिती मिळाली. शाहीद संपवाल्यांना समजावीत असे अन् त्यांच्यांत उर्दू पत्रकं वांटीत असे. त्या वेळेस साम्यवादावर पुस्तकं दुर्मिळ होतीं. 'किर्ती' अन् बुखारींचं "चिनगारी" हीं नियत कालिकें तो लक्ष लावून पहात असे. **नंतर कॉ. बुखारी** त्याचा शिक्षक बनला, व त्यानं साम्यवादाचं शिक्षण दिलं.

१९३० मध्यें मीठ सत्याग्रहाला सुरवात झाली. शाहीद अजूनही राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. गरिबांकरितां कम्युनिस्ट कार्य-

कर्ते जीं कांहीं कामं करीत होते तीं त्याला आवडत. रजबअली-सारख्या कितीतरी शूर वीरांनीं मीठ सत्याग्रहांत भाग घेतला. शाहीदनंही त्यांत भाग घेतला. चौपाटीवर पोलिसांनीं त्याला पकडलं व थोड्या वेळानं सोडूनही दिलं. साऱ्या सत्याग्रहींना तुरुंगांत ठेवायला जागा तरी कुठं होती? शाहीद स्वयंसेवकांत सामील होऊन कामं करूं लागला. वडाळांतल्या मिठाच्या गोदामावर स्वयं-सेवकांनीं छापा मारला. शाहीद हजर होता. पोलिसांनीं लाठीमार केला. शाहीद बेशुद्ध झाला. कॉंग्रेस हॉस्पिटलमध्यें पोंचल्यानंतर त्याला शुद्धी आली. जमियत उल-उल्माच्या वतीनं एक स्वयंसेवक पथक तयार झालं व या पथकानं दारूच्या दुकानावर धरणं धरलं. त्यांतही शाहीदनं भाग घेतला.

**१९३१ मध्यें गांधी-अर्विन समेट झाला.** स्वरा-ज्याच्या लंब्याचौड्या बाता वास्तवतेंत फोल ठरल्या. अन् शाहीदचा गांधीमार्गावरून विश्वास उडाला.

मग पुन्हां त्यानं कामं शोधायला सुरवात केली. एका गादीवा-ल्याकडे त्याला काम मिळालं अन् वर्षभर तो मजुरी करीत राहिला. पण शाहीद आतां केवळ एक पोटभरू कामगार राहिला नव्हता. तो बडा जागृत कामगार झाला होता. कामगार वर्गाचं हित अहित त्याला कळत होतं. कम्युनिस्टांशीं त्याचा संबंधही दाट होत गेला. आणि कामगारांच्या संघटनेवर, त्याचा विश्वास बसला. १९३२ मध्यें लाल बावटा गिरणी कामगार यूनियनचा शाहीद **उपाध्यक्ष** निवडला गेला. १९३३ मध्यें मुंबईंत पुष्कळसे संप घडून आले. कारण मालक कामगारांची पगारकाट करीत होते. शाहीद संप यशस्वी करण्याकरितां दिवसरात्र अविरत काम करीत होता. त्यानं आपली नोकरीही सोडून दिली.

१९३४ मध्यें मिल कामगारांची मुंबईत एक मोठी परिषद भरली. साऱ्या गिरण्यांतले मिल–मालक कामगारांच्या हक्कावर प्रहार करूं लागले. मालकांना शुद्धीवर आणण्याकरितां व कामगारांनीं आपल्या मागण्या मिळवण्याकरितां सार्वत्रिक संप करायचं ठरवलं. २० एप्रिल १९३४ ला सार्वत्रिक संपाला सुरवात झाली. देशांतल्या ठिकठिकाणच्या साऱ्या गिरण्यांतल्या कामगारांनीं कामं बंद ठेवलीं. मालक आणि सरकार यांच्या भाडोत्री एकजुटीनं संप तोडण्याचे प्रयत्न करण्यांत आले. पण ४० दिवसपर्यंत संपवाले लढाऊ कामगार बेडरपणें छाती ठोकून उभे राहिले. २३ मे १९३४ ला शाहीद पकडला गेला. दोन आठवडे त्याला कच्च्या कैदेंत ठेवलं. ११७ नं. च्या कायद्यानुसार त्याच्यावर खटला चालवून दोन महिन्याची शिक्षा सुनावली. तो माझगांव व ऑर्थररोड तुरुंगांत राहिला. दीड महिन्यानंतर पुन्हां त्याच्यावर १२४ अ कायद्यानुसार राजद्रोहाचा खटला चालविण्यांत आला. अन् पहिली शिक्षा संपते तोंच त्याला दोन वर्षांची शिक्षा मिळाली.

शाहीदला येरवड्यांत वेड्यांच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलं. जवळपास कोणी बोलायला नव्हतं कीं, वाचायचीं कांहीं साधनं नव्हतीं. जेलच्या वॉर्डराशींसुद्धां त्याला बोलण्याची मनाई होती. हीं दोन वर्षं त्यानं निमूटपणें काढलीं अन् २ मे १९३६ ला त्याची तिथून सुटका झाली. तो मुंबईला परतला.

आतां कामगार संघटना मजबूत झाली होती. अन् गिरणी कामगार यूनियनची शक्ति वाढली होती. १९३९ मध्यें कामगारांनीं शाहीदला आपला अध्यक्ष निवडला. अन् त्या वेळेपासून एकसारखा तो दरवर्षीं अध्यक्ष निवडून येऊं लागला. १९३६ मध्यें मदन-

पुऱ्याच्या कामगारांनीं आपल्या या लाल बावट्याच्या पुढाऱ्याला कार्पोरेशनचा सभासद म्हणून निवडून आणला.

महायुद्ध सुरू झालं. जीवनोपयोगी साऱ्या वस्तू महाग झाल्या. मिल मालक युद्धाच्या नांवाखालीं नफा मारून गिऱ्हाइकांना लुटूं लागले. कामगारांनीं महागाई भत्त्याची मागणी पुढें ठेवली. मालकांनीं नकार दिला. मे १९४० मध्यें कामगारांनीं संप पुकारला. मग त्यांचा पुढारी शाहीद बाहेर कसा राहणार ? २२ मे १९४० रोजीं त्याला एक वर्षाची शिक्षा मिळाली अन् नाशिकला त्याची रवानगी झाली. अपील केल्यानंतर शिक्षेची मुदत सहा महिन्यांवर आली. १९२५ पासून त्याची प्रकृति बिघडलीच होती. तुरुंगांत त्याला फारच त्रास झाला. दांत काढावे लागले. डिसेंबर १९४० मध्यें त्याची सुटका झाली. पण बाहेर पांच महिने तो राहिला नाहीं तोंच १२ जून १९४१ ला त्याला पकडून स्थगित कारावासाची शिक्षा मिळाली. त्यानंतर त्याला तेरा चौदा महिने तुरुंगांत ठेवून १८ जुलै १९४३ ला त्याला सोडण्यांत आलं. त्याची प्रकृती ढांसळली असतां-नाही तुरुंगांत त्यानं आपलं ज्ञान वाढविलं. मार्क्सवादावर गंभीर अध्ययनही केलं.

**शाहीद सामान्य कामगारांतूनच निर्माण झालेला कामगारांचा पुढारी आहे.** त्याची ती अतिशय उंच शरीर-यष्टि, हजामत करण्याचा कंटाळा असल्यामुळं वाढलेले सोनेरी केस अन् त्याचा सरळ साधा चेहरा बघून कुणालाही कळेल कीं देशाचं स्वातंत्र्य मिळविण्याकरतां त्याच्या अंतःकरणांत भयंकर कालवाकालव होत आहे.

१९४३ मध्यें सरथाऱ्याला पुत्रदर्शनाची वाट पहात त्याचे वडील शेवटचे क्षण मोजीत होते. २५ वर्षांनंतर शाहीद सरथऱ्याला

गेला. त्याला आपल्या गांवकऱ्यांत बराचसा बदल घडून आलेला दिसला.

पण त्याला पाहिजे होता तसा बदल त्याला तिथं दिसला नाहीं. आपल्या बालपणांत जिथं लावण्या म्हटल्या जात तिथं आजकालचे सुशिक्षित तरुण संभावित उर्दू भाषा बोलत. स्त्रिया आपला जुना पोषाक टाकून साडी आणि सलवार पेहरूं लागल्या. पडदा वापरण्यांत पहिल्यापेक्षांही कडक नियम झाले पण मुली हौसेनं शिकत. अन् शिकल्याशिवाय चांगला नवरा मिळणार नाहीं असा त्यांच्या पालकांत समज निर्माण झाला होता. सरथाऱ्यांतले शेख जातींतले तरुण तुरळकच तिथं दिसत होते. लोकांचा खर्च वाढला. बरेचसे लोकरी धंद्यानिमित्त दूरदेशीं निघून गेले. कुटुंबसंस्था अन् सहानुभूतीचं उच्चाटन झालं व प्रत्येक माणूस स्वार्थी दिसे. राजकारणासंबंधीं तिथले लोक बेफिकिर होते. हो. पण मुस्लिम लीगचं नांव लोक तिथं सन्मानानं घेत आहेत अन् काँग्रेसकडे हिंदूंची संस्था म्हणून नाकं मुरडत आहेत असं त्याला दिसलं. शाहीदच्या साम्यवादावरील गोष्टी लोक आवडीनं ऐकत. इस्टेट आणि जमीन सर्वांना सारखी वांटली गेली पाहिजे ही गोष्ट गरिबांना आवडते. १४ वर्षांपासून शाहीदचा विश्वास ईश्वरावरून उडून गेला. तो या गांववाल्यांच्या सामुदायिक नमाज पढण्यांत भाग घेत नव्हता. लोकांना शंका वाटूं लागली कीं, शाहीद मुंबईला राहून नास्तिक बनला.

अशा रीतीनं पुन्हां एकवार त्यानं आपल्या गांवाशीं परिचय करून घेतला. वडिलांनीं पुत्रदर्शन घेऊन डोळे मिटले. १४ ऑगस्ट १९४३ ला तो मुंबईस परत आला.

तेव्हांपासून शाहीदनं कितीतरी सभा घेतल्या. मुंबईतल्या कामगारांत त्यानं नवचैतन्य उत्पन्न केलं. युद्धजन्य काळांत संपाला

चालना देऊन मिलमालक नफेबाज कसे बनत आहेत अन् काळाबाजार करून ते देशभक्ति कशी दाखवत आहेत हें त्यानं उघडकीस आणलं. त्यानं मदनपुऱ्यांतल्या कितीतरी पांढरपेशा लोकांना लाल-बावट्याकडे आणलं व आज मुंबईतला लीगचा पाकिस्तान विभाग जो मदनपुरा तिथं शाहीद कामगारांत व मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यां-तही लोकप्रिय बनला आहे. त्यानं रेशनिंगची प्रथा सर्व कामगारांत व जनतेंत फैलावली. निरनिराळ्या सभा घेऊन मुस्लिम लीगची बाजू जनतेला समजावून दिली. आज लीगचे लोक मोठ्या आवेशांत, "आझाद हिंदुस्थानमें आझाद पाकिस्तान" हें वाक्य जोरांत म्हणत आहेत पण त्याचा प्रणेता आहे महम्मद शाहीद............

जेलमध्यें त्याची प्रकृति आणखी ढांसळत गेली. जून १९४२ मध्यें तुरुंगाबाहेर येतांच त्यानं या दडपशाहीच्या काळांत कम्युनिस्ट पक्षाचा संदेश कामगारांत पसरवण्याचं अविश्रांत कार्य केलं. कॅन्स-रचा रोग अगदीं असाध्य अवस्थेला पोहोंचल्यानंतर त्याला उपचार व शस्त्रक्रियेकरतां हॉस्पिटलांत राहवं लागलं. हें एक वर्ष त्यानं मृत्यूशीं झुंज दिली. मृत्यूशय्येवरूनही तो लालबावट्याच्या चळवळी-विषयींच बोले. आपण या रोगांतच मरणार हें या क्रांतिकारकाला माहीत होतं. भेटायला येणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याला तो स्वतःच धीराच्या चार गोष्टी सांगे. तेव्हां "लाल झेंडा हय हमारे हातमें, शेर है, चलने है दर्सते हुए" हें गीत म्हणत असतांना त्याच्या त्या दिव्य मुद्रेची आठवण होई.

कॉ. शाहीद हा स्वतः एक उच्च दर्जाचा कवि होता. त्यानं कितीतरी मुशाहिऱ्यांत भाग घेतला व कामगार चळवळीत पडलेला कवि अखिल जनतेला क्रांतिप्रवण करण्याकरितां आपली प्रतिभा कशी

कारणीं वेचूं शकतो याची त्यानं जागोजागीं प्रचीति आणून दिली होती.

शनिवार ता. २२ रोजीं मध्यरात्र उलटल्यानंतर कॉ. शाहीद याच्या मृत्यूची बातमी भाजेकर हॉस्पिटलमधून पार्टीऑफिसला कळली. दोन दिवस शहरांत लष्करशाहीचा नंगा नाच चालू होता. व त्याला प्रतिकार करण्याकरितां जनता निकरानं लढत होती. कर्फ्यू ऑर्डर जारी होती. सकाळीं कॉ. शाहीदचं प्रेत मदनपुऱ्यांत नेण्यात आलं. रस्त्यांत ठिकठिकाणीं बंदुका व मशिनगन्स रोखून गोऱ्या लष्करानं ठाणं दिलं असतांनाही त्याच्या अंत्यदर्शनासाठीं शेकडों कामगारांची रीघ लागली होती. शेवटीं अत्यंत शांततेनं लालबावट्यांत आच्छादलेलं कॉ. शाहीदचं शव नारळवाडीच्या कबरस्थानांत आणण्यांत आलं. तिथल्या आम्रवृक्षाखालीं मुंबईच्या कामगारांचा हा लाडका पुढारी अखेरची निद्रा घेत आहे.

हजारों कामगारांना भांडवलशाहीविरुद्ध व साम्राज्यशाहीविरुद्ध क्रांतिकारक लढा करण्यास स्फुरण देणारा कॉ. महम्मद शाहीदचा सिंहगर्जनेसारखा आवाज अजूनही प्रत्येकाच्या कानांत घुमत आहे. आतां यापुढें तो प्रत्यक्ष ऐकूं येणार नाहीं! उंच व भव्य शरीरयष्टीचा, उमद्या मनाचा आणि मानी स्वभावाचा हा क्रांतिकारक कामगार पुन्हा कुणाच्याही नजरेस पडणार नाहीं.

## " काश्मीरचा वाघ " : : ३

ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षां हिंदी संस्थानांतील जनतेनं स्वातंत्र्याची चळवळ करणं खरोखरच कठीण काम आहे. त्याहूनही जिथं राजा नि प्रजा एका धर्मांचीं नाहींत, तिथं तर हा प्रश्न अतिशय कठीण होऊन बसला आहे. उदाहरणार्थ काश्मीर आणि हैद्राबाद हीं मोठीं संस्थानं आहेत. तिथं राजा आणि अधिकारी एका धर्माचे, तर बहु-संख्य प्रजा निराळ्या धर्माची आहे. प्रजेनं एकादा राजकीय प्रश्न हातीं घेतांच हिंदूमुसलमानांत दंगे अन् खून प्रकरणांपर्यंत तयारी करण्यांत येते. अशा स्थितींतही इतिहास पेंचप्रसंग सोडविण्याकरितां शेखसारख्या व्यक्तींना जन्म देतो.

शेखनं शतकानुशतकें दारिद्र्य, अज्ञान, पिळवणूक, यांनीं गांजलेल्या काश्मीर संस्थानांतील प्रजेला जागें करून स्वातंत्र्यमार्गावर आणलं. साऱ्या अडचणींतून मार्ग काढून आपल्या संस्थानी प्रजेला राजकीय स्वातंत्र्योन्मुख बनविलं. पावसाच्या सरीप्रमाणं बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव झाला आणि निःशस्त्र प्रजेच्या रक्तांच्या सड्यांत धरणी लाल बनली. पण त्यानं धैर्य घालविलं नाहीं. हा नेता अनुभवानं शिकला आणि त्यानं जनतेच्या संघर्षाला परंपरागत गुंतागुंतींतून वर नेलं. संस्थानी सरकार आणि तिचे हस्तक जनतेच्या लढ्याला दाबून टाक-ण्यास असमर्थ आहेत, असा आत्मविश्वास त्यानं जनतेंत निर्माण केला. अंतिम ध्येय दूर आहे, पण काश्मीरची जनता आणि तिचे पुढारी त्या ध्येयाप्रत जाण्याकरितां अविरत प्रयत्न करीत आहेत.

**हैद्राबाद आणि म्हैसूरपेक्षां काश्मीर हें संस्थान मोठं आहे.** त्याच्या सीमा तिबेट, **चिनी तुर्कीस्थान, अफगाणिस्थान आणि रशियन तुर्कस्थान यांना भिडल्या आहेत.** बहुसंख्य प्रजा मुसलमान असून हिंदू, शीख, बौद्ध आणि इतर अल्पसंख्य जाती पण तिथं राहतात.

आधीं आधींच्या राजकीय संघर्षाच्या काळांत कोणी तरी त्याला ‘ शेरे काश्मीर ’ ( काश्मीरचा वाघ ) ही पदवी बहाल केली; आज **सारी काश्मिरी जनता त्याला शेख अबदुल्लाच्या ऐवजीं ‘ शेरे काश्मीरे ’ या नांवानं ओळखीत आहे.**

काश्मीरची राजधानी श्रीनगरपासून सहा मैलांच्या अंतरावर **सौरा** नांवाचं गांव आहे. या ठिकाणचे दुशाले पूर्वीं प्रसिद्ध होते. पण विदेशी व नकली शालींनीं हा धंदा कायमचा बसला. सौरांतले लोक आतां मजुरीवर गुजाराण करतात. १५ व्या शतकांत जैतुल आबदीननं नौशहरला राजधानी ठेवली होती. इथंच ब्राह्मण आणि शेख लोक राहतात. ते सारे १४ व्या शतकांत मुसलमान झाले.

इथंच शेख महम्मद इब्राहीम राहात होते. त्यांच्या मृत्यूनंतर पांच महिन्यांनीं १९०५ मध्यें त्याना मुलगा झाला. महम्मद अबदुल्लाला सहा भाऊ आणि तीन सावत्र आया होत्या. घरचा प्रपंच हातमागावरील शालींवर चालत असे.

**बाल्यः**—अबदुल्लाला अगदीं पहिली आठवण तो तीन चार वर्षांचा असतांनाची होते. त्याला त्या वेळेस देवी आल्या होत्या. लहाणपणापासून त्याची प्रकृति चांगली होती. त्याला खेळण्याचा नाद असे. विटीदांडू, शिवाशिवी, लपंडाव हे खेळ त्याला आवडत. **आजचा शेख अबदुला ६ फूट आणि ३ इंचांचा नवयुवक आहे.** लहानपणीं अबदुल्ला आपल्या लहान लहान

खेळगड्यांचा म्होरक्या होता तर तोच अबदुल्ला आज चाळीस लक्ष काश्मिरी जनतेचा नेता आहे. तो लहानपणापासूनच बेडर होता. त्याला कथाकहाण्या ऐकण्याचा नाद होता. भुताखेतांच्या गोष्टी तो ऐकत असे. पण भीत नसे.

**शिक्षण**:—वयाच्या पांचव्या वर्षापासून तो उर्दू अन् कुराण शिकूं लागला. दोन वर्षांनंतर नौशहरच्या इस्लामी हाय स्कूलमध्यें त्याला दाखल करण्यांत आलं. वडील भाऊ अशिक्षित होता, आणि आई तशीच धार्मिक विचारांची होती. तो लहानपणीं शिकत असतांना त्याच्या शेजारीं घडलेली एक घटना त्याच्या हृदयांत नेहमींकरितां कोरली गेली आहे. त्या घरांत म्हातारे आईबाप व दोन बहिणी रहात. त्यांचा सारा उदरनिर्वाह एकुलत्या एक मुलाला चालवावा लागे. तो सोळा वर्षांचा तरुण होता. अंगानं अन् रंगानं तो नवयुवक तजेलदार दिसत होता. रोज आठ आणे मजुरीवर तो आयुष्य घालवून कुटुंबाला पोशी व त्यांतूनच कर्ज निवारी. तांदूळ आणि भुसा रांधून कशीतरी वेळ घालविली जाई. तरीपण कर्ज भागत नव्हतं. आणि सावकार शिव्या देई. तो तरुण एकाएकीं आजारी पडला. आणि त्यांतच त्याचा अंत झाला. घरचे लोक धाय मोकलून रडूं लागले. कमावता पुत्र मेल्यापेक्षांही पोटाची अकाळ विकाळ भूक आणि कर्जाचा डोंगर पाहून ते भयभीत झाले. त्या वेळेस अबदुल्लानं आपलं सुखासीन जीवन आणि शेजाऱ्याचं जीवन यांची नोंद मनांत करून ठेवली.

प्रायमरी शाळेंत तो दोन इयत्ता शिकला. मग वडील भावानं त्याला धंद्यांत ओढलं. पण मधला भाऊ थोडा फार शिकलेला होता. त्यानं अबदुल्लाला पुन्हां शाळेंत दाखल केलं. त्यानं मन लावून अभ्यास केला व तीन वर्षांत त्यानं पांचवी इयत्ता पूर्ण केली.

पुढें सरकारी हाय स्कुलांत तो दाखल झाला. रोज येण्याजाण्यांत त्याला दहा मैलाची रपेट करावी लागत होती. १९२२ मध्यें तो दुसऱ्या वर्गांत मॅट्रिक पास झाला.

**कॉलेजांतः**—अबदुल्लाला डॉक्टर होण्याची इच्छा होती. श्रीप्रताप कॉलेजांत त्यानं सायन्स हा विषय घेतला. रसायन शाळेत दिवसभर काम करून १२ मैल घरीं चालत जाणं यामुळं त्याच्या प्रकृतीवर परिणाम झाला व शेवटीं तो आजारी पडला. १९२४ मध्यें तो परिक्षेला बसला. पण नापास झाला. तो बी. एस्सी. कडे गेला असता तर नापास झालेल्या एकाच विषयाची परीक्षा त्याला द्यावी लागली असती. पण त्याला मेडिकल कॉलेजांत दाखल होण्याकरितां परीक्षा पास व्हायलाच पाहिजे होती. मग त्यानं पुढच्या वर्षांत बी. एस्सी. कडे जाण्याचा निश्चय केला. आणि लाहोरच्या इस्लामिया कॉलेजांत त्यानं पाऊल ठेवलं. रसायन आणि विज्ञानशास्त्र हे त्याचे विषय होते. तो आतां संस्थानच्या बाहेर होता. **बाहेरच्या आणि संस्थानी प्रजेची तुलना करीत होता.** १९४२ मध्यें काश्मीरच्या कांहीं मुसलमानांनीं अगदीं मवाळ धर्तीवर सरकाकडे आपली तक्रार नेली. संस्थानी कारभाऱ्यांना त्यांचं वर्तन बंडखोरपणाचं वाटलं व त्यांत भाग घेणाऱ्या मुसलमानांना संस्थानाबाहेर हांकलण्यांत आलं. त्यांनीं एकदां सहज बोलतां बोलतां अबदुल्लापुढं आपलं गाऱ्हाणं मांडलं. “ बघा, आम्ही लोककल्याणाकरितां हें काम केलं तर त्याचं प्रायश्चित्त आम्हांला काय मिळालं ! आमचीं घरंदारं आम्हांला सोडावीं लागलीं. आणि लोक तर असे बघे निघाले कीं, ते आमची विचारपूस करायला तयार नाहींत ! ” शेख समंजसपणानं त्यांना म्हणाला, “ चूक तुमचीच आहे. लोकांना विश्वासांत घेऊन तुम्हीं कार्य केलं नाहीं. नाहीं तर लोकांनीं तुम्हांला जरूर साथ दिली

असती. " " हो ! पण म्हणायला काय लागतं ? " यावर शेख म्हणाला, " बरं, मी करून दाखवीन " हे शब्द तो जोर देऊन उद्गारला होता. आणि तो तयारी पण करीत होता. त्याच्याच परिणाम असा झाला कीं तो त्या वेळेस बी. एस्‌सी. नापास झाला. मग पुढें १९२८ त पास झाला.

नंतर शेख अलिगढला एम्. एस्‌सी. ची पदवी घेण्यासाठीं गेला. तिथं त्यानं हिंदूमुसलमानांच्या प्रश्नावर वादविवाद करून मीठ सत्याग्रहाची चळवळ समजून घेतली. तो देशांतलं राजकीय स्थित्यंतर बघत होता. पण सारी ताकद अजमावूनही ब्रिटिश साम्राज्यशाही लोकांच्या आन्दोलनाला दाबू शकली नाहीं. **एम्. एस्‌सी. पास झाल्यानंतर तो एक विशिष्ट दृष्टिकोन घेऊन आपल्या प्रांतांत परतला.**

**राजकीय क्षेत्रांत**:—मॅट्रिक झाल्यापासून त्याच्या मनांत चलबिचल होत होती. पण डॉक्टर होणार या आशेनं त्यानं कॉलेजांत दोन वर्षं काढलीं. या अवधींत ती त्याची आशाही नामशेष झाली. राजकीय कार्याकडे तो जाऊं लागला होता. तशी त्याची स्वत:ची सांपत्तिक स्थिती चांगली होती. पण आजूबाजूच्या भीषण दारिद्र्याचा त्याच्या मनावर दाट परिणाम झाला. लहानपणीं तो आपल्या आईला विचारी, " इतकं दारिद्र्य कां ? " धर्मभोळी आई उत्तर देई, " ही अल्लामियाची करणी आहे. " अब्दुल्लाला हें कळत नसे, ईश्वर एकाला श्रीमंत अन् एकाला गरीब कां बनवितो ? लहानपणापासून तो अन्याय सहन करीत नसे. तो सहावींत असतांना एक प्रसंग घडला. कांहीं लाकूडतोडे जंगलांतून लाकडें घोड्यावर लादून येत होते. अधिकारी त्यांच्यापाशीं लाकडें मागत होता. लाकुडतोड्या म्हणत होता, "हीं लाकडं विकून तर मला पैसे मिळणार आहेत. तीं घेऊं

नका." अधिकारी रागावला व त्याला मारूं लागला. अबदुल्लाला हा अन्याय सहन झाला नाहीं. त्यानं त्या अधिकाऱ्याला पकडलं व शिव्या द्यायला सुरवात केली. आसपास लोक जमा झाले. अबदुल्लाला वाटलं, ज्या राज्यांत गरिबांवर जुलूम केला जातो तें सरकार अतिशय वाईट असलं पाहिजे. लाहोरला असतांनाही गरीब काश्मीरवासीयांना मोलमजुरी करून पैसे कमवावे लागत आणि त्यांतही लोकांकडून चेष्टेचा विषय होत असत. हें अबदुल्लाला सहन होत नसे. अबदुल्लानं सुशिक्षित समाजाकडून किंवा **पुस्तकांतून राजकीय शिक्षण घेतलं नाहीं. तें त्याला व्यवहारांतून आणि रोजच्या अनुभवांतून मिळालं.** पंजाबचे मुसलमान धर्मबांधवही काश्मीरच्या राजकारणांत उत्साहानं भाग घेत. सर शफी आणि दुसरे पंजाबी पुढारी **मुसलमानांना सरकारी नोकऱ्या मिळत नाहींत म्हणून गाऱ्हाणीं नेत. तेव्हां त्यांना ठराविक उत्तर मिळे " मुसलमान लोक तर शिकतच नाहींत.** " आतां सुशिक्षित मुसलमान तरुण पदवीधर होऊं लागले. तेव्हां सरकारनं आणखी एक युक्ती काढून सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचं नाटक रचून लोकांपुढें ठेवलं. त्यांतही उमेदवारानं पहिला, दुसरा किंवा तिसरा नंबर पटकवायला पाहिजे होता; तसंच त्याचं वयही २२ असायला पाहिजे होतं. अभ्यास क्रमांतही अरबी आणि फारशी विषय गाळले होते. काश्मिरी मुसलमान सरकारी नोकरींत जास्त प्रमाणांत घेतले जाऊं नयेत अशी सरकारनं व्यवस्था केली होती. अबदुल्लाला हा अन्याय सहन झाला नाहीं. त्यानं या प्रश्नाच्या विरुद्ध साऱ्या मुसलमानी युवकांना एकत्र आणलं. सारे तयार झाले. त्यांनीं सरकारकडे एक अर्ज करण्याचा ठराव पास केला. पण सहा वर्षांचा आधींचा अनुभव होताच. ते भिऊन सही देण्यास कचरत होते.

पण आतां काश्मिरी प्रजेचीं गाऱ्हाणीं बाहेरच्या प्रान्तापर्यंत पोंचलेली होतीं. १९२९ च्या मार्च महिन्यांत **काश्मीरचे माजी दिवाण सर अलबियन बानर्जींनीं** आपल्या भाषणांत सांगितलं, काश्मीर संस्थानची स्थिती अनुकंपनीय आहे. बहुसंख्यांक मुसलमान लोक निरक्षर आहेत. ते दारिद्र्यामुळं हलाखीस आले आहेत आणि आर्थिक परिस्थिती भीषण स्वरूप धारण करीत आहे. आंधळ्यामेंढ्या लोकांप्रमाणं, त्यांना वागविण्यांत येत आहे. सरकार जनतेपासून अलग पडलं आहे. लोकांना आपलीं न्याय्य गाऱ्हाणीं मांडायलाही संधि मिळत नाहीं. चालू परिस्थिती सुधारण्या-करितां राज्यव्यवस्थेला अगदीं तळापासून बदलण्याची आवश्यकता आहे. राज्यांत जनतेचीं गाऱ्हाणीं मांडण्याकरितां वर्तमानपत्र वगैरे कोणतंच साधन नाहीं. आणि त्यामुळं सरकार प्रजेच्या गरजा व अडचणी समजूं शकत नाहीं. ”

१९२९ च्या लाहोरच्या कॉंग्रेस अधिवेशनांत कांहीं काश्मिरी तरुण गेले. आणि त्यांच्यावर या अधिवेशनाचा परिणाम झाला होता. शेख अबदुल्लाला अर्जावर सह्या घ्यायला फारच त्रास घ्यावा लागला. शेवटीं अर्ज सरकारकडे पाठविण्यांत आला. काश्मीरचे महाराजे त्या वेळेस फ्रान्स देशांत होते. मिस्टर वेकफील्डच्या देखरेखीखालीं एक कौन्सिल राज्यकारभार पहात होतं. त्यांत फक्त एक मुसलमान मंत्री होता. कौन्सिलनं शेखला भेटण्याकरतां बोलाविलं. त्यानं निर्भयतेनं काश्मीरवासीयांच्या अडचणी अन् गाऱ्हाणीं कौन्सिलपुढें ठेविलीं. वेकफील्डवर या गोष्टींचा प्रभाव पडला. जम्मू विभागांतले मुसलमान पंजाबच्या जवळ असल्यामुळं त्यांच्यांत राजकीय जाणीव जास्त प्रमाणांत होती. त्यांना ही गोष्ट माहीत होतांच ते आनंदित झाले. अशा तऱ्हेनं काश्मीर आणि जम्मू

प्रांतांतल्या मुसलमानांचा जनतेच्या आंदोलनांत सहकार झाला. **काश्मिरी मुसलमानांचीं गाऱ्हाणीं पंजाबच्या वर्तमानपत्रांत येऊं लागलीं. शेख बातम्या जमा करून पाठवूं लागला.** त्या वेळेस लाहोरहून निघणारं " इन्क्विलाब " पत्र संस्थानांत येत असे. पण काश्मीर संस्थानांतल्या बातम्या त्यांत आलेल्या पाहतांच त्यावर संस्थानांत बंदी झाली. मग लाहोरहून " काश्मिरी मुसलमान " नांवानं एक पत्र निघूं लागलं. संस्थानांतलं पोस्ट ऑफिस ब्रिटिश सरकारच्या हातीं होतं. संस्थानांत पहिल्या प्रथम प्रती सात अंकांपर्यंत ५००० वर खपूं लागल्या. या पत्रानं काश्मिरी जनतेंत नवचैतन्य निर्माण केलं. आतां संस्थानी सरकारनं पोस्ट ऑफिसांतून या पत्राच्या प्रती लांबवण्यास सुरवात केली. पुन्हां " मजलूम–काश्मीर " च्या नांवानं दुसरं वर्तमानपत्र चालू झालं.

महाराजे फ्रान्सचा दौरा संपवून आले होते. जहागीरदारांनीं त्यांच्या स्वागताकरतां पंडित बल्काकचे बंगल्यावर त्यांना चहापार्टी दिली. पण तिथले प्रकार पाहून मुसलमान जहागीरदारांनीं वाटलं, अशा तऱ्हेनं आपण आपली राजभक्ती दाखवणं शक्य नाहीं: त्यांनीं आपली एक निराळी बैठक बोलावली. मुसलमान जहागीरदारांना आपल्या कमतरतेची जाणीव होती. शेख अबदुल्लाचं नांव प्रसिद्ध झालं होतं. त्यांनीं काश्मीरच्या नवयुवकांचा नेता शेख अबदुल्लाला बोलावलं. शेखही अशा ठिकाणीं जाऊन आपलं वक्तव्य गाजवूं लागला. जनतेची एकजूट करूं लागला आणि पैसेही जमवूं लागला. महाराजांच्या हस्तकांनीं असा सल्ला दिला कीं त्यांनीं हिंदू असो अगर मुसलमान असो यापुढं त्यांनीं कोणत्याच जमातीचें आमंत्रण स्वीकारूं नये.

चहापार्टीच्या निमित्तानं भरविण्यांत येणाऱ्या बैठकींत भाग घेऊन शेख सार्वजनिक वक्ता बनला होता. पण सार्वजनिक सभा घेण्याची वेळ अजून आली नव्हती. त्या वेळेस तो प्रसंग जमा करून त्यावर लेख छापण्याची व्यवस्था करी व ते जनतेंत वांटीत असे. लोकांत जागृती झाली होती. बरेचसे तरुण कार्य करीत असत. शेखला एक मिनिटाचीही फुरसत मिळत नसे. रात्रौ बारा वाजतां तो घरीं परत येई. त्याचं घर शहरांपासून सहा सहा मैल अंतरावर होतं व शहरांत राहायला पैशाची गरज होती. मित्रांनीं त्याला नोकरी धरण्याची सल्ला दिली. संस्थानी नोकरशाहीलाही तरी तेंच पाहिजे होतं. त्यांनीं शेखला ८० रुपये महिन्याची मास्तरकी देवविली. घरून २०–२५ रुपये येत असत. अशा रीतीनं तो नोकरी करून बाकीचा वेळ राजकीय कार्यांत घालवूं लागला.

ईद झाली. जम्मूंत नमाजनंतर खुतबा वाचला जात होता. पोलिस इन्स्पेक्टरनीं पोथी वाचायला मनाई केली. एका कॉनस्टेबलनं कुराणाची पायमल्ली केली. जम्मुवाल्या मुसलमानांनीं या विरुद्ध पोस्टर्स छापविले. कांहीं पोस्टर्स श्रीनगरला आले. शेखनं शाळेंतून सुटी घेतली आणि तरुणांना शहरांत पोस्टर्स डकविण्याच्या कामावर पाठविलं. शेखच्या घराजवळच पोलिसांनीं कांहीं मुलांना पकडलं. शेखनं त्यांना विरोध केला. बोलतां बोलतां ५००० लोकांचा समुदाय जमा झाला आणि त्यानं मुलांना पोलिसांपासून हिसकावून घेतलं. भांडण वाढूं नये म्हणून जवळच्या मशिदींत साऱ्या लोकांना जमायला सांगितलं. **तिथं त्यानं २५ हजार जनतेपुढें पहिलं राजकीय व्याख्यान दिलं. तो घरीं परतला तव्हां २०,००० जनतेचा समूह त्याच्या मागोमाग येत होता. घरांत जातांना जनतेनं पुन्हां त्याला**

**व्याख्यान देण्यास भाग पाडलं व तिथं त्यानं दुसरं व्याख्यान दिलं.**

शेख अबदुल्ला नामधारी पुढारी नव्हता. त्याचं पुढारीपण पुढारी-जनतेंतून निर्माण झालं होतं आणि म्हणूनच सरकार त्याच्याशीं सामना करायला तयार नव्हतं. श्रीनगरपासून १०० मैलाच्या अंतरावर मुजफ्फराबादला त्याची बदली करण्यांत आली. त्यानं विरोध केला. डायरेक्टरनं त्याला भेटायला बोलावलं. शेख म्हणाला, "ही युक्ति योजून तुम्ही मला गप्प बसवूं इच्छितां. पण मी चूप बसणार नाहीं. प्रत्येक जुलमाविरुद्ध आवाज उठविणं माझं कर्तव्य आहे." आपल्या निरक्षर बांधवांची कहाणी सांगतांना शेख अबदुल्लाच्या डोळ्यांतले अश्रू लपूं शकत नव्हते. तो म्हणत होता, **माझ्या धर्मबान्धवांकरितां मी माझं जीवन अर्पण केलं आहे.** मी तुमची नोकरीही याच उद्देशानं केली. मी आठ तास तुम्हांला विकले. बाकीच्या १६ तासांचा मी मालक आहे. डायरेक्टर म्हणाला, "तूं चोवीस तास आमचा नोकर आहेस," शेख उत्तरला," मग मला अशी नोकरी नको आहे." त्या वेळचे शिक्षणमंत्री नवाब खुशरू जंग यांनीं शेखला पैशाचा मोह दाखवून चार समजूतीच्या गोष्टी सांगून पाहिल्या. शेखनं राजिनामा दिला. शिक्षणाधिकाऱ्यांनीं त्याचा राजिनामा मंजूर न करतां त्याला नोकरीवरून काढून टाकण्याची नोटीस दिली. शेखनं उत्तर दिलं, "नोटीस दिल्याबद्दल मी तुमचे आभार मानतों."

**हत्याकांड:**—शेख अबदुल्ला आतां लोकप्रिय पुढारी झाला होता. नोकरी सोडल्यानंतर तर काश्मीरवासी त्याची स्तुती करूं लागले. लोकांचा उत्साह वाढत चालला. ठिकठिकाणीं सभा होऊं लागल्या. सरकारनं त्याच्यावर बंधनं घालण्याचा प्रयत्न केला. पण सभा अशा

बंधनानं थोड्याच वंद पडणार होत्या ! आणि लाखों लोकांना कैद करायला सरकार तयार नव्हतं. सभेंत सरकारी पित्ते येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत पण लोक त्यांना बोलूं देत नसत. आतां कुठं सरकारचे डोळे उघडले. सरकारनं **एक पंच कमिटी नेमली व प्रजेच्या अडचणी समजून घेण्याची घोषणा केली.** पंचायत-कमिटीनं चार जम्मूचे आणि सात काश्मीरचे प्रतिनिधी मागितले. ६०-७० हजारांच्या सभेंत शेखनं या सात प्रतिनिधींचीं नांवं वाचून दाखविलीं. सभा संपते न संपते तोंच संस्थानाबाहेरील एक माणूस उत्साहानं येऊन बोलूं लागला, " सरकार जर राजी नसेल तर सभा भरवा. सभा भरवूं देत नसेल तर हातांत दगडधोंडे घेऊन प्रतिकार करा. " तीन दिवसांनंतर या वक्त्याला पकडण्यांत आलं व त्याच्यावर राजद्रोहाचा खटला चालवण्यांत आला. त्या वक्त्याची ती वागणूक शेखला पसंत पडली नाहीं, पण त्यानं त्याला सोडविण्याची आपल्याकडून शिकस्त केली. खटला तुरुंगांत सुनावणीस आला होता. **बाहेर लोकांची अथांग गर्दी जमली होती. शेखनं लोकांना समजावून सांगितलं: आपण आपले वकील दिले आहेत. जेलच्या दारावर सभा वगैरे घेऊं नका. पण शेखचा हा संदेश सर्वत्र पोंचला नाहीं. दुसऱ्या दिवशीं ११ जुलै १९३१ला लोकांची तुरुंगावर गर्दी जमली. ११ वाजतां शेखला वर्दी मिळाली कीं, तुरुंगासमोरील गर्दीवर मार्शल लॉ पुकारला गेला आहे. पण लोक शांत घरीं पोहोंचतील असं समजून तो निश्चिंत राहिला. पण भराभर दुकानं बंद पडलीं. आणि शेवटीं गोळयांचा आवाज ऐकूं येऊं लागला.**

**शेखनं आतापर्यंत मुसलमान प्रजेला घेऊन चळवळ चालविली होती. त्याला वाटलं होतं, दुसरी जनता या लढ्यांत भाग घेणार नाहीं. पण त्याच्या या लढ्यांत त्याला इतर जनतेशीं विरोध करावयाचा नव्हता. त्याला सरळ सरकारशीं भांडायचं होतं.** तुरुंगांच्या पटांगणांतील मेलेल्या माणसांना शहरांत आणलं तर जातीय दंगा होईल ही भीति होती. फक्त जखमी झालेल्या लोकांना शहरांत पाठवून बाकीच्या हुतात्म्यांची शवं बाहेरच्या मशिदींत ठेवलीं जातील अशी त्यांनीं व्यवस्था केली. पण कांहीं लोक एका जखमी माणसाला शहरांत घेऊन येत होते. एका हिंदूनं दुकान बंद केलं नाहीं. बाचाबाची झाली. रस्त्यावरील लोकांनीं त्याचं सामान रस्त्यावर फेकायला सुरुवात केली. लुटालूट सुरू झाली. आणि राजकीय संघर्षानं जातीय दंग्याचं स्वरूप घेतलं. शेख जुम्मा मशिदींत गेला आणि पुष्कळशा लोकांना त्यानं तिथंच थोपवून धरलं.

लोकांनीं तुरुंगाच्या हत्याकांडाचं वर्णन असं दिलं: दोन तीन हजार लोक तुरुंगाच्या दारांत जमा झाले. न्यायाधिश येतांच दार उघडलं व सारे लोक आंत घुसूं लागले. तुरुंगाधिकारी लोकांना थांबवूं शकले नाहींत. मुख्य न्यायाधिशाला टेलिफोन केला. इकडे न्यायाधिश लोकांना समजून सांगत होता कीं, त्यांनीं शांततेनं घरीं जावं, नाहींतर प्रकरण चिघळेल. लोक बाहेर आले. कांहीं नमाज पढूं लागले व कांहीं जागा पाहून बसले. त्याच वेळेस मुख्य न्यायाधिश तिथं येऊन पोहोंचला. तो पिसाळला होता. त्याची सारासार विचार बुद्धि नष्ट झाली होती. लोकांना कैद केलं नाहीं म्हणून तिथल्या पोलिस इन्स्पेक्टरला त्यानं तिथल्या तिथंच कामावरून काढून टाकलं. लोकांना तो हातकड्या घालूं लागला. **लोकांची प्रतिकारशक्ति**

**जागी झाली. त्यांनीं दगडधोंडे मारण्यास सुरवात केली. मग डायरनं गोळी चालवायचा हुकूम सोडला. काश्मीरला जालियनवाला बागची पुनरावृत्ती झाली. असेच प्रसंग या आधीं बारामौला, सोपोर, हंडवारा, सुडी, अनंतनाग, मीरपूर, कोटरी, जम्मू, पूंच्छ, वगैरे ठिकाणीं घडले होतेच. कितीतरी लोकांनीं बलिदान दिलं!**

धरपकड :—**दुसऱ्या दिवशीं चार वाजतां शेख अबदुल्ला पकडला गेला.** त्याच्याबरोबर आणखी बरेच पकडले गेले. शेखला हरी पर्वतच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलं. शहरवासीयांनीं २१ दिवस दुकानं बंद ठेवून हरताळ पाळला. काश्मीर आणि अखिल हिंदुस्थानांत या हत्याकांडाच्या बातम्या पसरूं लागल्या. मार्शल लॉ आणि गोळी चालवूनही जनतेच्या उत्साहाला सरकार बांध घालू शकलं नाहीं. **शेवटीं सरकारला शेख आणि त्याच्या सहकाऱ्यांना सोडण्यास भाग पाडावं लागलं.** हत्याकांड आणि इतर अत्याचारांची तपासणी व्हावी म्हणून एक कमिटी स्थापण्यांत आली. पण या कमिटीवर जनतेचा विश्वास नव्हता. तिनं असहकार पुकारला.

लोकांच्या मागण्यांपुढं सरकार चूप बसू शकलं नाहीं. नोव्हेंबर १९३१ मध्यें राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्याकरितां बी. ग्लेन्सीच्या नेतृत्वाखालीं या कमिशननं तपासणी करून निर्णय दिला कीं, " बहुसंख्येच्या प्रमाणांत नोकऱ्या मिळाव्या. बळकावलेलीं पवित्र क्षेत्रं परत करावीं. भाषण आणि मुद्रण यांचं स्वातंत्र्य देण्यांत यावं. आणि संस्थानांत निरनिराळ्या जातीय लोकसंख्येच्या मानानं प्रतिनिधी

घेऊन एक मध्यवर्ती कमिटी स्थापन करावी." पण हा सारा निर्णय धाब्यावर बसवण्यांत आला.

**मुस्लिम कॉन्फरन्स:**—या चळवळीला स्थायी स्वरूप आणण्याकरितां तिला व्यापक स्वरूप द्यायला हवं होतं. जम्मू, काश्मीर मुसलमानांनीं एक परिषद भरविली. **पहिली परिषद श्रीनगरच्या दगडी मशिदींत भरली. शेख** अब्दुल्ला **या परिषदेचा अध्यक्ष होता.** तो आपल्या भाषणांत म्हणाला, " बंधूनो, ! काश्मीरवासीयांना जग, एक भेकड, सनातनी, दरिद्री अन् असंस्कृत म्हणून ओळखतं..... पण आतां ही जात मागच्यासारखी अवहेलली जाणार नाहीं. ईदींची आणि कुराण वाचण्याच्या मनाईनं लोकांच्या भावनांची पायमल्ली केली जात आहे. आतांपर्यंत असं घडलं......पण **आमची ही चळवळ जातीय चळवळ नाहीं. साऱ्या जनतेच्या अडचणी दूर सारण्याकरितां ही चळवळ उभारली जात आहे. तुम्ही हिंदु असा वा शीख असा, माझ्या साऱ्या देशबांधवांना मी विश्वास देऊन सांगतों कीं, त्यांच्याही साऱ्या अडचणी दूर सारण्याकरितां मी सदैव तयार आहें." याच परिषदेचा दुसऱ्यांदाही तोच अध्यक्ष होता.**

**मुस्लिम कॉन्फरन्सकडून नॅशनल ( राष्ट्रीय ) कॉन्फरन्सकडे:**—१९३३-३४ च्या राजकीय संघर्षानिमित्त त्याला जम्मू विभागांत जावं लागलं. काश्मीरमधले ५०–६० हजार हिंदू सोडले तर बाकी सारे मुसलमान आहेत. जम्मूमध्यें तर जवळ जवळ हिंदूंचीच वस्ती आहे. शेख अब्दुल्लाचा त्याग अन् जनतेचा संघर्ष बघून सरकारनं कांहीं सुधारणाही केल्या. त्याचा फायदा या गरीब जम्मू

९३५८

जनतेला मिळाला होता. ते शेख अब्दुल्लाकडे केवळ एक मुस्लिम नेता म्हणून बघत नव्हते. त्यांनीं शेरे काश्मीरचं मोठ्या प्रमाणांत स्वागत केलं. शेखनं परिस्थिती पाहून विचार केला. त्यानं चळवळ सुरू केली. त्यांतून केवळ मुसलमानांना फायदा मिळणार नाहीं तर हिंदूनाही मिळेल; कारण हिंदू आणि मुसलमान प्रजा राज्यकारभाराखालीं सारखीच पिळली जात आहे. आतां त्यानं आपल्या चळवळीला जातीय वादाच्या कक्षेतून बाहेर काढलं. साऱ्या जनतेची चळवळ बनविण्याचं धोरण आखलं. १९३५ च्या सुरवातीस त्यानं भाषण केलं "पंजाबच्या कांहीं बेगडी नेत्यांनीं आपली ही चळवळ जातीय चळवळ आहे, असा प्रचार चालविला आहे. आतांपासून संस्थानांतील राजकीय आंदोलन अखिल भारतीय कॉंग्रेसच्या सिद्धान्तानुसार चालेल. थोडासा वेळ लागेल. पण लौकरच आपण आपल्या चळवळीवरील जातीय कलंक दूर सारून, मग यांत कांहींही विघ्नं येवोत, आगेकूच करूंच."

काश्मीरला परतल्यावर हिंदूमुसलमानांच्या एकजुटीचं अभिनंदन करतांना तो म्हणाला, "आमचा लढा आमच्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां आहे. या, यांत सामील व्हा. आपण सारे मिळून या जातीय संकुचित विचारांना दूर सारून वर जाऊं आणि अखिल जनतेच्या हितासाठीं कार्य करूं. मी आपल्या हिंदुबांधवांना प्रार्थना करतों कीं, त्यांनीं भीती आणि शंका दूर सारून या लढ्यांत भाग घ्यावा."

पांचवी कॉन्फरन्स १९३७ मध्यें पुंच्छला भरली. अध्यक्षीय भाषणांत तो म्हणाला, "शतकानुशतकं दारिद्र्यानं गांजलेले आणि जनावरांप्रमाणें जीवन घालविणारे लोक आतां जागे झाले. जगूं किंवा मरूं हा आवाज उंच करीत ते आगेकूच करीत चालले...

कैद, अंधार कोठडी, गोळया, भाले, तरवारी, वेतलाठीमार आणि दंड यांना न जुमानतां माणुसकीचे हक्क मिळविण्याकरितां ते वाटेल तो त्याग करण्यास तयार झाले आहेत--"

**तो आंदोलन जसजसं पुढं नेऊं लागला तसतसे त्याचे विचार व्यापक होत गेले.** आणि दैनंदिन लढ्याच्या अनुभवानं त्याचा दृष्टिकोण गंभीर होत गेला. **त्यानं अगोदर साध्या मुसलमान लोकांची स्थिति सुधारण्याकरितां लढा सुरू केला. नंतर त्याला कळलं: काश्मीरची मुसलमान व हिंदू प्रजा एकाच राज्याखालीं भरडली जात आहे. तेव्हां त्यानं दोन्ही पक्षांना संघटित करून लढा उभारण्याचं धोरण निश्चित केलं आणि याहीपेक्षां चळवळींत अधिक खोल गेल्या-नंतर त्याला कळलं कीं, या साऱ्या अडचणींत खरं कारण श्रीमंती आणि भांडवलशाही हें आहे. ही गोष्ट त्यानं १९३८च्या जम्मू कॉन्फरन्समध्यें बोलून दाखविली.** "भांडवलदार हिंदू राज्याला धोका आहे असं म्हणून, धर्म आणि हिंदू संस्कृतीवर आपत्ती आहे असं म्हणून, जनतेला आंधळे बनवीत आहेत. त्यांना आपल्या जीवनाच्या वास्तववादी ज्ञानापासून पराङ्मुख करण्याचं आमिष दाखवित आहेत... जे एकदोन मुसलमान भांडवलदार संस्थानांत आहेत, ते आपल्या चळवळीपासून कातडी बचावीत आहेत. एवढंच नव्हे तर कठीण प्रसंग येतांच स्वातंत्र्यसंग्रामाविरुद्ध सरकारचे हस्तक बनून दडपशाहीचा वरवंटा फिरवायला हात लावीत आहेत. काश्मीरच्या स्वातंत्र्यलढयांत हिंदू, मुसलमान आणि शीख भांडवलदारांचं हें असं धोरण आहे. म्हणून याविरुद्ध हिंदू, मुसलमान, शीख, एकंदर

जनतेनं एकजूट करून यांच्याविरुद्ध लढा उभारण्याची अत्यंत आव-श्यकता आहे. म्हणून मी सांगतों, आतां आपलं या पुढील काम म्हणजे पुढच्या **आर्थिक आणि राजकीय लढयांत जातीय प्रश्नांना केवळ मूठमाती देऊन आपण पूर्णपणें राष्ट्रीय बनलं पाहिजे.** तसंच वयांत आलेल्या प्रत्येक स्त्री पुरुषानं मत देण्याचा अधिकार घेऊन जनतेचं संयुक्त अधिकारी मंडळ स्थापन केलं पाहिजे. त्याकरितां लढा उभारला पाहिजे."

१९३९ मध्यें मुस्लिम कॉन्फरन्स हें पहिलं नांव बदलून "जम्मू काश्मीर राष्ट्रीय कान्फरन्स" हें नांव दिलं गेलं. त्यानंतर जगाच्या प्रगतिपर विचारप्रवाहाबरोबर शेख अबदुल्लाही जनतेची प्रचंड पुरोगामी एकजूट बांधण्यांत गढून गेला आहे.

१९४५ मध्यें श्रीनगराला पहिला मेदिन साजरा करण्यांत आला. त्या वेळेस मजदूर सभेतर्फे भरविण्यांत आलेल्या २०,००० नागरिकांसमोर त्यानं आपल्या ओघवती भाषेंत सांगायला सुरवात केली: " जर हिंदी जनतेनं या पूर्वींच एकजूट केली असती, तर आज सॅनफ्रॉन्सिको परिषदेला नून व मुदलीयार यांच्या ऐवजीं जीना व जवाहरलाल आपणाला हजर राहिलेले दिसले असते." त्याच वेळेस त्यानं काश्मीमध्यें नॅशनल कॉन्फरन्स व मुस्लिम कॉन्फरन्स यांची एकजूट झाल्याबद्दल समाधान व्यक्त केलं व अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठीं ही एकजूट आणखी बळकट करण्याचा त्यानं संदेश दिला.

याच वेळेस त्यानं कम्युनिस्ट पक्षाच्या लाल दलाच्या २०० स्वयंसेवकांची मुठी वळवून लाल सलामी हसत मुखानं घेतली. नॅशनल कॉन्फरन्सचे व या मुख्य राष्ट्रीय संस्थेचे जनरल सेक्रेटरी मौलवी महमद सय्यद यांच्या हस्तें लाल झेंडा फडकवण्यांत आला होता.

त्यानंतर १९४५ ऑगस्टमध्यें काश्मीर राष्ट्रीय परिषदेचं अधिवेशन सोपोर इथं भरवलं होतं. या अधिवेशनांत स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला संपूर्ण पाठिंबा मिळाला. आणि स्वयंनिर्णयाच्या आधारावर कॉंग्रेस आणि लीगची एकजूट घडवून आणली पाहिजे, अशी घोषणा केली गेली. आपल्या अध्यक्षीय भाषणांत शेख म्हणाला, "आमच्या देशांतील दोन महान् संस्थांनीं आणि त्यांच्या पुढाऱ्यांनीं आपसांतील मतभेद मिटवून दोन्ही संस्थांची एकी घडवून आणण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे, अशी त्यांना विनंती करणं मी माझं कर्तव्य समजतों. आमच्यामध्यें फाटाफूट असल्यामुळं आपली प्रगति खुंटलेली आहे." स्वयंनिर्णयाच्या हक्काबद्दल बोलतांना तो म्हणाला, "जें चांगलं आहे तें दुसऱ्यानं प्रतिपादन केलं असलं तरी, त्याचा स्वीकार करण्याचं सामर्थ्य आपल्यांत असलं पाहिजे. मुस्लिम धोरणाचं परीक्षण करून त्यांत जें सत्य असेल, त्याला मान्यता देणं हें आपलं कर्तव्य आहे."

या परिषदेला हजारोंनीं लोक जमले होते व त्यांनीं अंतःकरणपूर्वक आपल्या पुढाऱ्याच्या एकजुटीच्या घोषणेचं स्वागत केलं.

शेख अबदुल्ला यांच्या नेतृत्वाखालीं काश्मीरची राष्ट्रीय चळवळ नव्या प्रवाहाकडे कशी वहात जात आहे, हें त्यांनीं परिषदेच्या मंडपांत लावलेल्या घोषणापटावरून दिसेल.

काश्मिरचं औद्योगीकरण करा. जबाबदार राज्यपद्धती स्थापन करा. काश्मीर कामगारांसाठीं, काश्मीर शेतकऱ्यांसाठीं भांडवलशाहीचा नायनाट करा. साम्राज्यशाहीचा नायनाट करा. इत्यादि घोषणांवरून लोकशाही आणि स्वयंनिर्णय यांच्या आधारावरच काश्मीरच्या राष्ट्रीय चळवळीची एवढी प्रचंड वाढ झाली आहे हें स्पष्ट दिसून येतं.

अनुक्रम २८८३८
विभाग वा. वा.
क्रमांक १०१२
नों. दि. ३१/३/४९

# कॉ. युसूफ

उत्तर भागांत कॉम्रेड युसूफला न ओळखणारा एकही माणूस मिळणार नाहीं. त्यानं हिंदुस्थानातलं मँचेस्टर म्हणून ओळखलं जाणाऱ्या कानपूर शहरांतल्या कामगारांत नवचैतन्य निर्माण केलं. तो कामगारांचा कामगारांतूनच निर्माण झालेला नवा नेता आहे. त्यानं कामगारांत मिळून मिसळून त्यांच्या सुखदुःखाचे अनुभव घेतले. ( त्याच्यावर दिल्ली, मुंबई, अहमदाबाद आणि . कानपूरच्या कामगारांत कवनं गायलीं जात आहेत. ) युसूफचं जीवन साहस आणि लढा यांनीं भरलेलं आहे. तो प्रतिभावानही आहे. पण त्यानं आपली सारी प्रतिभा कामगारांची क्रांतिमय एकजूट करण्यांत घालविली आहे.

युसूफचा जन्म केव्हां झाला असेल हें त्याचं त्यालाही नक्की माहित नाहीं. झेलम नदी कांठीं चकदानीयाळ गांवीं तो बहुतेक १९०९ मध्यें जन्मला असावा. त्या वेळीं त्याचे वडील तारासिंह लाहोरला रेल्वेंत कारकुनी करीत होते. त्याची आई लक्ष्मीदेवी हिनं या आपल्या मुलाचं नांव संतसिंह ठेवलं. संतसिंह पांच महिन्याचा असतांनाच त्याची आई मरण पावली. तिनं मरतेसमयीं आपल्या मुलाला आपल्या आईच्या मांडीवर ठेवून अश्रुपूर्ण नेत्रानं सांगितलं, " आई, आतां तूंच याची आई आहेस. " आजीनं संतसिंहाला बकरीचं दूध पाजून वाढवलं.

आतां संतसिंह सरस्वतीदेवीचाच मुलगा होता. ती फारच गरीब स्वभावाची बाई होती. आपल्या एकुलत्या एका मुलावर तिचं

फार प्रेम होतं.

**बाल्य**:--संतसिंह लहानपणापासूनच अंगानं चांगला घडधाकट होता. तो खूप खेळत असे. पण आजचा हा हजारों कामगारांचा नेता लहानपणीं आपल्या मागासलेल्या गांवातल्या मुलांचा नेता होता.

**शिक्षण**—वयाच्या पांचव्या वर्षापासून तो उर्दू शिकूं लागला. पुढच्या शिक्षणाची गांवांत सोय नसल्यामुळं तो **पिणवळा** गांवच्या धर्मशाळेंत गुरुमुखी शिकूं लागला. दोन वर्षांच्या आंतच त्यानं जवजी, रहरास, कर्निन, सोहिला वगैरे धार्मिक पुस्तकं वाचून काढलीं.

या शिक्षणानं फायदा होण्यासारखा नव्हता म्हणून आजीनं आपल्या सात वर्षांच्या नातवाला पिणवळच्या शाळेंत दाखल केलं. त्यानं तिथं पांच वर्षांत पांचव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलं. शिक्षणांत तो हुषार विद्यार्थी होता आणि प्रत्येक वर्षीं आपल्या वर्गाचा तो मॉनिटर होत होता. पुढचं शिक्षण मिळालं असतं तर त्याला शिष्यवृत्ती मिळाली असती आणि पुढच्या शिक्षणाचा मार्गही खुला झाला असता.

आजीनं त्याला सातवीपर्यंत शिक्षण दिलंहि असतं. मग त्याला पटवारी किंवा मास्तरकीचं काम मिळालं असतं. पण आतां मिड्ल ( सातवी ) पास झालेल्यांना तितकी किंमत नव्हती. म्हणून तिला वाटलं कीं, संतसिंहानं कांहीं तरी काम शिकावं. त्याचा मामा संतसिंहाला आपल्याबरोबर घेऊन गेला आणि त्याला एका हार्मोनियम दुरुस्तीच्या दुकानांत काम शिकायला ठेवलं. तो तिथं पांच-सहा महिने राहिला. पण दुकानचा मालक त्याला शिकवण्यापेक्षां त्याच्याकडून हमालीचीं कामंच जास्त करून घेई. शेजारीं एक कांच सामानाचं दुकान होतं. संतसिंह त्याच्याकडे काम करूं

लागला. त्यानंतर आगगाडींत दंतमंजन, पावडर वगैरे विकण्याचं काम करू लागला. त्यानं एक लहानसं भाषण पाठ केलं. **लाहोर** ते **अटारी** पर्यंत गाडीचा पास घेऊन तो विक्री करूं लागला. त्याला महिना पंधरा वीस रुपये मिळत असत. दोन तीन महिने हें काम केल्यानंतर तो जुवेबाजांच्या तावडींत सांपडला. पांच दिवसांची कमाई घालवून बसला. तिकडे मालकाला पांच रुपये द्यायचे होते. शेवटीं मामाच्या खजिन्यांतली चोरी केली. मामाला कळलं. त्यानं त्याला तंबी दिली आणि आजीला लांबलचक पत्र लिहिलं. पोस्टांत पत्र टाकायची कामगिरी भाच्यावरच सोपविली. भाच्यानं पत्र वाचलं व पाकिटांत कोरा कागद घालून पत्र पोस्टांत टाकलं. संतसिंह आजीच्या रागाला भीत असे. तो तसाच स्टेशनवर पळाला. तिथं त्याला एक सोडा वॉटरचा व्यापारी भेटला. त्याच्याबरोबर तो दिल्लीला निघून गेला. पण त्या सोडेवाल्यानं हा गोरागोमटा निदेखणा छोकरा पाहून त्याच्या खोड्या काढायला सुरवात केली. संतसिंह त्याच्या तावडीतून पळाला आणि दिल्लींत आपल्या काकाकडे गेला. काकानं मोठ्या ममतेनं पुतण्याला ठेवून घेतलं आणि त्याच्या मामाला पत्र लिहिलं. संतसिंह दोन महिनेपर्यंत शहरांत बिस्किटं विकण्याची फेरी करूं लागला.

संतसिंहाचे वडील त्या वेळीं लालामूसा स्टेशनावर कारकून होते. ते आले आणि आपल्याबरोबर मुलाला घेऊन गेले. त्यांची आणि एका स्टेशन अधिकाऱ्याची ओळख होती. त्यानीं संतसिंहाला नोकरी देण्याची शिफारस केली. अगोदर कांहीं काळ हातोड्यानं गाडीचे डबे ठोकण्याचं हमाली काम केल्यानंतर मग नंबर टेकरचं काम दिलं जाईल, या आश्वासनावर वडलांनीं मुलाला कामावर लावलं. संतसिंह आतां १६ रु. पगारवाला हमाल बनला. वडलांना वाटत

होतं कीं लौकरच मुलाला नंबर टेकरची जागा मिळेल. संतसिंहानं हें काम २० दिवसही केलं नाहीं तोंच त्याची आजी तिथं येऊन धडकली. आपल्या नातवाच्या अंगावर हमालाचे निळे कपडे पाहून तिच्या काळजांत चर्र झालं. ती आपल्या जावयाशीं भांडली आणि त्याचं कांहींही न ऐकतां नातवाला गावीं घेऊन आली. संतसिंहानं आजीला साऱ्या गोष्टी समजावून सांगितल्या. तेव्हां कुठं त्याला तीन महिन्यानंतर बापाकडे जायला परवानगी मिळाली. पण इकडे बापानं मुलाच्या नोकरीचा राजीनामा दिला होता. आतां ती नोकरी मिळणं शक्य नव्हतं. बापानं त्याला हिंदी शिकण्यासाठीं रावळपिंडीला पाठवलं. तिथं हिंदी शिकून तो ३–४ महिने एका दुकानांत मुनीम होता. नंतर तो आजीकडे परतला आणि तिच्यामागं लागून त्यानं पुन्हां शाळेंत जाण्याची परवानगी मिळवली.

संतसिंह पुन्हां त्या **पिणाक्का** शाळेंत गेला. त्याच्या बरोबरीचीं मुलं पुढच्या वर्गांत गेलीं होतीं. संतसिंहाला खालच्या वर्गांत शिकण्याची लाज वाटूं लागली. त्यानं आपल्याला पुढच्या वर्गांत बसविण्याची मास्तरांना विनंती केली. मास्तरानं त्याच्याजवळ गेल्या दीड वर्षाची फी मागितली. त्याच्या गरीब आजीला इतका पैसा देणं शक्य नव्हतं. तो तसाच घरीं परतला.

खेवडांतल्या मिठाच्या खाणींत आजीच्या माहेरच्या लोकांनीं ठेका घेतला होता. संतसिंह त्यांच्याकडे निघून गेला. त्यांनीं त्याला मुनिमी शिकवण्याकरितां एका महाजनाकडे ठेवलं. पण शिकवण्या-ऐवजीं त्याच्याकडून जास्त कामं करवून घेण्यांत येत असत. तो तिथून दुसऱ्या दुकानांत नोकर राहिला. दुकानांत विकण्याकरतां बरीचशीं खेळणीं होतीं. यानं एक खेळणं विकून पैसे स्वतःकरितां खर्च केले. मालकानं विचारतांच अगोदर नकार दिला, नंतर कबुली

दिली. मग मालक त्याच्याशीं वाईट रीतीनं वागूं लागला. अशा तऱ्हेनं या दोनही दुकानांत चार महिने नोकरी केल्यानंतर तो तिसऱ्या दुकानांत गेला. **तिथं तर याच्याकडून भांडीं घासण्याचं काम करवून घेऊं लागले.** हें आजीला कळलं. ती म्हणाली, “ क्षत्रियाच्या वंशांतला नातू दुसऱ्याचीं उष्टी भांडीं घांसणार नाहीं !” गरीब असूनही ती हा अन्याय सहन करूं शकली नाहीं. आजीनं संतासिंहाला बोलावून घेतलं. मग वडिलानं त्याला **पिळयाणवळी**-गांवीं आपल्या एका मित्राकडे पाठवून दिलं.

**संतसिंहाला १६ रु. महिन्याची हमाली मिळाली. त्यानं दोन वर्षपर्यंत हें काम केलं.** तो आतां १८ वर्षांचा होता. रेल्वे कामगारांनीं अन्यायाविरूद्ध संप पुकारला होता. संतासिंह आपल्या वडिलांच्या मित्राकडे रहात होता व पंखा ओढण्याचं काम करीत होता. कामगारांच्या सभेंत तो हजर राहिला आणि त्यानं संपांत भाग घेतला.

त्याच्या वडिलांच्या मित्राला वाटलं: संतसिंह आपल्या बाजूचा आहे व तो संपांत भाग घेणार नाहीं. पण सारे कामगार संपावर जातील; पण आपण काम करून संप फोडण्याचा प्रयत्न करूं ही कल्पनाच असह्य होती. संप तात्पुरता दोन दिवस टिकला. नंतर कामगार कामावर जाऊं लागले. पण मग तो तिथं राहिला नाहीं. तो लाहोरला निघून आला.

इथं कामगारांची भरती होत होती. पण त्याला वाव मिळाला नाहीं. चकदानियाळचा एक मेकॅनिकल एंजीनियर लाहोर शहराच्या इलेक्ट्रिक खात्यांत नोकरीला होता व त्याची संतासिंहाच्या आजो-बाशीं चांगली घसट होती. त्यानं संतसिंहाला वीज खात्यांत हमा-लाचं काम देवविलं. त्याला रोजीं १४ आणे मिळूं लागले. तो हें

काम दक्षतेनं शिकला. आणि लौकरच असिस्टंट फिटर बनला. आतां त्याला १–२ रु. रोज मिळूं लागला. त्याला सवाईचं कामही मिळूं लागलं. व तो ४० रु. महिना मिळवूं लागला. रात्रीच्या शाळेंत जाऊन तो इंग्रजी शिकूं लागला. एक वर्षही झालं नाहीं तोंच विजेचा कारखाना तिथून शाहदऱ्याला नेण्यांत आला. नवी भरती झाली. त्याच्या ओळखीचा एंजीनियरही नोकरीवरून निघाला व त्याला दिल्लीच्या एका मिलमध्यें या पगारापेक्षांही जास्त २५० रुपयाची दुसरी नोकरी मिळाली. संतसिंह आजीकडे परतला. या दरम्यान त्याचे आजोबा मरण पावले होते. दीड महिना राहून तो दिल्लीला आला.

**दिल्लींतले कामगार**:—वडिलांच्या गांवचे राय हरिराम दिल्लीच्या एका मिलमध्यें डॉक्टर होते. डॉक्टरांनीं आणि मावशानं शिफारस लावून संतसिंहाला त्या मिलमध्यें ४० रु. महिन्याची फिटरची नोकरी देवविली. तिथं त्यानं दोन अडीच वर्षं काम केलं. नंतर बिडला मिल्समध्यें कामास राहिला.

झाबवालानं दिल्लींत एक कामगार संस्था स्थापन केली होती. शंकरलाल, डॉ. अनसारी आणि असफअली त्या संस्थेचे व्यवस्थापक होते. कामगारांच्या वतीनं आपलं पुढारीपण कायम रहावं, हाच केवळ यांत उद्देश होता. १९२८ मध्यें संतसिंह इथं जाऊं येऊं लागला. १९२९ मध्यें तो या संस्थेंत काम करूं लागला. त्या वेळेस भगतसिंहावर खटला चालला होता. तो वर्तमानपत्रें नियमितपणें वाची. त्याच्या मनांत देशभक्तीचे अंकूर फुटूं लागले. त्याला अजून रशियन क्रान्ती आणि समाजवादाचं नांवही माहित नव्हतं. पण गरिबांचं राज्य असावं असं मात्र त्याला मनापासून वाटे. तो शीख धर्माचा

अनुयायी असल्यामुळें शांतताप्रिय नव्हता. पं. मोतीलाल नेहरूसारखे मोठमोठे पुढारी दिल्लींत येत. तो त्यांची व्याख्यानं ऐके.

**दुसरा कामगार संप**:—जागतिक मंदीला सुरवात झाली. मिलमालकांनीं कामगारांवर पगारकपातीची आणि त्यांना बेकार बनविण्याची आपत्ती आणली. कामगार चूप बसायला तयार नव्हते. १९२९ च्या शेवटीं दिल्लीच्या कामगारांनीं सार्वजनिक संप पुकारला. मालकांना कामगारांच्या कांहीं मागण्या मान्य कराव्या लागल्या. पण सात आठ पुढारी कामगारांपैकीं संतसिंह होता. त्यांच्याबरोबर यालाही नोकरीवरून काढण्यांत आलं.

दोन तीन महिन्यानंतर लाहोर कॉंग्रेसचं अधिवेशन भरलं. संतसिंह तिथं हजर राहिला. दिल्लींतल्या गुरुद्वारांत तो रोज जात असे. शीख तरुण संघाचा तो अध्यक्ष होता.

१९३० मध्यें सत्याग्रह सुरू झाला. सत्याग्रहांत त्याला भाग घ्यायचा होता. पण कांहीं पूर्व परिचित कॉंग्रेसवाल्यांनीं त्याच्यावर सरकारचा माणूस म्हणून आरोप ठेवला. पहिल्यानं तो टेबलाजवळ बसून व्याख्यानं ऐकत होता तर आतां लाजून सर्वांच्या मागें उभा राहून व्याख्यानं ऐकूं लागला. पण कामगारांत अजूनही त्याला स्थान होतं आणि रोज मिलच्या फाटकावर जाऊन तो भाषणें करीं. शंकरलाल आणि दुसरे कॉंग्रेसचे पुढारी तुरुंगांत गेले होते. एक दिवस तो कॉंग्रेसच्या सभेंत येऊन बोलला. पोलिसांनीं त्याला पकडलं. १९३० मध्यें कोर्टानं त्याला ६ महिन्यांची शिक्षा दिली. दिल्ली व मान्तगोमेरी तुरुंगांत त्याला ठेवण्यांत आलं. गांधी–अर्विन तहानंतर त्याची सुटका झाली. शंकरलाल या कॉंग्रेस पुढाऱ्यानं तीन चार कार्यकर्त्यांना सरकारचे हस्तक या नांवानं बदनाम करून टाकलं होतं. दिल्ली खटल्यांत भाग घेतलेले विश्वंभरही

होते. त्यांनीं तुरुंगांत शेवटला श्वास सोडला. **मान्तगोमेरी** तुरुंगांत संतसिंहानं साम्यवादावरील कांहीं पुस्तकें वाचलीं. दिल्लीच्या गिरणींत काम करीत असतांना एक मास्तर ठेवून त्यानं इंग्रजीचाही अभ्यास केला. त्याला • तिसऱ्या दर्जाच्या एंजीनियरचं सर्टिफिकेट मिळालं होतं. दुसऱ्या दर्जाचा एंजीनियर बनायला जास्त इंग्रजी शिकण्याकरतां त्यानं सतत दीड वर्ष प्रयत्न केला. त्याचा फायदा त्यानं तुरुंगांत करून घेतला. इंग्रजी भाषेंतलं साम्यवादी वाङ्मय त्यानं वाचून टाकलं.

१९३१ मध्यें संतासिंह सुटून आला. शंकरलालला साऱ्या कामगार पुढाऱ्यांनीं त्यांची चूक दाखवून दिली. त्यानं संतासिंहाच्या सच्चा-ईची ग्वाही दिली आणि आपली चूक कबूल केली. आतां साऱ्या लोकांचं त्याच्याबद्दल चांगलं मत झालं. दिल्लींत नवभारत सभा झाली. युसूफ तिचा सेक्रेटरी बनला. तीन महिने काम केलं नाहीं तोंच तो पकडला गेला. तीन चार महिने तो तुरुंगांत होता. फेरत-पासणींत तो सुटला गेला. काकोरी प्रकरणांत पोस्टर्स लावल्याबद्दल त्याला १५ दिवसांची शिक्षा मिळाली होती. त्याला अजून समाज-वादाचं पुरेसं ज्ञान नव्हतं. पण कामगार—शेतकऱ्यांचं राज्य व्हावं असं मात्र त्याला वाटे.

१९३३ मध्यें एका भाषणाबद्दल त्याच्यावर १२४ अ काय-द्यान्वयें खटला भरण्यांत आला. आतांपर्यंत तो तिसऱ्या वर्गाचा कैदी बनत आला होता. तुरुंगांत त्यानं बघितलं: ज्या तरुणांना घेऊन त्यानं लढा उभारला होता, ते तरुण तिसऱ्या वर्गाच्या राजबंद्याकडे आकर्षिले जात आहेत. त्यानं डॉ. हरीरामला साक्षींत आणून सांगायला लावलं कीं संतसिंह उच्च घराण्यांतला आहे. कोर्टानं त्याला एक वर्षाची शिक्षा आणि दुसरा वर्ग देवविला व कांहीं

दिवस दिल्लींतल्या तुरुंगांत ठेवला. नंतर त्याची मुलतान जेलमध्यें बदली झाली. इथं तो अभ्यासू बनला आणि इंग्रजीही शिकूं लागला. इथं त्याची चौधरी शेरजंगशीं ओळख झाली. दोघांत खूप दाट मैत्री झाली आणि शेरजंगकडून त्याला साम्यवादी अभ्यासांत मदत मिळूं लागली. मिरत कम्युनिस्ट कटाच्याही बऱ्याचशा गोष्टी त्याला समजल्या. आणि आतां तो या निर्णयावर येऊन पोहोंचला कीं हिंदुस्थानांत रशियासारखं कामगार-शेतकऱ्यांचं राज्य असावं. बाबा कर्मसिंहही रशियाला जाऊन आले होते व मुलतान जेलमध्यें सरकारचा पाहुणचार भोगित होते. त्यांनीं रशियाची बरीच माहिती पुरवली. संतसिंह तिथं साधारण कार्यकर्त्यांचा नेता म्हणून आला होता. तुरुंगाधिकाऱ्याशीं भांडण्याकरितां त्यानं एक "धौस कलास" नांवाचं मंडळ बनविलं. संतसिंहाची कम्युनिस्टांवर श्रद्धा बसूं लागली. दुसरे लोक त्याला "कॉम्रेड" म्हणूं लागले. धर्मावरून त्यांचा विश्वास उडून गेला आणि तिथंच त्यानं दाढी आणि केसांना चाट दिली. असफअलीबरोबर कम्युनिझ्म, सोवियत रशिया आणि दहशतवाद यांवर वादविवाद होत असे. दहशतवादापेक्षां मिरत कटाचा मार्ग त्याला आवडला होता. तिथंच टहलसिंहाकडून त्याला कांहीं इतर मित्रांचा शोध लागला होता. सप्टेंबर १९३३ मध्यें त्याला लाहोरला आणून सोडण्यांत आलं. पण सुटतांच पोलिसांनीं त्याला हुकमाशिवाय १५ दिवस स्टेशनवर डांबून ठेवलं.

**दिल्लीहून कूच**:--संतसिंह लाहोरहून दिल्लीला आला आणि दिल्लीला येतांच शहर सोडण्याचा त्याला हुकूम मिळाला. तो लाहोरला जाऊन दोन तीन महिने राहिला. नंतर चायना मिल-मध्यें तो फिटरच्या नोकरीवर लागला. सी. आय. डी. नं त्रासवून सोडलं आणि त्यांनीं मालकालाही त्याला नोकरीवरून काढण्याची

विनंति केली. मालकाचा लहान भाऊ मित्र होता पण मालकानं त्याला काढला नाहीं. संतसिंहाची इच्छा होती कीं सहा महिने नोकरी करून कांहीं पैसे जमवूं आणि नंतर मग राजकीय कार्यांत लक्ष घालूं. पण दोन महिने काम केलं अडीच रुपये रोजीं ठरले. असून, त्याला १॥रुपाया रोज खिशांत पडत असे. त्यामुळं संतसिंहाला नोकरी सोडावी लागली. तो एक दिवस आजीला भेटायला गेला. आपल्या नातवाचा केस व दाढी नसलेला नटासारखा नवा अवतार पाहून तिनं त्याला बाटग्यांत काढलं. त्याला दूर बसवून जेवायला घातलं. आणि त्याचीं भांडीं स्वच्छ घांसून घेतलीं. चोवीस वर्षांच्या तरुण संतसिंहाला या गोष्टीचं वाईट वाटलं.

चकदानियाळहून तो लाहोरला आला. लाहोर सोडण्याचा त्याला हुकूम मिळाला. तो दिल्लीस गेला व तिथं पकडला गेला. लाल किल्ल्यांत त्याला एक महिन्यापर्यंत ठेवण्यांत आलं. तिथून सुटतांच त्यानं गुप्तपणें मुंबई गांठण्यांचं ठरवलं.

तो कामगारांत होता. सरदेसाई आणि रणदिवे यांचं नांव त्यानं ऐकलं होतं. मुंबईच्या गाडींत पाऊल ठेविल्यापासून पोलिस पाळतीवर असल्याचं त्यानं बघितलं. एका जागीं त्यानं गाडी बदलली आणि पोलिसला चकवलं. ग्वालियरच्या कामगारांनीं त्याला कांहीं पैसे देऊन मुंबईस पाठविलं. शोधतां शोधतां तो गिरणी कामगार यूनियनमध्यें येऊन पोंहोंचला. तीन चार दिवसांपासून तो भटकत होता. पैसे संपूं लागले. तो परत गांवीं जायला तयार होता. पण फिरतां फिरतां कॉ. सरदेसाईंची भेट झाली. त्यानं त्यांना परीक्षेदाखल इंग्रजींतून उर्दू भाषान्तर करून दाखविलं. मग मदनपुरा कामगार भागांत त्याला कामावर ठेवण्याचा निर्णय घेण्यांत आला.

**नांव बदललं:**—तो धरला गेला असता तर पुन्हां तुरुंगांत खितपत पडला असता. तो स्वतःचं नांव " शफी " असें सांगून मदनपुऱ्यांत काम करूं लागला. बिऱ्हाड एकीकडे ठेवलं होतं. जेवणाची कांहीं सोय नव्हती. दिवसभर कांहीं कामगार मुलांना इंग्रजी शिकवी. ते याला खायला आणून देत असत. इब्राहिम नांवाचा त्याचा जुना मित्र जेवायला येण्याचा आग्रह करी. पण हा लहानपणापासून लाजाळू ! कुणाच्या घरीं जाऊन जेवण्यापेक्षां तो उपाशी रहात असे. तो आतां मांसाहार करूं लागला. मदनपुऱ्याच्या कामगारांत शफीला बोलावं लागे. दाढी नसलेल्या या तरुणाला सारे कामगार " मौलवी " म्हणून हांका मारूं लागले. याच काळांत युसूफ कम्युनिस्ट पक्षांत सामील झाला होता. कॉ. भारद्वाजला " शफी "चा शोध लागला. त्यानीं कॉ. रणदिवेला पत्र पाठवलं. बुखारीनं अहमदाबादमध्यें एक कामगार गट स्थापन केला होता. मौलानाच्या वेषांत शफीला अहमदाबादला पाठविण्यांत आलं.

**अहमदाबादेंत निराळं नांव**:—अहमदाबादेंत आल्यानंतर त्यानं आपलं नांव बदलून " मौलाना महम्मद युसूफ " असं ठेवलं. १५ दिवसांतच अहमदाबादेंत गिरणी कामगारांची यूनियन स्थापन झाली. अध्यक्ष नुरी ( लीगवादी ) आणि उपाध्यक्ष स्वामीनारायण ( हिंदुमहासभा ) हे होते. अहमदाबादेंत येतांच तो या लोकांबरोबर काम करूं लागला. मुसलमान कामगारांत काम करणं कठीण होतं; पण तो त्यांच्याबरोबर कामगार बनला. आणि एका गिरणींत बदलीवर काम करूं लागला. एखादा कामगार गैरहजर राहिला तर हा तिथं आपली बदलीतिकिट दाखवून जात असे. आणि गिरणींत कामगार चळवळीचं जाळं विणीत असे. पोलीस त्याच्या शोधांत होते. त्यानं जवळ जवळ शंभर कामगार असे

निवडले होते कीं जे त्याला बदली ठेवूं शकतील. पुढें याच कामगारांना त्यानं कार्यकर्ते बनविले. आणि त्यांच्यावर त्याचं वजन बसताच त्यानं कामगारांत पत्रकं वांटायला सुरवात केली. कामगार यूनियनमध्यें हिंदू मुस्लिम भेदभाव होता. तो कामगारांत भाषण करून त्यांना जागृत करूं लागला. कामगारांना लौकरच कळलं कीं आपल्यांत मिळून मिसळून काम करणारा हा कामगार चलाख व शिकलेला पुढारी आहे. त्यांची युसूफवर श्रद्धा बसूं लागली. कामगारांची संघटणा वाढत गेली. **गांधीवादी मालकशाही घाबरून गेली. आणि ते मुंबईत खबरा देऊं लागले कीं अहमदाबादेंत एका कम्युनिस्टानं शिरकाव केला आहे.** यूनियनचे नुरी अन् स्वामीनारायण यांची पांचावर धारण बसली. त्यांनीं यूनियनचे राजिनामे दिले. दीड वर्ष युसूफ अहमदाबादेंच्या कामगारांत काम करीत होता. या काळांत कामगारांनीं ४६ वेळां हरताळ केला. वीसवीस हजार कामगारांचे ५३ संप घडवून आणले. पोलीस युसूफला एक चलाख कामगार कार्यकर्ता म्हणून सकाळीं पकडीत आणि संध्याकाळीं सोडून देत. अशा रीतीनं तो पुष्कळदां धरला गेला. वर्तमानपत्रांत युसुफचं नांव छापून येई. अहमदाबादच्या या पुढाऱ्याचं नांव साऱ्या प्रांतांतील कामगारांच्या तोंडीं खेळूं लागलं.

१९३५ **मध्यें मिरत कटांतले बरेचसे कम्युनिस्ट पुढारी सुटले होते. सुटतांच पार्टीला शिस्तमय व कार्यक्षम करण्याकडे त्यानीं लक्ष दिलं.** कांहीं गटबाजी करणारे पुढारी पार्टीच्या या नव्या धोरणानं आपलं पुढारीपण जातं कीं काय म्हणून भीत होते. आणि वरवर नुसती पुढाऱ्यांची एकी करून पार्टी मुळांत मजबूत होऊं शकत नव्हती. युसुफला हा अनुभव

होता. तो मुंबईला आला. पुढारीपणानं काम चालणार नाहीं. गटबाजी तोडून पार्टी बांधली गेली पाहिजे. जो यांत विघ्न आणील त्याला कम्युनिस्टाचा शत्रू समजलं जाईल. ही गोष्ट साधारण कार्यकर्त्यांत आणि कामगारांत फैलावली गेली. शेवटीं गटबाजी संपली. आणि **१९३५ पासून पार्टीच्या खऱ्याखुऱ्या जीवनाला सुरवात झाली.**

युसूफ अहमदाबादेला आला. पार्टीच्या जिल्हा कमेटीचा तो सेक्रेटरी झाला. त्याच वर्षीं गिरणी कामगारांचा संप झाला. युसूफ पकडला गेला. भारद्वाजलाही शिक्षा मिळाली. पार्टीला बेकायदा ठरविलं. अहमदाबादच्या गिरणी कामगार यूनियनलाही कम्युनिस्टांची यूनियन समजून बेकायदा ठरविलं. पण युसूफ पकडला जाण्याच्या आधींच त्यानं इतर कामगारांच्या नांवानीं यूनियनमध्यें कमिटी स्थापन केली होती.

युसूफवर चार महिनेपर्यंत खटला चालला होता. रोज त्याच्याकरितां कोर्टांत पांच तास काम चाललें. पोलिसांनीं अशी शंका घेतली कीं हा मनुष्य मॉस्कोहून आला आहे. त्यानं घर आणि आईबापांचं नांव पाठ करून ठेवलं होतं. पोलिसांनीं सगळीकडे शोध केला. तिकडे तुरुंगाच्या डॉक्टरनंही त्याची परीक्षा घेऊन साक्ष दिली कीं हा मुसलमान नाहीं. याची सुन्ता झालेली नाहीं. पोलिस शोध करूं लागले. शेवटीं पंजाब आणि दिल्लीच्या पोलिसांनीं युसूफचं सन्तसिंहाशीं नातं जोडून त्याचा मागचा इतिहास सादर केला. युसूफला नऊ महिन्याची शिक्षा मिळाली. आणि साबरमती तुरुंगांत त्याची रवानगी झाली.

तिथून सुटल्यानंतर **रख्याल रोडच्या** तुरुंगांत त्याला स्थगित कारावासाची शिक्षा मिळाली. रोज दोन वेळां पोलिस स्टेशनवर

येऊन त्याला हजेरी द्यावी लागे. तरी पण पोलिसानं त्याला पकडून त्याच्यावर खटला भरला. फेरतपासणींत त्याला दीड वर्षाची शिक्षा मिळाली. युसूफनं साबरमती तुरुंगांत दोन वर्षं काढलीं. त्यानं हा वेळ इंग्रजी भाषेचं शिक्षण घेण्यांत घालविला आणि साम्यवादी साहित्याचा गंभीरपणें अभ्यास केला. १९३६ मध्यें तुरुंगांतून बाहेर पडतांच त्याला अहमदाबादच नव्हे तर मुंबई प्रांत सोडण्याचा हुकूम मिळाला. तो लाहोरला जात होता. सी. आय्. डी. चा पोलिस मागं होताच. त्यानं एका प्रवाशाबरोबर तिकिटाची अदलाबदल केली. गाडी बदलून दिल्लीला पोहोंचला. आणि पोलिस त्याचा शोध करीत लाहोर स्टेशन शोधूं लागले. युसूफला दिल्लीचे कामगार ओळखीत होते. पोलीस त्याचा शोध काढीत दिल्लींत येऊन पोहोंचले. हें त्याला कळतांच त्यानं दिल्ली सोडली.

**कानपूरचा कामगार पुढारीः**—आतां तो यमुना नदी पार करून मिरत जिल्ह्यांत आला. आणि गाजियाबादला कामगार चळवळीची तयारी करूं लागला. पण पार्टीला विचारल्याशिवाय प्रत्यक्ष कार्य करणं शक्य नव्हतं. तो तशी परवानगी मागण्याकरितां कानपूरला गेला. अथर्टन वेस्ट गिरणीतून कितीतरी कामगार बेकार बनले होते. त्यांत युसूफबरोबर अहमदाबादेंत काम करणारे सहकारीही होते. तो कामगार सभेंत जाऊन बोलला. एका गिरणीच्या संपाची आग साऱ्या गिरण्यांत पसरली. आणि १५००० कामगारांनीं सार्वत्रिक संप पुकारला. यापूर्वीं कानपूरच्या कामगारांवर कम्युनिस्टांचा प्रभाव नव्हता. युसूफ धरला गेला. आणि त्याला एक वर्षाची शिक्षा मिळाली. संप यशस्वी झाला नव्हता पण कामगार चळवळ वाढूं लागली. तो तुरुंगांतून सुटतांच जे. पी. श्रीवास्तवच्या गिरणींत संप घडून आला. **युसूफनं संघटना मोठ्या**

प्रमाणांत उभारली. कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. मंडळाच्या ४० सभासदांत १६ कम्युनिस्ट सभासद निवडून आले. सेक्रेटरीच्या जागेवर युसूफ निवडून आला होता. १९३७ पासून गिरणीच्या महाद्वारावर सभा होऊं लागल्या. लक्ष्मी कॉटन मिलच्या दारावर सभा घेतली असतांना गुंडांनीं दगडफेक करायला सुरवात केली. पण युसूफनं सभा घेण्यांत खंड पाडला नाहीं. एकदां युसूफला एकटं गांठून गुण्डांनीं पिटून काढलं होतं. तरीही दुसऱ्या दिवशीं डोळ्याला पट्टी बांधून तो सभेत हजर राहिला. सर जे. पी. श्रीवास्तवसारखा मोठा भांडवलदार आणि रामरतन गुप्तासारख्या कॉंग्रेस भक्तांनीं येथील कामगार चळवळींत विघ्न आणण्याची पुष्कळशीं कारस्थानं रचलीं. पण कानपूरमध्यें युसूफनं रोवलेला लालझेंडा ते उखडूं शकले नाहींत. १९३७ च्या सुरवातीस त्याला शिक्षा मिळाली. पुढें कॉंग्रेस मंत्रिमंडळानें त्याची सुटका केली.

कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या काळांतही गिरणी–मालकांच्या उद्दामपणांत कांहीं फरक घडून आला नव्हता. त्यांना वाटत होतं कीं, कॉंग्रेस सरकारनं गोळ्या घालून या कामगार चळवळीला नामशेष करावं. डॉ. काटजू झगडा तोडण्याकरतां आले होते. युसूफनं कामगारांच्या मागण्या पुढं ठेवल्या. मालकानं त्या फेटाळून लावल्या. कामगारांनीं सार्वत्रिक संप पुकारला. १९३७ च्या शेवटीं मुख्य प्रधान पंत स्वतः कानपूरला आले. व त्यांनीं गिरणी मालकांना मागण्या मान्य करण्यास भाग पाडलं. कामगारांच्या यूनियनचं प्रतिनिधित्व स्वीकारण्यांत आलं. तसंच हा कामगारांचा लाडका पुढारीही तुरुंगांतून सोडविण्यांत आला. युसूफची धरपकडीची आणि तुरुंगांतून जाण्यायेण्याची संख्या अमर्याद

**आहे.** एकंदर १४ वेळां मिळून जवळजवळ १२ वर्षं त्यानं तुरुंगांत काढलीं आहेत.

१९३८ मध्यें कामगारांनीं ५२ दिवस संप केला. यांत कामगार यशस्वी झाले. १९३९ पर्यंत तो ५–६ वेळा धरला गेला. **१९३९ मध्यें कानपूरला भरलेल्या अखिल भारतीय हिंदी कामगार अधिवेशनाचा तो अध्यक्ष नेमला गेला होता.**

कॉ. युसूफनं आतांपर्यंत १५० हून अधिक संपाचं नेतृत्व घेतलं आहे. त्यापैकीं ३४ संप मुंबई शहरांत त्यानं आपल्या नेतृत्वाखालीं लढवले. त्यामुळं कॉ. युसूफ हा मुंबई, अहमदाबाद, दिल्ली व कानपूरमध्यें कामगारांचा व जनतेचा लोकप्रिय पुढारी म्हणून ओळखला जातो. आतांपर्यंत कितीतरी मालकांच्या गुंडांनीं त्याच्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण कामगारांनीं आपले प्राण पणास लावून त्याचं संरक्षण केलं.

कानपूरच्या कामगारांचा एकमेव नेता व मजदूर सभेचा अध्यक्ष कॉ. युसूफ यांना कानपूरच्या मजदूर संघातर्फे व कम्युनिस्ट पार्टीतर्फे कामगार मतदार संघाकरितां असेंब्लीसाठीं उमेदवार म्हणून उभे करण्याचं ठरवलं आहे. या निवडणुकींत याना १०० टक्के यश मिळवून देऊं असा कानपूरच्या लालबावट्याच्या लढाऊ कामगारांनीं निर्धार केला आहे. हिंदी कामगारांच्या लालबावट्याच्या चळवळींत कॉ. युसूफच्या नेतृत्वाखालीं तावून सुलाखून निघालेला कानपूरचा क्रान्तिकारक कामगारवर्ग कॉ. युसूफ यास नक्कीच प्रचंड यश मिळवून तींत कानपूरची गौरवशाली परंपरा राखतील यांत शंका नाहीं.

बाबा सोहनसिंहाचं आयुष्य म्हातारपणाचा उंबरठा ओलांडित आहे. अशा स्थितींतही त्याची वृद्धापकाळांतलीं हाडं आणि पांढरे शुभ्र दाढीचे केस देशाच्या स्वातंत्र्याकरितां अघोर यातना भोगलेल्या दाखवीत आहेत. फाशीचा हुकूम ऐकूनही तुरुंगाच्या अंधाऱ्या कोठडींत त्याच्या कपाळावर तिळमात्रही भयाची रेषा उभी राहिली नाहीं. शरीरानं आतां हात टेकले असतानांही त्याच्यांत अजूनही देशप्राप्तीच्या ध्येयासाठीं अगदीं ताज्या दमाच्या तरुणासारखा उत्साह अन् भावी काळावर दाट विश्वास आहे.

अमृतसरपासून दहा मैलांवर **भाकना** नांवाचं एक मोठं गांव आहे. कर्णसिंहाला रामकौरपासून १८७० त सोहनसिंहाचा जन्म झाला. वर्षाच्या आंतच वडील स्वर्गस्थ झाले. एवढ्या अफाट घरांत दोन आया अन् म्हातारी आजी राहिल्या होत्या. या तिन्ही स्त्रियांच्या साऱ्या आशा, आकांक्षा आपल्या एक वर्षाच्या लहानग्या सोहनवर होत्या. पण आतां चार पिढ्यापासून चालत आलेल्या एका वंशाचा परिवार सोहनसिंहाबरोबर संपत आहे. त्या चंदासिंहाच्या आखरी वंशबीजानं जी कांहीं महत्तम कामगिरी बजावली आहे त्यामुळं हा वंश अमर बनला आहे.

लहानपणीं सोहनसिंहाची प्रकृती चांगली होती. तरी पण आई आपल्या एकुलत्या एक मुलाला फुलासारखं वागवीत होती. तरी पण मुलाला खेळायला संधी मिळतच असे. सोहनसिंहाला पितृसुख तर

लाभलं नव्हतं. त्याचे वडील अत्यंत उदार स्वभावाचे गृहस्थ होते. दुष्काळांत ते गरिबांना अन्न वांटीत असत अन् अस्पृश्य बालकांना जेवण व कपडे देण्यांत त्यांना समाधान वाटे. सोहनचा स्वभावही लहानपणापासून उदार बनला. तो खाण्याचे पदार्थ अन् वस्तू घरून घेऊन बाहेरच्या खेळगड्यांमध्यें वांटून टाकी. १८७५ च्या सुमारास त्याचं वय पांच वर्षांचं असेल, मुलांबरोबर खेळत असतांना मोठं वादळ झालं. धुळीच्या सपाट्यानं चोहोकडे अंधार पसरला. त्या वेळेस सोहन घाबरून आपल्या बाल–सहकाऱ्यास बिल-गून बसला होता.

घरांत कोणी कर्ता पुरुष नसल्यामुळं संपत्ति असूनही त्यांना सुखानं दिवस काढतां येत नव्हते. सोहनचं आपल्या आईपेक्षां सावत्र आईवर प्रेम होतं. तिनं जीवनांतले समरप्रसंग अनुभवले होते. आणि ज्या कथा ती आपल्या मुलाला सांगे, त्यांत रंजकता फारच. त्या सांगताना तिचा कंठ दाटून येई. अश्रू ओघळले जात अन् सोहनवर त्याचा परिणाम होई.

**शिक्षण**:-वयाच्या पांचव्या वर्षीं त्यानं गांवांत राहणाऱ्या **लेहण-सिंह** या साधूजवळ 'गुरुमुखी' शिकायला सुरवात केली. व त्याच्याजवळ सतत दोन वर्षं तो "पन्थग्रन्थी" शिकत होता. कांहीं धार्मिक पुस्तकंही त्यानं वाचलीं व वयाच्या सातव्या वर्षीं गांवातल्या शाळेंत दाखल झाला. शाळेंत उर्दू अन् फारशी भाषेचं शिक्षण मिळत असे. तो तिथं पांच वर्षंपर्यंत शिकला. गणित विषय त्याला आवडे. आणि भूगोल शिकतांना त्याला नकाशे आकर्षक वाटत.

वयाच्या बाराव्या वर्षीं त्याचं शालेय शिक्षण संपलं. सोहनसिंहाला शिकण्याची हौस होती पण आईनं डोळ्यांत आंसवं आणून

आपल्या मुलाला नजरेआड करण्यास हरकत दाखविली. सोहननंही मग पुढचं शिक्षण घेण्याचा नाद सोडला. त्याच्या अकराव्या वर्षीं आजी मेली. पण तिच्या हयातींत एक वर्षाआधींच सोहनचं लग्न झालं. हीं पुढचीं पांच वर्षं त्यानं खेळण्यांत घालवलीं. एकाद्या वेळेस लहर लागली तर तो फारशीही शिकून येई. एकदां त्याच्या शेतांत एक माणूस आपल्या बकऱ्या चारूं लागला. सोहनचं व त्याचं भांडण लागलं. त्यानं सोहनसिंहाला खालीं पाडलं. सोहनला आपल्या शारीरिक दुर्बलतेबद्दल वाईट वाटलं व तो मग शारीरिक दौलत मिळविण्याकरितां आखा-ड्यांत जाऊन दंड–बैठका काढूं लागला. आणि लौकरच त्यानं आपलं शरीर कणखर व सशक्त बनवलं.

**तारुण्य** :—सोहनसिंह आतां यौवनाच्या सीमेवर येऊन पोंचला होता. घराचा मालक अन् संपतीचा वारस तोच होता. यौवनाचा उन्माद चढला. विवेकानं ताळतंत्र ठेवला नाहीं. खुशालचेंडू लोक त्याचे मित्र बनले. त्यांनीं जीवनाचा आनंद उपभोगण्याचीं त्याला कितीतरी साधनं सांगितलीं. मग काय विचारतां ? सोहननं चार शिकारी कुत्रे अन् घोडे बाळगले. आतां तो शिकार खेळूं लागला अन् दारुच्या बाटल्या रिकाम्या करूं लागला. सोहनवर सावत्र-मातेचा दबदबा होता पण विण्याच्या गोष्टी तिच्या नजरेआड होत असत. वयोमानाप्रमाणं तो बेडर बनत गेला. पैसे संपतांच तो कर्ज घेऊं लागला. कर्ज चुकवण्याकरितां तो आईजवळ पैसे मागे. आई पैसे देई अन् त्याला उपदेशाचे चार शब्दही सांगे.

**नवें धार्मिक आयुष्य**:—खुशालचेंडूच्या सहवासांत त्यानं आपली दहा वर्षं घालवून ऐहिक जीवनाची मजा चाखली; पण त्याला समाधान लाभलं नाहीं. त्या काळीं रामसिंहाचे अनुयायी कूके शिखांनीं आपल्या असीम त्यागानं पंजाबियांना चकित करून सोडलं

होतं. गुरुगोविंदसिंहानंतर या त्यागाचं एक नमुनेदार उदाहरण होतें. कूके शीख इंग्रजी राज्यसत्तेच्या विरोधी होते. ते आपलं सर्वस्व देऊन शीख राज्याची पुनर्घटना करण्याची खटपट करीत होते. एकदां लुधियानांत ७० शीख तोफेच्या तोंडीं उडवले गेले. तोफेच्या तोंडीं देतांना त्यांचे हात जेव्हां बांधण्यांत येत, त्या वेळेस त्यांनीं असे धीरोदात्त उद्गार काढले कीं "आमचे हात बांधू नका. मृत्यूला आम्ही भीत नाहीं. तो एक आमचा नित्याचा व्यवहार आहे." त्याच्या अनुयायांसह गुरु बाबा रामसिंहाला पकडून ब्रह्मदेशांत पाठवण्यांत आलं. भीती आणि लोभाची आमिषं त्यांना दाखवण्यांत आलीं. पण ते छातीचा कोट करून उभे राहिले. बाबा रामसिंहानं आपल्या अनुयायांत नवचैतन्य निर्माण केलं. त्यानं प्रचलित राज्य-सत्तेशीं संपूर्णपणें असहकार पुकारला. कोणीही शीख सरकारी नोकरी करीत नसे. न्यायालयाची पायरीही चढत नसे. त्यांनीं विदेशी कपडा व विदेशी वस्तू यांविरुद्ध **असहकार पुकारला.**

बाबा रामसिंहाचे अनुयायी बाबा केसर डोक्यावर केस ठेवीत नव्हते. ते एकदां सोहनच्या गांवीं आले. त्या वेळेस सोहन २८ वर्षांचा होता. आणि शिकार अन् दारुच्या नादानं तर्र होता. तरी-पण त्याच्या मनांत साधुसंताविषयीं आकर्षण होतं. बाबा केसर एक साधू अन् धार्मिक प्रवृत्तीचा संत होते. बाबा केसरकडे सोहन आक-र्षिला गेला. त्यानं बाबा व त्यांच्या परिवाराला घरीं जेवायला बोलावलं. बाबाला सोहनच्या व्यसनाच्या गोष्टी माहीत होत्या. जातांना त्यांनीं त्याला जवळ बोलावून सांगितलं, "मधून मधून मला भेटत जा. कुणाच्या उपदेशानं व्यसनें सोडूं नकोस. तुला जेव्हां मनापासून तीं सोडाविशीं वाटतील त्याच वेळेस सोड." सोहन बाबाला दोनदां भेटला. त्याला कळूं लागलं कीं, बाबाचा मार्गच

सत्याचा आहे. त्यानं बाबाजवळ १२ वर्षं मीठ न खाण्याची प्रतिज्ञा घेतली. आतांपर्यंत तो शिकार अन् दारूंत जगाला विसरून गेला होता. तर नंतर ईश्वराच्या भक्तीनं अन् धर्माच्या नशेनं त्याच्यावर अम्मल चढवला. बाबा केसरप्रमाणं त्याला सारे धर्म आवडूं लागले. त्याच्यांत प्रेमभक्तीची आवड उत्पन्न झाली. १९०५ पासून सोहनसिंहानं आपल्या घरीं वार्षिक भंडारा करायला सुरवात केली. यांत निरनिराळ्या धर्मांचे, पंथाचे लोक येऊन भाग घेत व प्रेमसंबंध वाढवीत असत. सारा खर्च सोहनसिंह करीत असे. या आधीं त्याच्या मनानं असं घेतलं कीं आपलीं कर्जाचीं कुळं फारच काळ-जींत आहेत. मग त्यानं साऱ्या कुळांना बोलावून त्यांच्यासमोर त्यांचे कर्जरोखे फाडून टाकले व कर्जदारांना पैसे देण्यापासून मुक्त केलं. भंडाऱ्यांत पैसा संपत आला होता. आई धार्मिक वृत्तीची अस-ल्यामुळं तिला यांत आनंद वाटे.

१९०८ मध्यें त्यानं शेवटचा **भंडारा** जमवला अन् होते नव्हते तेवढे सारे पैसे खर्च केले. शेतं गहाण पडलीं होतीं. नंतर केसर-सिंहानं त्याला उपदेश केला कीं, " वडिलार्जित धन संपलं. हें चांगलं झालं. आतां तूं कष्ट कर व स्वतःचं अन्न स्वतः कमव." आतां सोहनसिंहापुढें दुसरा मार्गच नव्हता. याच वर्षी पंजाबांत अजित-सिंह आणि लाला लजपतराय यांनी राजकीय वातावरण निर्माण केलं होतं. त्याचा सोहनसिंहावर परिणाम झाला. त्यानं त्याबद्दलचीं कांहीं पुस्तकं हाताळलीं. गांवांत राजकारणाचा होत असलेला प्रचार ऐकला.

वयाच्या ३८ व्या वर्षापासून आपल्या गुरूच्या उपदेशावरून त्यानं कांहीं बाकी राहिलेल्या शेतांवर शेती करून उदरनिर्वाह आरंभिला. पण लहानपणापासून शारीरिक श्रमांची संवय नसल्यामुळं हें काम कांहीं त्याला झेपत नसे. पण जनावरांपासून कांहीं गुजारा

होत होता. घरांत बायको, दोन आया, **एक अनाथ पोर** या पांच जीवांचा संसार चालवणं त्याला भाग पडत होतं. दिवस हला-खीचे जात होते. एकदां सोहनसिंह डोक्यावर शेतांतील चारा घेऊन घरीं येत होता. रस्त्यांत बधवामल नांवाचा ख्रिस्ती पाद्री भेटला. त्यानं त्याचं ओझं खालीं उतरवायला मदत केली. पुढं त्याची ओळख वाढली. पाद्रीनं त्याच्या भंडाऱ्यांत बरेचदां भाग घेतला होता. सोहनच्या विशाल हृदयाची व असीम त्यागाची त्याला माहिती होतीच. आपल्या मित्राची ही अवस्था पाहून पाद्र्याचं मन खिन्न झालं. त्यानं अत्यंत अदबीनं त्याला विनंती केली कीं सोहनसाठीं आपण ख्रिस्ती मिशनकडून दरमहा ५० रुपयांची व्यवस्था करतों. पण सोहनसिंहानं नम्रतापूर्वक नकार दिला.

या वर्षांतल्या अनुभवानं त्याला कळलं, शेतांतून धान्य उत्पन्न करणं त्याच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. त्यानं आपला जिवलग मित्र सरैनसिंह याच्यापाशीं गोष्ट काढली कीं, " माझ्याकडून आतां शारीरिक श्रम होणं शक्य नाहीं आणि माझी घरची आर्थिक परिस्थिती बिघडत चालली आहे. असं ऐकतों कीं अमेरिकेंत मजुरी जास्त मिळते. तिकडेच निघून गेलों तर परिस्थिती सुधारण्याचा संभव आहे. " अमेरिकेंतल्या इतर मित्रांशीं पत्रव्यवहार झाले. इकडेही मित्र मदत करीत होते. पण आतां सोहनसिंहाचं जीवनसूत्रच हें होतं कीं " कष्ट करायचे, कमवायचं अन् वांटून खायचं. " बाबा केसरला तो म्हणाला, " बाबा आतां माझ्याकडून शेती होत नाहीं. हें ३८ वर्षांचं शरीर त्या कामाकरितां तयार होत नाहीं. मी अमेरिकेला जातों ! " बाबा म्हणाले, " संकटाच्या वेळेस पळून जातोस ! " बाबाचा एक सावकार मित्र जवळ बसला होता. त्याच्याकडे तोंड फिरवून तो म्हणाला, " आतां सोहन पैशाच्या पाठीमागं लागला

आहे." तो सावकार सोहनला म्हणाला, "मी तुझं सारं कर्ज फेडतों. तुझं पुण्य मला दान करशील?" हें ऐकतांच बाबा सोहनला म्हणाले, "चल सौदा करून टाक." सोहन एकदम उद्गारला, "नाहीं, नाहीं. पुण्य विकणार नाहीं. बाबा!"

**अमेरिका**:—अमेरिकेला जाण्याकरितां त्यानं कर्ज काढलं. सातशें रुपये जवळ ठेवले व तीनशें रुपयांच्या कशिदा काढलेल्या चादरी विकत घेतल्या. अमेरिकेंत अशा चादरींना भाव होता. घरीं आईपाशीं आपली जलपर्यटनाची गोष्ट काढली तेव्हां तें घरचं दृश्य भयंकर होतं. त्यांनीं धर्माभिमानी सोहनसिंहाला बघून समाधानाचा श्वास टाकला होता. आणि धर्माकरितां सारी संपत्ती खर्च झालेली पाहून जराही असंतोष दाखविला नव्हता. सोहन स्वकष्टानं संसार चालवतांना आपल्या शरिराला उन्हातान्हांत झिजवलेलंही पाहिलं होतं अन् सहन केलं होतं. पण चार पिढ्यांपासून परंपरागत आलेल्या एका पुत्राला अशा तऱ्हेनं जगाच्या दुसऱ्या टोकास जांत असलेला पाहून ती मूर्च्छीतच झाली. सोहनसिंहापुढं दुसरा मार्गच नव्हता. ३ फेब्रुवारी १९०९ अमेरिकेला जाण्यासाठीं त्यानं आपलं गांव सोडलं. कलकत्ता, सिंगापूर, हाँगकाँगहून अमेरिकेचं जहाज धरलं. जहाजांत बसण्याकरितां डॉक्टरी परीक्षा घेण्यांत येत असे. सोहनसिंहाचे सातही साथीदार डॉक्टरी परीक्षेंत नापास झाले. सोहनासिंग तेवढा एकटाच पास झाला. त्याच्या ओळखीचे लोक "एकटा अमेरिकेंत जाऊं नकोस" असं म्हणत असतांनाही ईश्वरावर हवाला ठेवून तो जहाजांत बसला.

तो जपानी जहाजांत बसला होता. तो तिसऱ्या दर्जाचा प्रवासी होता. योकोहामा बंदरांत बरेचसे रशियन लोकही त्या जहाजांत येऊन दाखल झाले. त्याला इंग्रजी अन् रशियन दोन्ही भाषा अजून

येतच नव्हत्या. पण त्यांच्याबरोबर त्याचं मित्रत्व वाढूं लागलं. ते सर्व आपापसांत जेवण वांटून खात.

महासागर पार करून एप्रिल १९०९ मध्यें सोहनसिंह अमेरिकेंतल्या **सियेटल** बंदरावर उतरला. सरकारी अधिकाऱ्यानं त्याची तपासणी केली.

" तुझ्या मित्रानं तुझ्याजवळ कांहीं पत्र दिलं आहे ? "

" बहुपत्नीविवाहाला तुझी संमती आहे ? " सोहनसिंहानं या दुसऱ्या प्रश्नावर नाहीं म्हणून जोर दिला. पण हा त्याचा नकार बनावट नव्हता. त्याचे गुरुदेखील बहुपत्नीविवाहाच्या विरुद्ध होते. चार पिढ्यापासून एक एक पुलापासून चालत आलेला वंश आतां निर्वंश बनत आला होता. त्याचे नातेवाईक पहिल्या बायकोपासून मूल होत नाहीं असं बघून त्याला दुसऱ्या लग्नाचा आग्रह करीत होते. त्याच्या वडलांनींही दोन लग्नें केलीं होतीं. पण सोहनसिंहाला हें पटत नव्हतं. त्यानं स्पष्ट नकार दिला होता. पण अमेरिकन सरकारी अधिकाऱ्याला त्याच्या या उत्तरानं समाधान वाटलं नाहीं. त्याला माहीत होतं कीं हिंदू बहुपत्नीविवाहाचे पुरस्कर्ते आहेत. आणि अशा मताच्या लोकांना अमेरिकेंतले सभ्य नागरिक शिष्ट माणूस समजत नाहींत. त्यानं सोहनला थांबवून ठेवलं. सत्यदेव नांवाच्या एका भारतीय विद्यार्थ्याला दुभाषा म्हणून बोलावलं. त्या दुभाषानं सोहनसिंहाबद्दल योग्य तीच जाणीव करून देतांच त्याला **अमेरिकेच्या भूमीवर** सोडण्यांत आलं. बरेचसे त्याचे इतर भारतीय मित्र तिथं होते. त्यानं सोहनसिंहाला हॉटेलांत नेलं. डॉक्टर हरनामसिंह त्या वेळेस तिथं बी. ए. ला होते.

चादरी विकून त्यानं आपल्या प्रवासखर्चाची भरपाई केली. तो **ओरिगिना** स्टेटमध्यें पोहोचला. पोर्टलॅंडपासून तीन मैलाच्या

अंतरावर कोलंबिया नदी किनारीं मुनार्क मिल नांवाच्या लाकडाच्या कारखान्यांत तो भरती झाला. सहा रुपये ( दोन डॉलर ) रोज मजुरी होती. भाकनाच्या शेतीपेक्षांही हें काम फार अवघड होतं. यंत्रासमोर सारखं उभं रहावं लागत होतं. पण मजुरी पुष्कळ मिळत होती. अन् काम केल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. त्यानं मनावर व शरिरावर ताबा मिळवला. आणि थोड्या दिवसांतच त्याला हें काम इतकं अंगवळणी पडलं कीं ठराविक वेळेपेक्षां जास्त काम तो अंगावर घेऊं लागला.

**भारतीय कामगारांत राजकीय उत्साह**:—जागतिक मंदीचं संकट १९०७ मध्यें अमेरिकेवरही कोसळलं. पुष्कळसे कारखाने बंद पडले. लाखो कामगार बेकार झाले. उत्पादन स्वस्त किंमतींत जिथं विकणं कठीण काम होऊन बसलं तिथं मग भांडवलदार गोदामांत सडण्याकरितां आणखी जास्त उत्पादन कशाला करतील? मग कितीतरी कामगारांना त्यांनीं बेकार बनवलं. कितीतरी कामगारांच्या पगारांत कपात करण्यांत आली. अमेरिकन कामगार पगारकपातीच्या विरुद्ध होते. इकडे पूर्व युरोप व आशियाचे कामगार आपल्या देशांत सहा आणे रोजावर निर्वाह करूं शकत. ते अमेरिकेंत कमी मजुरीवर काम करण्यास राजी होते. अमेरिकेंतले भांडवलदार अशा कामगारांना जवळ करीत. पण अमेरिकन कामगारांना ही एक आपत्ती वाटली. मग अमेरिकन कामगारांनीं विदेशी कामगाराविरुद्ध चळवळ सुरू केली. त्याचा परिणाम असा झाला कीं कॅनडांत कित्येक हजार हिंदुस्थानी, पंजाबी कामगार काम करीत होते ते बाहेरच्या कामगारांना आंत येऊं देत नसत. यामुळं प्रकरण हातघाईवर आलं. मग कायद्याच्या-कक्षेंत आणून हें प्रकरण थांबवण्याचा प्रयत्न करण्यांत आला. आणि असं सांगण्यांत आलं कीं, कायमची वसाहत करणा-

रालाच कॅनाडांत प्रवेश मिळेल. हिंदुस्थानांतून जहाज सरळ कॅनडांत जात नाहीं, आणि हिंदुस्थानी कामगार सरळ जहाजानं कॅनडांत उतरूंही शकत नव्हते. ही गोष्ट कायदे करणाऱ्यांना चांगली माहीत होती. या कायद्याशीं सामना करण्याकरितां सरदार गुरुदत्त सिंहानं १९१० च्या सुमारास कोमागातामारू नांवाचं जपानी जहाज ठेक्यानं घेतलं. अमेरिकेंत बराच मोठा प्रदेश रिकामा होता. तिथं वस्ती करणाऱ्या लोकांची गरज होती. दुसऱ्या स्वतंत्र राष्ट्रांनीं अमेरिकेला आपल्या राष्ट्राची एक निश्चित जनसंख्या प्रत्येक वर्षाला पाठवून तिथं वस्ती करण्याची परवानगी मिळवली होती. स्वतंत्र देशाचं असं आपापसांत होऊं शकतं पण आपल्यासारख्या गुलाम राष्ट्रांचं काय? कॅनडांत जवळ जवळ हजार हिंदी लोक जाऊन पोहोंचले होते. त्यांनीं मोलमजुरी करून राहिलेल्या पैशांत जमिनीही विकत घेतल्या होत्या. तिकडे कॅनडांतील सरकार हिंदी लोकांवर शस्त्र चालवूं पहात होतं. ग्रंथी बलवंतसिंह वगैरे लोकांनीं इंग्लंडमध्यें एक शिष्टमंडळ पाठवलं. त्यांची भारतमंत्र्याकडे हिंदी लोकांची कर्मकहाणी सांगण्याची इच्छा होती. पण भारतमंत्र्याना हें गाऱ्हाणें ऐकण्याकरितां वेळही नव्हता अन् त्यांचं तें कामही नव्हतं. त्यानं शिष्टमंडळ घेऊन गेलेल्या लोकांना भेटण्याला नकार दिला. कॅनडाच्या हिंदी लोकावर जसजसे अत्याचार होऊं लागले तसतसे ते त्याविरुद्ध संघटित होऊं लागले. कॅनडांतले सारे हिंदी कामगार पंजाबी शीख होते. त्यांनीं जमिनी घेतल्या व गुरुद्वारं बांधून काढलीं. गुरुद्वारप्रबंधक कमिट्या स्थापून त्यांनीं हिंदी लोकांच्या हिताचीं कामं करायला सुरवात केली. कशाही रीतीनं कॅनडाचं सरकार या हिंदी कामगारांचं लचांड सोडूं पहात होतं. मग त्यानं एक नवीन युक्ती योजली अन् सांगितलं कीं हिंदी

कामगारांना आम्ही यांहीपेक्षां चांगला प्रदेश देण्याची व्यवस्था केली आहे. त्यांनीं तिकडे जाऊन वस्ती करावी. ग्रंथी बलवंतसिंह व सरदार थरगसिंह वगैरेनां भारतीय प्रतिनिधींना भेटण्याकरतां **हण्डूरासला** पाठवण्यांत आलं. तिथं पोंहोचतांच त्यांना हमालाचं काम करण्यास भाग पाडलं. मग कितीतरी दुसरे हिंदी कामगार तिथं हा अन्याय बघून संघटीत झाले. त्यांनीं आपल्या अत्याचारांची सारी कथा सुनावली. सरकारनं प्रतिनिधींना लालूच दाखवून आपल्या बाजूचा रिपोर्ट देण्यास भाग पाडलं. पण त्यांनीं नकार दिला व सरळ खऱ्या खऱ्या गोष्टी घडल्या त्याच सांगितल्या. मग काय विचारतां? लोकांना कळलं कीं कॅनडा सरकारशीं हिंदी लोकांविरुद्ध इंग्रजांनींही कट केला आहे. मग हिंदी कामगारांनीं "चांगल्या प्रदेशांत" जाऊन राहण्यास नकार दिला. सरकारनं यावर त्यांना त्रास द्यायला सुरवात केली. त्यांच्या पाठीमागं गुप्त पोलीस सोडले. कॅनडांत पोंहोचलेल्या कामगारांची घरची मंडळी हिंदुस्थानांतून कॅनडांत आली होती. ती येतांच त्यांना तीन चार महिने जहाजांतच ठेवून परत पाठवण्यांत आलं. जहाजांत जाणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा १० टक्के लोकांना स्वस्थळीं जातां येत होतं. पण बाकीच्यांना मध्येंच कुठं तरी सोडून देऊन पुन्हां जहाजांत न बसवूं देण्याची तयारी करण्यांत आली. आतां हे भारतीय कामगार अमेरिकेहून हिंदुस्थानकडे रवाना होण्याकरितां निघाले. पण मध्येंच हॉंगकॉंग अन् शांघाय या शहरांत ते आसऱ्याविना भटकूं लागले.

अमेरिकेंतलं सरकारच काय पण कामगारसुद्धां हिंदुस्थानी कामगारांच्या पाठीमागं हात धुऊन लागले. एवर्ट व विलियम कारखान्यांत हजारों हिंदी कामगार काम करीत होते. एकदां गोऱ्या लोकांनीं त्यांच्यावर छापा घातला. त्यांना मारून पिटून साऱ्या वस्तू लुबाडून

व मोटारींत बसवून दूर जंगलांत त्यांना सोडून दिलं. तसं पाहिलं तर हें वैर पोषाकाबद्दल नव्हतं. आपले हिंदी कामगार त्यांच्या चाली-रीतीप्रमाणं पोषाक करीत होते.

अमेरिकेंत प्रत्येक ठिकाणीं हिंदी अधिकाऱ्याबद्दल तिटकारा दाखविण्यांत येत होता. हॉटेलांत कुत्रा अन् हिंदुस्थानी यांना मनाई होती. कितीतरी शिखांना "दाढीवाल्या स्त्रिया" म्हणून चिडवलं जाई. ही मानखंडणा अन् हा अत्याचार बघून या भारतीयांचे डोळे खाडकन् उघडले. त्यांना कळलं कीं आपली भारतभूमी परतंत्र आहे. ती गुलाम, अनाथ आहे. आणि म्हणूनच आम्हाला हें सारं सहन करावं लागत आहे.

सोहनसिंहानं १९१२ पर्यंत पोर्टलंडच्या लाकूड कारखान्यांत काम केलं. त्यानं या दरम्यान रात्रीच्या शाळेंत जाऊन इंग्रजी भाषेचं ज्ञान हस्तगत केलं. त्याच्या ओळखीही वाढत होत्या. अमेरिकन लोक हिंदी लोकांना विचारीत, "तुमच्या देशांत तीस कोटी मेंढ्या रहातात कीं माणसं?" हा प्रश्न तर सर्रास विचारला जाई. एकदां सोहनसिंह काम मिळविण्यासाठीं मॅनेजरकडे गेला. तो म्हणाला: काम आहे पण तें तुला देतां येत नाहीं. कारण असं कीं तुला गोळीनं मारून टाकावंसं वाटतं. तुला पाहून आमची मुलं गुलाम बनतील. मी तुला दोन बंदुकी देतों. जा आणि आपल्या देशाला स्वतंत्र कर. मग तुझ्या स्वागताकरितां मी जातीनं हजर राहीन." एकदां सोहनसिंहानं आपल्या डॉक्टर मित्राला विचारलं: 'तुम्ही अमेरिकन लोक आम्हा हिंदी लोकांचा द्वेष कां करितां?' डॉक्टर म्हणाला: 'द्वेष वैयक्तिक नसून तुमच्या गुलामगिरीच्या बंधनाचा तिटकारा वाटतो.'

अशा दैनंदिन घटना भारतीयांना विचार करण्यास भाग पाडीत. मग ते हिंदुस्थानची व अमेरिकेची तुलना करीत. अमेरिकेतले पोलीस लोकांचे सेवक आहेत तर आपल्या देशांतले पोलिस स्वतःच राजे आहो असं समजतात. त्या वेळचा प्रेसिडेंट (पहिला रूजवेल्ट) हा पोर्टलंडला येणार होता. सोहनसिंह मजा बघण्याकरतां स्टेशनवर हजर राहिला. स्टेशन शृंगारलं नव्हतं अन् तिथं गर्दीही नव्हती. फक्त म्युनिसिपालिटीचे कांहीं सभासद हजर होते. रात्रीं त्याचं व्याख्यान ऐकण्याकरितां तो गेला. गर्दीत एका स्त्रीची व त्याची टक्कर झाली. पोलिसानं हटकलं. ती स्त्री पोलिसावरच रागावली. 'या लोकांचा अपमान करण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे?' पोलिसानं त्या स्त्रीची माफी मागितली.

**नवजीवन**:—हळू हळू सोहनसिंहाला समजूं लागलं, कीं, गुलाम देशांत जन्मणं हें पाप आहे. त्याचे डोळे उघडण्यासारखे कितीतरी प्रकार घडले. सेन्ट जॉनमध्यें पंडित काशीरामनीं कारखान्याचा ठेका घेतला होता. अमेरिकन कामगारांना वाटलं कीं, हे हिंदुस्थानी कामगार आमच्या पोटावर पाय देत आहेत. त्यांनीं त्या कारखान्यावर हल्ला चढविला. पोलिसांना माहिती असूनही ते आले नाहींत. हिंदी कामगार खूप पिटले गेले व त्यांना जंगलांत नेऊन सोडण्यांत आलं. हें असलं कृत्य चार वर्षांनंतर पुन्हा एकदां घडलं. आतां हिंदी कामगार भिऊं लागले. डिसेंबरचा मोठा सण आला. त्या वेळेस स्टोरी यांच्या कारखान्यांत बाबा केसरसिंह—जो आज आमचा हा वीरसिंह तुरुंगांत आहे—काम करीत होता. तिथं त्यानं 'हिंदी सभा' नांवाची एक संस्था काढून संघटणा करायला सुरवात केली.

ओरिगिन परगण्यांत सोहनसिंग संघटनेच्या कामांत गढला होता व कॅलिफोर्नियांत बाबा ज्वालासिंह, बाबा विरवासिंह, बाबा रुद्र-

सिंह, करतारसिंह ( हुतात्मा १९१४ ) पं. जगतराम आणि पृथ्वीसिंह संघटना करण्याच्या विचारांत होते.

जानेवारी १९१३ मध्यें सोहनसिंह स्टोरियाहून पोर्टलँडला पोहोंचला. तिथं त्यानं पं. काशीरामशीं चर्चा केली. आणि अमेरिकेंतल्या साऱ्या हिंदवासीयांची संघटना करण्याची योजना आंखली.

**गदर पार्टीची स्थापना**:—१९१३ मार्चला स्टोरियांत साऱ्या अमेरिकेंतल्या हिंदी लोकांची सभा बोलावली गेली. त्यांत लाला हरदयाळ आणि भाई परमानन्द यांनींही भाग घेतला. हिंदी ॲसोसिएशन ऑफ अमेरिका या नांवानं एक संस्था कायम झाली. हिंदी, उर्दू, गुरुमुखी आणि मराठीं या भाषांत ' गदर 'नांवाचं एक वर्तमानपत्र सुरू झालं. हें नांव १८५७ च्या बंडाचं प्रतीक होतं. अजून ही संस्था अमेरिकेंतल्या हिंदवासियांपुरतीच मर्यादित होती. पण त्यांना माहीत होतं कीं या सर्वांच्या मुळाशीं एक गोष्ट आहे अन् तें म्हणजे भारताचं पारतंत्र्य! वर्तमानपत्रावरून पुढं या पार्टीचं नांव गदर पार्टी असं पडलं. बाबा सोहनसिंह अन् बाबा केसरसिंह संस्थेचे उपाध्यक्ष होते आणि लाला हरदयाळ मुख्याध्यक्ष होते.

भाई परमानंदाना असं वाटे कीं भारतीय स्वातंत्र्याकरितां हिंदुस्थानाहून विद्यार्थ्यांना बोलावून त्यांना इथं शिक्षण देऊन भारतांत क्रान्तिकार्याकरितां पाठवून द्यावं. **हरदयाळ मार्क्सिस्ट विचाराचे होते. बाबा सोहनसिंहही याच विचाराचा होता. अर्थात हिंदी कामगारांत क्रान्तीची जाणीव निर्माण करावी असा ठराव पास झाला.**

अमेरिकेंत पश्चिमेकडे सॅन् फ्रॅन्सिस्को हें एक मोठं शहर राजकीय चळवळींत अग्रगण्य समजलं जातं. साऱ्या जगांतील कामगारांचा

मेदिन इथंच साजरा झाला. गदर पार्टीची प्रमुख कचेरीही सॅन् फ्रॅन्सिस्कोला होती. लाला हरदयाळ ऑफिसचं काम पहात होते. एक नव्हेंबर १९१३ ला "गदर" पत्राचा पहिला अंक निघाला. लाला हरदयाळ प्रतिभाशाली लेखक होते. पण ते अतिशय उतावळे अन् चंचल स्वभावाचे होते. कोणत्या कामांत मन लावून काम करणं ही गोष्ट त्यांना अशक्य होती. सोहनसिंहानं एक दिवस त्यांना तंबी दिली: तुम्ही नेहमी म्हणतां हिंदुस्थानी लोक काम करीत नाहींत. पण तुम्हीसुद्धां त्यांच्यासारखंच वागत आहांत! पैशाचा प्रश्न त्यांनीं सोडवला. सोहनसिंह, करतारसिंह, विश्ववीरसिंह वगैरे सारख्यांनीं तन मन धन पार्टीला अर्पण केलं. त्यांनीं १५००० डॉलर म्हणजे ४५००० रुपये जमा केले.

सरदार सोहनसिंहानं कांहीं वर्षं घरीं पैसे पाठवले. त्यामुळं पांच सहा एकर शेती कर्जांतून सुटली होती. नंतर तर त्याला पार्टीपुढं कशाचीच शुद्ध राहिली नाहीं.

आतां पार्टीचं काम वाढलं होतं. हिंदी कामगारावर सोहनसिंहाचं वजन वाढलं होतं. जानेवारी १९१४ पासून सोहनसिंह आपला सारा वेळ पार्टीकरितां खर्च करूं लागला. या आधींही हिंदी लोकांत वर्तमानपत्र काढण्याची कल्पना अमलांत आणली गेली. पण दोन चार अंक निघतांच पुरेशा पैशाच्या अभावीं वर्तमानपत्र बंद पडलं. त्यामुळं लोकांवर त्याचा परिणाम फार वाईट होऊं लागला. पण आतां लोक हळू हळू पार्टीकडे येऊं लागले. 'गदर'चा अंक निघून तीन महिनेही होत नाहीं तोंच लोक मनमोकळेपणानं पैसे देऊं लागले. या सर्वांच्या मुळाशीं आदर्शवादी हिंदी कामगार होते. पार्टीचे मूलभूत नियमच असे होते कीं प्रत्येकानं विनामूल्य काम पार्टीकरितां केलं पाहिजे. तसंच वाटेल त्या वेळेस हरतऱ्हेच्या त्यागास

हजर राहिलं पाहिजे. कोणत्याही राष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांत सामील होणं पार्टीचं मुख्य कर्तव्य आहे. हे नियम बघून अमेरिकेंतल्या हिंदी कामगारांची दृष्टी त्या वेळेस किती व्यापक झाली होती हें दिसून येतं. त्यांना त्या मोकळ्या वातावरणांत चीन, आयर्लण्ड आणि इतर देशांतल्या क्रान्तिकारकांना भेटण्याची संधी मिळाली होती. पार्टीचा प्रत्येक सभासद १ डॉलर ( ३ रु. १ आ. ) महिना पार्टीला देत असे. हिंदी कामगार मोठ्या प्रमाणांत पार्टीचे सभासद होते. धर्मविरहित समानता अन् स्वातंत्र्याच्या मूलभूत तत्त्वावर हिंदुस्थानांतील लोकशाही स्थापन करणं हा तर पार्टीचा उद्देश होता.

पहिल्यांदा हिंदी कामगार संपफोडे या नावानं बदनाम झाले होते. ते त्या वेळेस इतके स्वार्थी होते कीं कामगारहिताकरितां पुकारलेल्या संपांत ते मालकांशीं फितूर होत असत आणि अमेरिकन कामगारांशीं उघडपणें शत्रुत्वानं वागत असत. पण गदर पार्टीची स्थापना होतांच हिंदी कामगारांत एकदम बदल झाला. ते आतां संपाविरुद्ध मालकांशीं फितूर होत नसत. सारे अमेरिकन कामगार यूनियनचे सभासद झाले. सहा महिन्यांच्या आंतच अमेरिकन कामगारही आपलें हिंदी कामगारांशीं बंधुत्वाचं नातं जोडूं लागले. कांहीं सहानुभूती दाखवूं लागले व कांहीं अमेरिकन कामगार तर चळवळ चालविण्याकरितां हिंदुस्थानांतही आले. नऊ महिन्यांच्या आंतच फिजी, शांघाय, मलाया वगैरे ठिकाणीं पार्टीच्या शाखा स्थापन झाल्या. लाला हरदयाळ तीन महिन्यांपेक्षां पार्टींत जास्त काम करूं शकले नाहींत. पण तरुण विद्यार्थी संतोषसिंह यानं सारा कामाचा बोजा आपल्यावर लादून घेतला. १९१४ मध्यें लाला हरदयाळनीं रशियाच्या झार राज्याच्या अत्याचाराविरुद्ध जळजळीत वाचा फोडली. झारच्या

सरकारनं ब्रिटिश सरकारपाशीं गाऱ्हाणं नेलं. ब्रिटिश सरकारनं अमेरिकन सरकारला सांगून त्याच्यावर खटला चालवला. पार्टीनं १००० डॉलरची जमानत देऊन त्याला यांतून सोडवलं. सुटतांच ते गुपचुप स्वित्सरलण्डला निघून गेले.

गदर पार्टींत दोन कार्यकारी मंडळं होतीं. वरिष्ठ कार्यसमितींत तीन सभासदांचं एक मंडळ स्थापन केलं होतं. त्यांत सोहनसिंह, संतोषसिंह व काशीराम हे होते. त्यांच्याकडे बरींचशीं कामं असत. दुसऱ्या देशांत महत्वाचे निरोप पाठवणं वगैरे कामं मंडळाच्या सुपूर्द होतीं. पार्टी मजबूत बनली. हिंदी कामगारांची संघटना जोरांत झाली. त्याचबरोबर दुसऱ्या देशांतल्या क्रान्तिकारक पार्टीशीं दाट संबंधही स्थापन करण्यांत आले. अमेरिकेतले हिंदी कामगार आतां क्रान्तीचे सैनिक बनले. त्यांच्यांत एक नवीन शक्ती संचारूं लागली.

आणि त्याच सुमारास १९१४ त गुरुदत्तसिंह कोमागातामारू हें जपानी जहाज ठेक्यानं घेऊन कॅनडांत येऊन पोहोंचला. त्याच वेळेस गदर पार्टीच्या खंबीरपणामुळंच अमेरिकन सरकारला मान झुकवावी लागली.

**हिंदुस्थानकडे**:—२३ जुलैला "कोमागातामारू" परत निघालं. त्या वेळेस बाबा सोहनसिंहावर जहाज संभाळण्याची जबाबदारी टाकण्यांत आली. सॅन् फ्रान्सिस्कोंत पार्टीकेन्द्र संभाळण्याचं काम बर्कतुल्ला, भगवानसिंह, संतोखसिंह आणि काशीराम यांच्या हवालीं करून बाबा सोहनसिंह हिंदुस्थानकडे परतला.

सोहनसिंहाचं जहाज अमेरिका आणि जपानच्या मधून येत असतांना त्याला महायुद्ध सुरू झाल्याची खबर मिळाली. त्याच वेळेस भारतीय सागरांत जर्मन लढाऊ जहाज 'एमडेन'ची फार भीती होती. बाबा सोहनसिंह तिथं जर्मन कौन्सिलांत गेला व आपलं जहाज

हिंदुस्थानांत सुरक्षितपणें जाऊ द्यावं अशी त्यानं त्याला विनंति केली. एडनपर्यंत तारा करून कोमागातामारू जहाजाला हानी पोहोचवूं नये असा हुकूम सोडला. शांघायला तो बऱ्याच देशभक्तांना अन् पार्टीच्या लोकांना भेटला. हॉंगकॉंगला पोहोंचल्यावर हे सर्व क्रांतिकारक तरुण 'नामसिंग' जहाज घेऊन हिंदुस्थानकडे निघाले. हें जहाज पेनींग-पर्यंत पोहोंचल्यानंतर हॉंगकॉंगच्या सी. आय्. डी. ला क्रान्तिकार-कांचा शोध लागला. मग मध्येंच तें जहाज बरेच दिवस थांबविण्यांत आलं. कलकत्त्याच्याजवळ कोमागातामारू जहाजांतल्या क्रान्तिकार-कांवर गोळीबारांचा वर्षाव सुरू झाला होता. आठवड्यानंतर 'नामसिंग' जहाज पुन्हा चालूं लागलं.

१९१४ ऑक्टोबरमध्यें सोहनसिंह आणि त्याचे साथी कल-कत्त्याला पोहोचले. पण तिथं पोहोंचतांच जहाजावर पहारा बसवि-ण्यांत आला, आणि आंतल्या लोकांना पकडण्यांत आलं.

**फांशीच्या तख्त्यावर**:—सोहनसिंहाला कलकत्त्याला अटक करून मुलतान तुरुंगांत पाठवलं. तिथं त्याचे बरेच सहकारी होते. पंजाबमध्यें १९१४ मध्यें जेव्हां क्रान्तीचा भडका उडाला, तेव्हां सरकारला याचं मर्म कुठंच समजलं नाहीं. पण आंतील कारस्थानाचा सरकारला जेव्हां शोध लागला तेव्हां तर सरकारची पांचावर धारण बसली. क्रान्तिकारक एकेक करून धरले गेले. सोहनसिंहाला **लाहोरच्या जेलमध्यें** आणलं. आणि तिथं ६४ क्रान्तिकारकांवर **लाहोर कटाचा** खटला चालवण्यांत आला. पण अपराधी शांत होते. त्यांचा या न्यायावर विश्वास नव्हता. म्हणून त्यांनीं सुटून जाण्याचा प्रयत्न केला नाहीं. सरकारी वकिलांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं अपराधी उत्तरंही देत नसत. लाहोर सेंट्रल जेलमध्यें २७ एप्रिल-पासून १३ आक्टोबरपर्यंत तीन न्यायाधिशाचं कोर्ट बसत असे. त्यांत

**पं. शिवनारायण शर्मीमही** होते. शेवटीं निर्णय घेण्यांतही आला. पांच अपराध्यांना सोडण्यांत आलं. कांहींना मोठमोठ्या शिक्षा मिळाल्या. **चोवीस जणांना फांशीची शिक्षा सुनावली गेली. त्यांत सोहनसिंहही होता. या साऱ्या फांसावर जाणाऱ्या कैद्यांत उत्साह पूर्णपणें भरला होता. हंसत हंसत ते मरणाची वाट पहात होते.** फांशी देण्याचा दिवस नक्की झाला होता. त्या दिवशीं सारे लोक अत्यंत आनंदी दिसत होते. यांतील कांहीं करतारसिंहासारख्या उमेदीच्या नवजवान तरुणावर सरकारही खूष होतं व त्यांनीं या गोष्टीला साफ फांटा दिला व सरकारच्या मोहजालापासून अलिप्त राहिले.

हा ओडवायरशाहीचा काळ होता. कांहीं प्रमुख नेत्यांनीं लॉर्ड हार्डिंगपर्यंत या गोष्टी नेल्या. व्हाइसरॉयनं खटल्याच्या कागदाची फेरतपासणी केली. आणि १७ जणांची फांशीची शिक्षा रद्द केली. त्यांत सोहनसिंह व बिखवासिंहही होते. पण करतारसिंहाला मातृभूमीकरितां बलिदान द्यावं लागलं.

**काळं पाणीः**—१९१५ तल्या डिसेंबर १० ला इतर मित्रांसह त्याची रवानगी काळ्या पाण्यावर झाली. त्या वेळेस काळं पाणी म्हणजे नरकांतल्या यमयातना होत्या. मारपीट, अपमान तर तिथं नित्य होत पण पंजाबांतले हे हुतात्मे देशभक्त निराळ्या पंचमहाभूताचे बनवले गेले होते. तिथं त्यांनीं पांच वर्षं प्राणाशीं झगडत घालवले. त्यांतील आठजण तिथंच मरणही पावले. सगळ्यांनीं अन्नसत्याग्रह करून बघितला होता. एकेकाला तिथं अलग ठेवण्यांत आलं होतं. एकाची दुसऱ्याला भेट होत नव्हती. आजकाल पांडित्य करणाऱ्या एका मोठ्या पुढाऱ्यानं त्या वेळेस खोट्या गोष्टी सांगून सोहनसिंहाला अन्नसत्याग्रह सोडायला लावला. पण त्याला ताबड-

तोंब कळलं कीं त्याचे दुसरे साथी अजूनही अन्नसत्याग्रही आहेत. तेव्हां बाबा सोहनसिंहाला इतकी लाज वाटली कीं अशा या विश्वासघातापेक्षां मरण बरं असं त्याला वाटायला लागलं. वीरांच्या या चढाओढीपुढें जेल अधिकाऱ्यांना त्यांचा अपमान करण्याची प्राज्ञा उरली नाहीं. मग त्यानां वर्तमानपत्रें मिळूं लागलीं. राजकारणाविरहित पुस्तकं मिळूं लागलीं. त्या वेळेस अंदमानांतल्या भीषण अत्याचाराच्या बातम्या वर्तमानपत्रांत येत होत्या. शेवटीं राजकीय कैद्यांना काळ्या पाण्याहून हिंदुस्थानांत आणणं सरकारला भाग पडलं. काळ्या पाण्याची शिक्षा भोगित असतांनाच सोहनसिंहाच्या दोन्ही आया मरण पावल्या.

बाबा सुलतान जेलमध्यें असतांना तो एक गदर पार्टीचा जबाबदार सभासद असल्यामुळं त्याला फितूर करण्याचा सरकारनं नेटाचा प्रयत्न केला. त्याला निरनिराळीं मोहजालं दाखवलीं. मित्रांना पाठवलं. आईला घेऊन आले. फांशीवर जाणाऱ्या आपल्या पुत्राला पाहून ती रडत म्हणूं लागली: 'कांहींही असो, मला वाटतं तुझा प्राण वांचावा.' बाबा निश्चयपूर्वक स्वरांत मातेला म्हणाला: 'माझा एकट्याचा प्राण वांचवण्याकरितां दुसऱ्यांना फांसावर चढवून विश्वासघात करूं?' आई निरुत्तर झाली. पोलिसांनीं हात टेकले. त्यांनीं बाबाला सांगितलं: 'बघ, एकीकडे श्रीमंती तुझ्या पायावर लोळण घेत आहे तर दुसरीकडे मृत्यु उभा आहे. कोणत्या एक गोष्टीला तयार हो!' बाबा म्हणाला: 'मी मरणाला तयार आहें. मला पुन्हां त्रास देऊं नका.'

१९२१ मध्यें त्याला मद्रासच्या तुरुंगांत आणून ठेवलं. याच सुमारास पृथ्वीसिंह आणि सरदार गुरुमुखसिंहानं आगगाडींतून उडी मारून पळण्याचा प्रयत्न केला तर दुसरीकडे उधमसिंह आणि इतर

दोघेजण फरारी झाले होते. नंतर त्याला येवरडा जेलांत पांच वर्षं ठेवलं. व शेवटीं लाहोरच्या सेंट्रल तुरुंगांत तो तीन वर्षं होता. तो रोज जर येऊन पोलीस ठाण्यावर हजिरी देईल तर त्याची सुटका होऊं शकेल असं सरकार म्हणत होतं. पण त्यानं सरकारच्या या शर्तीला नकार दिला. शेवटीं सरकार त्रासलं आणि त्यानं १९३० मध्यें या साठ वर्षांच्या म्हाताऱ्याची सुटका केली.

. **पुन्हां तीच धुंद**:—तुरुंगांतून सुटतांनासुद्धां बाबा सोहनसिंहाचे विचार राष्ट्रीय क्रांतिकारकासारखे होते. सोवियत रशियाच्या बाजूला त्याचे विचारप्रवाह झुकले होते. अमृतसरच्या लोकांनीं आपल्या या देशभक्ताचं मोठ्या प्रमाणांत स्वागत केलं. भाकनाला गेला. घरीं जायचा रस्ताच विसरला. २२ वर्षांनंतर साऱ्या गांवची रचनाच बदलली होती. वडिलार्जित घरांत फक्त एक खोली शिल्लक राहिली. आणि तिथं त्याची पत्नी विष्णूकौर येऊन चार अश्रू गाळीत असे.

त्या वेळेस तो साठ वर्षांचा म्हातारा होता. आणि आज ७३ व्या वर्षीं त्याची कंबरही वांकली आहे. पण म्हातारपण शांततेनं घालवण्याकरितां, तो तुरुंगांतून थोडाच सुटला होता? सुटल्यानंतरच्या १३ वर्षांतही त्यानं पुन्हां नऊ वर्षं तुरुंगांत घालवलीं. त्यांनीं हा सारा वेळ इतर देशभक्तांना तुरुंगांतून सोडवण्यांत आणि शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यांत घालवला. पांच वेळेला लहान मोठ्या शिक्षा भोगून मार्च १९४० मध्यें जेव्हां राहुल सांकृत्यायन पकडला गेला होता तेव्हां **बाबा सोहनसिंह भाकना पळासांत भरलेल्या अखिल भारतीय किसान सभेचा अध्यक्ष होता.**

जुलै १९४० मध्यें तो किसान सभेच्या कामानिमित्त गयेला

आला असतांना धरला गेला. त्याला राजनपूर, देवळी आणि गुजराथच्या इतर तुरुंगांत ठेवण्यांत आलं. १९३० मध्यें तुरुंगांतून सुटल्यानंतर राजकीय जागृतीचं काम करीत असतांनाही त्याचं अध्ययन चालू होतं. तो पूर्णपणें मार्क्सिस्ट बनला. **देवळी कँपांतल्या अभ्यासमंडळांत हा ७२ वर्षांचा म्हातारा इतक्या उत्साहानं भाग घेत असे कीं तरूणसुद्धां त्याच्यापुढें लाजत.**

१९१३ पासून बाबानं आपल्या शरिरांतला अणूरेणू देशाकरितां कामीं आणला. देश चिरंतन तरुण आहे. आणि म्हणूनच कि काय बाबाही स्वत:ला तरुण समजतो. १९४२ च्या जुलैंत बरेच कम्युनिस्ट सुटले पण बाबा गुरुमुखसिंह, बाबा उधमसिंह, बाबा केसरसिंह, बाबा रूढसिंह यानां तुरुगांत डांबून ठेवण्यांत आलं. शेवटीं मार्च १९४३ मध्यें भाकनाला भरणाऱ्या अखिल भारतीय किसान संमेलनाच्या वेळेस साऱ्या शेतकऱ्यांच्या मागणीपुढें नाइलाजानं पंजाब सरकारला बाबा सोहनसिंहाला तुरुंगांतून मुक्त करावं लागलं.

आणि पुन्हां तुरुंगांतून सुटल्यानंतरही तो त्याच धुंदींत आहे.

बाबानं आपला देह क्रांतीकरतां झिजवला आहे. या गदर पार्टीच्या शूर क्रांतिकारकानं पंजाबांत कितीतरी तरुणांना क्रान्तीच्या मार्गाकडे आणलं आहे. रणधीरसिंहानं 'गदर हिरोज' ही इंग्रजींत एक पुस्तिका लिहिली आहे. त्यांत बाबानं आपल्या गदर पार्टीच्या स्मृती व त्या अनुरोधानं १९१४ च्या क्रांतिकारक लोकांचा त्रोटक आढावा दिला आहे. गदर पार्टीच्या इतिहासावर प्रकाश पाडण्यांत नि बाबाचं व्यक्तित्व चटकन् खुलून दिसण्यांत या पुस्तिकेनं बरीच मदत केली आहे.

# अजय घोष : : ६

भावी भारताचा भव्य प्रासाद निर्माण करण्यांत त्यानं आपल्या सर्वस्वाची आहुती दिली. फांशी आणि बंदुकीच्या गोळीला जराही नं भिता यानं आपलं शीर तळहातावर ठेवून आपल्या मतानुसार राष्ट्राला स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला. कैदेंतल्या यमयातनेनं याच्या सोन्यासारख्या मौल्यवान शरिराची माती बनवून क्षय रोगासारख्या कीटकांचं तें आगर बनलं. तारुण्यांतलं जीवन हें सुखाकरतां असतं याचा याला क्षणमात्रही विचार शिवला नाहीं. जीवनाच्या अन्तिम क्षणापर्यंत याला एकच शुद्ध आहे, देशाला स्वतंत्र कसं केलं जाईल? यानं वीर भगतसिंहाच्या नेतृत्वाखालीं काम केलं आहे. त्याच्या-बरोबर उपवास काढून मृत्यूच्या समीप गेला आहे. लाहोर जेलच्या काळ्या कोठडींत बसून महिनेच्या महिने फांशीची वाट बघितली आहे. येवढंच नव्हे तर जेव्हां त्याच्या अध्ययनानं आणि मनानं दाखवलं कीं दहशतवाद—एक दोन सरकारी अधिकाऱ्यांवर गोळी चालवण्यानं किंवा बॉंब टाकल्यानं देशाचं स्वातंत्र्य जवळ येत नाहींच. तेव्हां त्यानं तात्काळ त्या मार्गाला सोडून दिलं. आणि मग वळून बघितलंदेखील नाहीं कीं आम्हीही जीवनाचा अमोल क्षण त्या मार्गावर अर्पण केला होता !

**अजयाचा जन्म २२ फेब्रुवारी १९०८ रोजीं संयुक्त प्रांताचं औद्योगिक केंद्र कानपूर इथं झाला. त्याचे वडील डॉ. शचींद्र घोष आपला वडील**

**मुलगा** अजय याच्या जन्माआधीं दहा वर्षं कलकत्ता सोडून कानपूरला येऊन राहिले होते. त्यांची डॉक्टरकी चांगली चालत होती. त्यांची रहाणी श्रीमंती असल्यामुळं पैसे शिल्लक रहात नसत. तरी पण कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ती आनंदांत असे. वडील **ब्राम्हणसमाजी होते.** मागच्या शतकापर्यंत ब्राह्मणसमाज सामाजिक क्रान्तीचा पाईक समजला जाई. **डॉ. शचींद्र घोष** उदार विचारांचे होते. बुद्धिवादावर त्यांचा विश्वास होता.

अजयची आई शशांकधरबाला ब्रह्मसमाजी पंथाचीच असल्या-मुळं बऱ्याचशा हिंदु रूढी पाळत नसे. बापाप्रमाणं आईनंही मुलांच्या उत्कर्षांत कधींही मोडता घातला नाहीं.

अजयला आपल्या बालपणाच्या एका गोष्टीची आठवण होते. **त्याचा वडील भाऊ सुधींद्र** याजवळ त्यानं एक फूटबॉल बघि-तला. नंतर दुसरी आठवण तो सहा वर्षांचा असतांना त्याच्या वडिलांनीं पहिल्या महायुद्धाची बातमी घरांत आणली होती, त्या वेळची आहे. लहानपणांत इतर मुलाप्रमाणं अजयलाही गोष्टी ऐक-ण्याचा नाद होता. आई मुलांना निरनिराळ्या गोष्टी ऐकवी. त्यांत बंगालमधल्या खेडेगांवांतल्या गोष्टीही असत. लहानपण बंगाली कुटुंबांत व वातावरणांत गेलं. म्हणून कानपूरला रहात असतांना देखील बंगाली भाषेशिवाय त्याला दुसरी भाषा येत नव्हती.

वयाच्या पांचव्या वर्षीं आईनं अजयला बंगाली भाषा शिकवा-यला सुरवात केली. तीन वर्षंपर्यंत तो घरींच शिकत होता. बंगाली भाषेबरोबर तो थोडीशी इंग्रजी भाषाही शिकला. त्या वेळेस **त्याचा मोठा भाऊ** बंगालमध्यें आपल्या मामाजवळ रहात असे. वडिलांना युद्धवार्ता वाचण्याचा अतिशय नाद होता. ते दररोज नवीन नवीन बातम्या वाचून दाखवीत. ऐकलेल्या गोष्टी

इकडे तिकडे करून आपल्या बालसहकाऱ्यांना तो ऐकवी. मग त्या खबरी ऐकून मोहल्यांतलीं मुलं इंग्रज व जर्मन शिपाई बनण्याचा अभिनय करीत. अजयही हें लक्ष लावून बघे नि ऐके. **अजयाचा बांधा उंच, सुदृढ अन् प्रकृति निकोप होती. तो मोहल्यांतल्या बालसेनेचा पुढारी होता. कुठंही मारामारीच्या धांदलींत तो सर्वांच्या पुढें असे.** गोष्टी ऐकतां ऐकतां प्रचलित राजकरणाबद्दल त्याला तिटकारा वाटूं लागला. आणि नतर नंतर तर सडकेवर शिपाई दिसलारे दिसला कीं, त्यांना तो दगड मारल्याशिवाय रहात नसे.

वयाच्या अकराव्या वर्षी आदर्श वंग विद्यालयांत त्याला दाखल करण्यांत आलं. त्याच विद्यालयांतून वयाच्या १४ व्या वर्षी आठवी ( मिड्ल् ) पास झाला. तो आपल्या वर्गांत नेहमीं पहिला येई. गणित आणि इतिहास हे त्याचे आवडते विषय होते. त्याचं कुटुंब सुशिक्षित व बंगाली साहित्याची अभिरुची बाळगणारं असल्या-मुळं त्यालाही बंगाली साहित्याची आवड उत्पन्न झाली. नऊ वर्षांचा असतांनाच ‘प्रवासी’ मासिक तो नियमानं वाची.

काकोरी खटल्यांत गोंवले गेलेले प्राध्यापक श्री. सुरेश भट्टाचार्य यांची त्याच्यावर बरीच छाप पडली. भट्टाचार्यांनीं एक ‘तरुण संघ’ स्थापन केला होता. अजय त्यांत होता. तरुण संघांत खेळ खेळले जात होते. रामकृष्ण मिशन मार्फत कॉलरा, प्लेगच्या वेळेस लोक-सेवेचं व्रत अंगिकारलं जाई. अजय त्यांच्या स्वयंसेवकांत सामील असे. विजयकुमारसिंह व बटुकेश्वर दत्त तरुण संघाचे उत्साही सभासद होते. तिथंच अजयची त्यांच्याशीं ओळख झाली. सुरेशबाबू प्रांताचे दहशतवादी पुढारी होते. **त्यांच्याजवळ**

**असल्यामुळं** दहशतवादी हुतात्म्यांचीं वीररसपूर्ण चरित्रें त्या संघाच्या तरुणांना ऐकायला मिळत.

१९२१ मध्यें देशबंधु दास पकडले गेले तेव्हां शाळेंत हरताळ करण्यांत अजय सर्वांच्या पुढें होता. तो असहकारतेच्या चळवळीशीं पूर्ण संमत होता. आणि त्यानं स्वयंसेवक बनण्याचा प्रयत्नही केला. पण वय लहान असल्यामुळं त्याला नकार मिळाला.

असहकाराच्या चळवळीनं एका वर्षाच्या आंत स्वराज्य मिळवून दिलं नाहीं. या बाबतींत निराशा व्यक्त करीत त्यांचा अहिंसेवरून विश्वास उडाला. सुरेशबाबू बंगालच्या हुतात्म्यांच्या वीर-कथा ऐकवीत, मायदेशाच्या भूमीवर स्वातंत्र्याकरितां खुदीराम बोसच्या आत्मबलिदानाच्या सजीव हकिगती सांगत. अजयला वाटे: धन्य ते वीर अन् धन्य त्यांचं जीवन! आयुष्यास भाग्य याहून दुसरं कोणतं असूं शकणार? **अजयसुद्धां बघतां बघतां कालिमातेच्या स्वरूपांत दहशतवाद्यांच्या दृष्टी-कोणांतून भारतमातेला बघूं लागला.** आणि रामकृष्ण मिशनच्या जयकाली—मातेच्या उत्सवांत स्वतः साऱ्या सहकाऱ्यांसह हजर राहूं लागला.

अजयचं घर म्हणजे त्यांचे मित्र बटुकेश्वर आणि विजय यांचं भेटण्याचं ठिकाण होतं. हळू हळू वडिलांच्या लक्षांत मुलाचे रागरंग येऊं लागले. ते मधून मधून त्याला समजाविण्याचा प्रयत्न करीत.

१९२२ मध्यें अजय सरकारी शाळेंत दाखल झाला. त्यानं दुसरी भाषा हिंदी घेतली. दोन वर्षं ( १९२४ पर्यंत ) तो तिथंच शिकला. त्याचं शालेय शिक्षणाकडे इतकं लक्ष नव्हतं. तो अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तकं मॅझिनी, गॅरीबॉल्डी, जोन द आर्क यांचीं चरित्रें त्याला

फार आवडलीं. सोवियत्‌चं नांव त्यानं ऐकलं होतं आणि भोंवतालच्या गरिबांचीं दुःखं बघून व्यथित अंतःकरणानं अजय म्हणत असेः आम्हाला जमिनदार आणि श्रीमंतांचं राज्य नको आहे. १९२४ मध्यें त्यानं लेनिनचा मृत्यु दिन पाळला, पण त्या वेळेस अजयला ‘ लेनिनचा मार्ग ’ कोणता आहे हें माहीत नव्हतं. रशियामधून लेनिननं गरिबीचं उच्चाटन केलं आहे इतकीच माहिती त्या वेळेस त्याला होती. याच वेळेस तो हिंदुस्थान रिपब्लिकन पार्टीचं काम करण्यांत गढून गेला होता.

साहित्यांत व विशेषकरून बंगाली साहित्यांत अजयला गोडी वाटत होती. अजय आणि विनय मिळून एक बंगाली हस्तलिखित ‘ निर्माल्य ’ काढीत असत. टागोराच्या कविता, द्विजेंद्रलालची नाटकें आणि शरदबाबूंच्या कादंबऱ्या त्याला फार आवडत. नवीन चंद्रसेनेचं ‘ पळाशीची लढाई ’ हें काव्य तो भाविक अंतःकरणानें गुणगुणत असे.

१९२४ सालीं अजय व विजय मॅट्रिक पास झाले पण बटूक नापास झाला आणि त्यानं शिक्षण सोडून दिलं.

घरांत देवाची पूजा अर्चा तर होत नव्हतीच. रशियांतल्या अनीश्वरवादाला ऐकून अजयचाही ईश्वर आणि धर्मावरून विश्वास ढासळूं लागला. अजून तो पूर्णपणें धर्मविरोधी झाला नव्हता पण त्या गोष्टींना फाजील महत्व देऊं नये असं मात्र त्याला वाटूं लागलं.

कॉलेजांतः——उच्च शिक्षण मिळवण्याकरितां अजय आणि विजय कानपूरच्या ख्राईस्ट चर्च कॉलेजांत दाखल झाले. भौतिकशास्त्र, रसायन आणि गणित घेऊन पुढचीं दोन वर्षं ( १९२४—२६ ) त्यानं तिथंच घालविलीं. बॉम्ब गोळे बनवण्यांत त्याला मदत मिळावी म्हणून तो रसायनशास्त्राचा फारच लक्षपूर्वक अभ्यास करूं लागला. अभ्यासा—

व्यतिरिक्त तो '**रेड बंगाल**' पत्रिका वांटीत असे. रिव्हॉल्वर चालविण्याचा अभ्यास करित शरिराला पुढच्या संकटांना तोंड देण्याकरितां सशक्त बनवण्यासाठीं व्यायाम करी आणि मनाला खंबीर बनवण्याकरितां खुदीराम, कन्हाईलाल आणि यतीन्द्र मुकर्जीची चरित्रें स्वतः वाचीं व अनुवाद करून लोकांत फैलावत असे. **कान-पूरच्या 'प्रताप'** मधले लेख त्याला उत्साही करीत. १९२५मध्ये एकदां भगतसिंग कानपूरला आला. अजयनं त्याच्याशीं खूप चर्चा विचारविनिमय केले. भगतसिंगानं **युध्दकालीन लाहोर कटांतल्या** वीरांच्या गोष्टी ऐकविल्या. तरुण करतारसिंहानं फांशीची शिक्षा देणाऱ्या जज्जाला धन्यवाद देत कशा तऱ्हेनं मृत्यूला हंसून कवटाळलं हेंही सांगितलं. याच वर्षीं **काकोरी कांडा-निमित्त** पकडापकडीला सुरवात झाली. सुरेश आणि राजकुमार ( विजयकुमारचा वडील भाऊ ) पकडले गेले. मध्यम वर्गीय लोक या गंभीर तरुणांच्या छायेलाही उभं राहायला घाबरूं लागले. आणि त्यांनीं त्यांच्याशीं असहकारतेचं धोरण ठेवलं. अजयचे वडील अजून अहिंसावादी व गांधीवादी कॉंग्रेसभक्त होते. पण आपल्या मुलाच्या स्वतंत्र विचारांत बाधा आणणं त्यांना उचित वाटत नसे. राष्ट्रीय लोकसेनेचा ( हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी ) बंगालच्या दहशतवादी पार्टीशीं संबंध होता. संयुक्तप्रांत आणि पंजाबमध्यें तिनं बरीच संघ-टना केली होती. काकोरी कांडांत कांहीं पकडल्या गेलेल्या लोकानंतर सारी जबाबदारी तरुणांवर येऊन पडली. भगतसिंग आणि दुसरे साथी तयार होतेच. पण आतां म्हणजे १९२५ मध्यें युवकांत समाज-वादाचा प्रचार झाला होता. त्यांनीं समाजवादाचें स्वरूप दाखविण्या-करितां व सेवेला ' जयकाली 'च्या आणि देवीदेवतेच्या फंदांतून सोड-विण्याकरितां सेनेचं नांव ' राष्ट्रीय सोशालीस्ट लोकशाही सेना' असं

ठेवलं. जुने पुढारी कारावास भोगीत होते. नाहीतर या सेनेच्या नव्या रूपांतराला विरोधच केला असता; पण **राष्ट्रीय लोकसेना जनतेच्या शक्तिऐवजीं केवळ पुढाऱ्यांच्या वजनावर क्रांति करूं पहात होती.** हो, पण एक निर्विवाद क्रांति सफळ झाल्यानंतर अखिल भारतभर ते साम्यवादी तंत्र अमलांत आणणार होते, हे मात्र नक्की !

१९२५ च्या कानपूर–राष्ट्रीय अधिवेशनांत अजय स्वयं-सेवक होता.

इंटर सायन्स पास झाल्यानंतर त्याला बी. एससी. ला जायचं होतं. पण कानपूरला त्या विषयाची व्यवस्था नव्हती. आणि प्रयाग-मध्यें व्यापक प्रमाणांत काम करायची मोकळीक मिळेल या उद्देशानं तो प्रयाग विद्यापीठांत दाखल झाला. विषय तेच होते. तो हॉस्टेल-मध्यें राहूं लागला. त्याला तिथं पुष्कळ स्वातंत्र्य होतं. त्याचे साथी त्याला तिथं येऊन भेटत. महिनेच्या महिने तो हॉस्टेलमधून गडप होत असे. मध्यंतरीं एक वर्ष आजारी पडल्यामुळं तो परीक्षेला बसूं शकला नाहीं. १९२९ मध्यें वयाच्या २१ व्या वर्षी तो बी. एससी. दुसऱ्या वर्गांत पास झाला. तो पहिल्या वर्गांत पास होण्याची तयारी तरी कुठं करीत होता ? सारा वेळ त्यानं दहशतवादी राज-कारणाला अर्पण केला होता. भगतसिंग व इतर साथीदारांमध्यें राजकीय डाके मारण्याच्या मोठमोठ्या योजना ठरविल्या जात. एक छापा प्रयाग कानपूर रस्त्याजवळ मारला गेला. चार माणसं सामील होतीं. तिघांजवळ पिस्तुलं व एकाजवळ नेपाळी शस्त्र होतं. एका बड्या अधिकाऱ्याची मोटार उडवली गेली. मोटार दूर सडकेवर ठेवण्यांत आली. हे चार वीर एका घरांत घुसले. तिजोरींत अवघे १०–१२ रुपये निघाले. गांववाल्यांनीं त्या चौघांना घेरलं. पण पिस्तुला-

पुढें लाठी काय कामास येणार ? पिस्तुलांतून बार निघतांच गांववाले भराभर पळून गेले. आणि हे चौघे कांहीं न मिळाल्यामुळं निराश मनानं मोटारींत बसून प्रयागांत पोहोचले. ही आहे १९२७ ची गोष्ट.

१९२७ मध्यें एक राजकीय डाका बनारसमध्यें पडला. तीन सायकलस्वार प्रयागहून निघाले व कांहीं लोक बनारसहून आले. सावकाराचा शोध काढणारा इसम धंदेवाईक चोर होता. ही सर्व टोळी दिवसाच एका संकेतस्थळीं भेटली. पांच सात मैलाच्या अंतरावर एका मारवाड्याच्या घरीं रात्रीं ११ ला पोहोचले. हांका मारतांच सावकारानं दार उघडलं. मारवाडी ओरडत होता. पण पिस्तुल रोखतांच चूप झाला. पैशापेक्षां जीव प्यारा. ट्रंकेंत १७०० रु. मिळाले. पांचशें रुपये त्या धंदेवाईक चोराला दिले. अशा तऱ्हेनं सावकार आणि श्रीमंत जातीचा तिटकारा वाटत असलेले आपआपल्या घरीं येऊन पोहोचले.

या सेनेनं कितीतरी ठिकाणीं डाके मारले. पण अजयला एक दोनदांच भाग घेण्याची संधी मिळाली. त्याच्यावर दुसरीं कितीतरी कामं अवलंबून होतीं. आणि त्यानं पुन्हां बॉम्बगोळे बनविण्याची विद्या शिकण्याकरितां तर सायन्स हा विषय घेतला होता. प्रयोगशाळेत तो स्फोटक रसायनांचा शोध लावीत होता.

गुप्तपोलिसांचे अधिकारी डी. एस्. पी. जितेन्द्र बॅनर्जी सेनेच्या पुढाऱ्यामागें हात धुवून लागले. १९२८ मध्यें बनारसला त्यांच्यावर कुणीतरी हल्ला केला पण ते जखमी होऊन त्यांतून वांचले.

ज्या वर्षीं अजय बी. एस्सी. च्या परीक्षेला बसला होता त्याच वर्षीं मार्च महिन्यांत दिल्लीच्या असेंब्लींत बॉम्बचा स्फोट झाला. गॅलरींत भगतसिंह व बटुकेश्वर हे दोन तरुण पकडले गेले. त्यांनीं बॉम्ब

फेकल्याचं कबूल केलं व म्हणाले: इथल्या सभासदांना मराण्याची आमची इच्छा नव्हती. तसं पाहिलं तर हें आम्ही करूं शकलों असतों पण आम्हाला त्यांना आणि जगाला हें दाखवून द्यायचं आहे कीं, या परावलंबित व नामर्द लोकांना आपल्या वास्तवतेची जाणिव व्हावी आणि जगानं ओळखावं कीं, स्वातंत्र्य साध्य करण्यांकरितां शस्त्रास्त्र हातांत धरणं अत्यंत आवश्यक आहे. पकडापकडी आणखीही झाली. मोतीहारीचा फणींद्रही धरला गेला. हंसराज होरानं आपली चामडी वांचवली. हे दोघेही सरकारचे साक्षीदार बनले. त्यांनीं सारं उघडकीस आणलं. पुष्कळांचीं नांवं दाखविलीं. मग अजय आणि दुसरे कितीतरी तरुण धरले गेले. **लाहोरमध्यें त्यांच्यावर कटाचा खटला चालवला गेला.** पोलिसांनीं अजयला एका किल्ल्यांत बंद करून ठेवलं. अपराध कबूल करायला लावण्याकरितां त्याची नाना तऱ्हेची जाचवणूक केली. कधीं त्याच्याकडून गोड बोलून गोष्ट काढून घेण्याचा प्रयत्न करीत तर कधीं म्हणत कीं, त्या अमक्या माणसानं तर सर्व कांहीं सांगितलं. कां विनाकारण जीव देतोस ? कधी कधीं आईबहिणीवरून किळसवाण्या शिव्या दिल्या जात. कधीं तीन तीन रात्रीं झोंप घेऊं देत नसत. डोळा लागतांच छडीच्या टोकांनीं अंगाला टोचण्या देऊन एकसारखं जागं ठेवण्याचा प्रयत्न केला जाई. या सर्व गोष्टी बाहेर पडल्या. वर्तमानपत्रांनीं कठोर निंदा केली. पोलिसांनीं आपलं काम करून टाकलं होतं. सात माणसं सरकारी साक्षीदार बनलीं होतीं. अजयसारख्याजवळून कांहीं माहिती मिळण्याची त्यांना आशा नव्हती. तरीही पुन्हां एकदां त्यांना पोलिसांच्या हवाली करण्याचा हुकूम मागितला पण न्यायाधिशानं त्यानां पोलिसांच्या हवालीं करण्यास विरोध केला. त्यांना तुरुंगांत ठेवण्याचा हुकूम मिळाला.

२३०४

वा० वा०

भगतसिंग आणि बटुकेश्वरला असेम्ब्लीच्या बॉम्ब प्रकरणांत **शिक्षा** सुनावली गेली. आतां त्यांच्यासह इतर माणसांवर मिळून लाहोर कटाचा खटला चालू झाला होता. पंधरा गुन्हेगारांपैकीं सात सरकारी साक्षीदार बनले होते. म्हणून सरकारला साऱ्या गोष्टींचा शोध लागला. आणि पुन्हां त्यांत अपराध कबूल करून घेण्याकरितां पोलिस सुपरिंटेंडंटाजवळ संगिनी होत्याच. पुढं काय होणार हें त्यांना समजून चुकलं होतं. राहिलेले आठही गुन्हेगार समाजवादी विचार-सरणीचे होते. पण समाजवाद अजून त्यांच्यांत पूर्णपणें मुरला नव्हता. नाहीं तर त्यांनीं या दहशतवादावर विश्वास कसा ठेवला असता ? हो. जेलमध्यें राहिल्यानंतर त्यांना हळू हळू समजू लागलं: **जोंपर्यन्त क्रान्तीचा संदेश जनतेपर्यन्त पोहोंचत नाहीं, जनता क्रान्तीला समजून घेत नाहीं, तोंपर्यंत क्रान्तीची विजयपताका लावणं शक्य नाहीं.**

त्यांना आतां पुरतं कळून चुकलं. ते आतां जगांचे फारच थोड्या दिवसांचे सोबती होते. त्यांचं शरीर ज्या पंचमहाभूतांपासून झालं त्याच पंचमहाभूतांत तें विलीन होणार होतं. अशा स्थितींत भगत-सिंगाच्या सुपीक डोक्यानं विचार केला: या जीवनाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. आजपर्यंत क्रान्तिकारक खटल्यांत इतक्या व्यापक प्रमाणांत राजकीय प्रचार झालेला नव्हता. भगतसिंग आणि त्याच्या इतर सहकाऱ्यांनीं हा प्रचार केला. याचं कारण असं: कांहीं वीरपुत्रांना घेऊन एकट्या दुकट्या सरकारी अधिकाऱ्यांना मार-ण्याच्या कार्याची **निष्फळता** त्यांनीं ओळखून घेतली होती. म्हणूनच ते आतां भावी क्रान्तींत साऱ्या जनतेचं साह्य मागत होते. त्यांनीं जे मोठमोठे अन्नसत्याग्रह केले त्यांत आतांपर्यंत राजकीय कैद्यांशीं तुरुंगाधिकाऱ्याची उर्मट वागणूक दूर व्हावी हेंही एक कारण

होतंच. त्याच वेळेस मिरतच्या कम्युनिस्टांवर इतिहासप्रसिद्ध कटाचा खटला होता. न्यायमंदिरापासून तो तुरुंगांच्या रहिवाशांत त्यांना आपली मतप्रणाली पटवितां आली असती तरी पण तो खटला सतत दोन वर्षं चालू होता. त्याचा परिणाम असा झाला कीं, भगतसिंह आणि त्याच्या क्रान्तीच्या धणधणाटांनीं भारतांतलं एकही गांव शिल्लक राहिलं नाहीं. बिहारमधल्या खेडेगांवांतले गाडीवानसुद्धां ' वेडा भगतसिंह ' हें गाणं गात असत.

अजय १३ जुलै पासून १५ सप्टेंबर १९२९ पर्यंत ६३ दिवस-पर्यंत अन्नसत्याग्रहांत बरोबरीनं भाग घेऊं लागला. या दरम्यान त्याच्या कांहीं साथीदारांनीं ५२ दिवसानंतर त्यांची कांहीं जल-विषयक गाऱ्हाणीं सरकारनं दूर करतांच अन्नसत्याग्रह मागं घेतला. यतीन्द्रदास जिवंत राहील अशी आशा नव्हती. तरी पण त्या बाल-वीराच्या मृत्यूची जबर किंमत देत त्याच्या मरणाच्या दुसऱ्या दिवशीं अजयनं अन्नसत्याग्रह सोडला. यतीनचं शव कलकत्त्यापासून लाहोरपर्यंत मोठ्या सन्मानानं पोहोंचवण्यांत आलं. कलकत्त्याच्या नागरिकांनीं आपल्या वीरपुत्राचं स्वागत केलं. तो दिवस भारतांतल्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील. भुकेनं हाडाचा सांपळा शिल्लक राहिलेल्या अजयला भेटण्याकरितां आईवडील लाहोरला गेले. सुपरिं-टेंडटनीं अन्नसत्याग्रह मागं घेण्याकरितां मुलाला उपदेश करा अशी पित्यापुढें शर्त ठेवली. पण त्या वीरपुत्राच्या वीर पित्यानं ही शर्त धुडकावून लावली. आईबापांनीं मुलाला जिवंत हाडाच्या सांपळ्याच्या रूपांत बघितलं. त्यांच्या हृदयांत हजारों सुया बोचल्याचं त्यांना दुःख झालं. पण आपल्या मुलाला थोडंसंही बोलून दुखवावंसं त्यांना वाटेना.

ऑक्टोबर १९३० मध्यें भगतसिंह, राजगुरु आणि सुखदेव यांना फांशीची शिक्षा झाली. अपील केल्यानंतरही तीच शिक्षा कायम राहिली. गांधीजींनींही लॉर्ड अर्विनला या वीरपुत्रांना प्राणदान देण्याची विनंती केली पण प्रयत्न निष्फळ ठरला. १९३१ च्या सुरवातीस त्यांना फांसावर चढाविण्यांत आलं. राजकारणांत भगतसिंहा-इतकं दुसरं कुणीही येवढ्या प्रमाणांत बलिदान केलं नव्हतं. अजयवर भगतसिंहाच्या वागणुकीचा जबरदस्त प्रभाव पडला होता. भगतसिंह आणि बटुकेश्वरला जेलमध्यें निराळं ठेवण्यांत येत असे. पण न्याया-लयांतली त्यांची भेटण्याची खोली पुढच्या योजना ठरवण्याचं स्थान होती. भगतसिंह मार्गदर्शनांत सर्वांच्या पुढें होता. तो सर्वांना चालना देणारा बुद्धिमान होता. **दहशतवादी राजकारणाची निरर्थकता अन् मार्क्सवादी प्रयोगांत जनतेला क्रान्तिप्रवण करण्याची कल्पना प्रथम त्यालाच सुचली.** १० जुलै १९२९ मध्यें पहिल्यांदा त्यांच्यापैकीं प्रत्येकाला एक एका शिपायाबरोबर हातकडी घालून उभं करण्यांत आलं. त्या वेळेस या क्रान्तिकारकांना हा प्रकार पाहून फार वाईट वाटलं. वकिलांनीं या प्रकरणाला हरकत केल्यास हें कृत्य कायद्याच्या विरुद्ध घडेल व प्रकरण न्यायाधिशापुढं मांडलं जाईल असा सल्ला दिला. पण भगतसिंहानं तिथं स्वतःच या गोष्टीचा निकाल लावून टाकला. दया आणि दातृत्वावर त्याचा विश्वास नव्हता. तो म्हणत होता: “ आम्ही एका वर्षाकरितां या जगांत आहोंत. **या वेळांत जितका प्रचार होऊं शकेल तितका करून घेऊं.**” बेडी लाव-ण्याच्या वेळेस प्रकरण अगदीं हातघाईवर आलं आणि नंतर निर्णय त्यांच्याचकडून लागला गेला.

अजयही खंबीर मनानं फांशीच्या हुकमाची वाट बघत होता. पण त्याच्याविरुद्ध कांहींही पुरावा नव्हता. आणि ऑक्टोबर १९३० मध्यें कोर्टानं त्याला सोडून दिलं. पण भगतसिंगाचे अनुवंशिक गुण त्याला त्याच्या वारशांत मिळाले होते. भगतसिंगाचा चेतनामय आनंदी चेहरा त्याला दिसत होता.

तुरुंगांतून सुटून तो कानपूरला आला. तो आतां दहशतवादाचा विरोधक बनला. पण मृत्यूला भिऊन नाहीं. तो मार्क्सवादावर विश्वास ठेवत होता.

तो दहशतवाद आणि डाकूगिरीच्या पूर्णपणें विरुद्ध होता. पण पोलिसांना समजवणार कोण? थोड्याच दिवसानंतर नोव्हेंबरमध्यें पुन्हां एकदां छापा मारण्याच्या गुन्ह्यावर पकडण्यांत आलं. पुरावा तर कांहींच नव्हता. पण त्याला उपाय नव्हता. सहा महिने तुरुंगाची हवा खाल्ली. अर्विन-गांधी समेट होतांच १९३१ मध्यें त्याला सोडण्यांत आलं.

कानपूरला आल्यानंतर अजय मजुरांत काम करूं लागला. **तिथं कामगार व शेतकरी पार्टी स्थापन केली.** आणि स्वतः त्या पार्टीचा सेक्रेटरी बनला. तरुणांत त्यांनं अभ्यासमंडळं स्थापन केलीं. दुसऱ्यांना शिकवीत व स्वतः शिकत त्यानं दीड वर्ष काढलं.

**१९३३ च्या सुरवातीला** तो पुन्हां पकडला गेला. त्याला **दीड वर्षाची शिक्षा मिळाली. एक वर्ष कानपूर अन् तीन महिने फैजाबाद तुरुंगांत काढले.**

**तुरुंगवासांत त्यानं मार्क्सवादाचं सखोल अध्ययन केलं.** त्या वेळेस कॉमरेड सरदेसाई कानपूर जेलमध्यें होते. त्यांची त्याला अभ्यासांत पुष्कळ मदत झाली. 'कॅपिटल' ग्रंथाचा प्रथम

खंड त्या दोघांनीं बरोबर वाचला. मिरतच्या राजकीय कैद्यांनीं कोर्टांत दिलेल्या भाषणांनीं अजयवर बराच परिणाम घडला. मार्क्स, एंजल्स, लेनिन, स्तालीन यांच्या ग्रंथांच्या गंभीर अध्ययनांत अजयची बुद्धि जास्त कुशाग्र बनली. आतां त्याला आपल्या मातृभूमीचे सारे प्रश्न, देशाला लागलेले रोग, त्यांची चिकित्सा, त्यांचं निदान, अगदीं उघड उघड कळूं लागलं. फैजाबाद तुरुंगांत त्याला कांहीं काँग्रेस कार्यकर्त्यांना भेटण्याचा योग आला. त्याच्या राजकीय शिक्षणा-करितां तो वर्ग घेऊं लागला. इथंच **रुस्तुमची** व त्याची प्रथम भेट झाली. या नव्या ' पाठशाळेशीं ' तो समरस होत आहे नाहीं तोंच त्याला पुन्हां फैजाबाद जेलमध्यें पाठविण्यांत आलं. तेथून **जुलै १९३६** मध्यें त्याला बंधमुक्त करण्यांत आलं.

तुरुंगांतून सुटल्यानंतरही पोलीस त्याच्या मागं होतेच. त्याच्या-वर नेहमीं देखरेख ठेवली जाई. कधीं रात्रींही त्याच्या घरांत शिरून त्याला बघण्यास मागेंपुढें पहात नसत. राजकारणांत भाग न घेण्याचा हुकूम दिला गेला. हुकूम मिळाल्याशिवाय बाहेरगावीं जाण्याची परवानगी नव्हती. पैसे मिळवण्याकरितां शाळेंत मास्तरकी करणं भाग पडलं. हळू हळू प्रकृती ढासळूं लागली. तांब्यासारखं शरीर वितळूं लागलं.

**नोव्हेंबर** १९३३ मध्यें पुरणचंद्र जोशी जेलमधून सुटून बाहेर आले. जोशींना अजय ओळखत होता. कानपूरच्या मजुरांत जोशींनीं कामाला सुरवात केली होती. त्यांची तीक्ष्ण दृष्टी अजय-सारख्या हुषार कार्यकर्त्याला ओळखण्यास कशी चुकणार ? **अजय सरळ पार्टींत आला.**

१९३५ पर्यंत अजयचं कार्यक्षेत्र संयुक्तप्रांत हें होतं. तो मजूर-वर्गांत काम पाही. तरुणांची राजकीय अभ्यासमंडळं चालवी-

प्रयाग, बनारस, लखनौला जाऊन तरुणांशीं वादविवाद करी. याच वेळेस अजयला रमेशसिंह, हर्षदेव मालवीय यांसारखे तरुण कार्यकर्ते मिळाले. त्यांच्याबरोबर तो जुलै १९३१ ते १९३४ डिसेंबरपर्यंत कानपूरच्या टिळक राष्ट्रीय विद्यालयांत ४० रुपयांवर नोकरी करीत होता. पैसे मिळवण्याची कांहीं तरी व्यवस्था तर पहावी लागणारच होती. ' स्पार्क ' ( ठिणगी ) नांवाचं एक मासिकही काढी. मुंबईहून एक नियतकालिक सुरू करण्याचं ठरलं. त्यानं ' स्पार्क ' बंद केलं. ' नॅशनल फ्रंट'च्या अंकांना ज्यांनीं बघितलं आहे त्यांना अजयची लेखणी किती प्रभावी आहे हें सांगायला नकोच. आणि ज्यांनीं अजयच्या अभ्यासमंडळांत येऊन भाग घेतला असेल त्यांना अजयच्या कुशाग्र बुद्धीची अन् विश्लेषणपद्धतीची निराळी साक्ष द्यायला नको.

जेलमधून दुसऱ्यांदा सुटल्यानंतर जोशींना अज्ञातवास स्वीकारावा लागला. पण बऱ्याच वेळेस त्यांनीं हिंदुस्थानभर पार्टीची कुशलतेनं संघटना केली. आतां तर अखिल हिंदुस्थानभर कार्यकर्त्यांची आवश्यकता होती. जोशींच्या दृष्टिपंथांत अजय येतांच अजयला संयुक्तप्रान्त सोडावा लागला. १९३६ च्या सुरवातीला पुन्हां अजयवर वॉरन्ट निघालं. पण १९३७ मध्यें कॉंग्रेस मंत्रिमंडळानं वॉरन्ट हटवीपर्यंत पोलिसानां अजयचा पत्ता लागला नाहीं. अजय आतां हिंदी कम्युनिस्ट पार्टीच्या पोलिट ब्यूरोचा ( मध्यवर्ती मंडळाचा ) सभासद होता. पार्टीच्या धोरणाला एक निश्चित वळण लावण्यांत त्यानं परिश्रम घेतले. अज्ञातवासाच्या स्थितींत कलकत्ता आणि इतर दुसऱ्या जागीं त्याला जावं लागत असे. त्या वेळेस **डॉ. अधिकारी विजापूर जेलमध्यें नजरबंद कैदी होते. त्यांना सोडवून आणण्याची जबाबदारी अजयवर सोंपवण्यांत**

**आली. अजय ख्रिश्चनसाहेबाच्या पोषाकांत विजापूरला पोहोंचला. आणि एक दिवस आपल्या संकेतस्थळीं अजय व डॉ. अधिकारी यांना पाहून जोशी आश्चर्यचकित झाले. विजापूरचे पोलीस तीन दिवस**पर्यंत दुसऱ्याच कोणत्या तरी अधिकाऱ्याचा चेहरा पाहून रिपोर्ट पाठवीत होते. एकदां अजय मुंबईत होता. पोलीसला शोध लागला. अजयला पुढच्या संकटाची कल्पना आली. पाऊस पडत होता. तो तसाच पळत सुटला. पोलिसांनीं त्याचा पाठलाग केला. पोलिसांनीं दुसऱ्या टॅक्सींतून त्याचा पाठलाग चालवला. अजय प्रसंगावधानी व हिकमता असल्यामुळं एका सिनेमा थिएटरांत घुसला. अन् लोकांच्या प्रचंड थव्यामध्ये मिसळून निसटून गेला. एकदां अजय आणि पी. सी. जोशी दोघेही कानपूरला होते. तेव्हां पोलिसांनीं २० ठिकाणीं छापे घातले. पण दोघेजण पोलीसांनीं जिथं पहिल्यांदा छापा घातला होता तिथं जाऊन दोन दिवसपर्यंत राहिले. अजयचं जीवन या अशा अनेक रम्य प्रयोगांनीं भरलेलं आहे.

अज्ञातवासांत अजयची प्रकृती जोरानं ढांसळूं लागली. आणि त्याचाच परिणाम आज अजयची प्रकृती फारच चिंताग्रस्त बनली आहे. १९४० मध्यें सर्व मुख्य कम्युनिस्टांवर पकड वॉरण्टें सुटलीं. मध्यवर्ती मंडळाच्या चार सभासदांपैकीं अजयला सरकार कसं विसरणार? पण तो वॉरण्ट निघण्याच्या आधींच गडप झाला होता. लपूनछपून राहून काम न करणं त्याला आणि त्याच्या पार्टीलाही मान्य नव्हतं. अजयला हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या ठिकाणीं जावं लागत होतं. त्याचं पांच फूट दहा इंच उंचीचं शरीर, त्याचे चकाकणारे निळसर डोळे व त्यांच्यावर चढलेल्या भुंवया बघणारावर

छाप मारल्याशिवाय रहात नाहींत. **जुलै १९४० मध्यें तो लखनौला पकडला गेला.**

त्याला पकडल्या वेळेपासूनच क्षयाच्या भावनेनं त्याच्यावर बराचसा अंमल बसवला होता. तापानं शरिरांत घर केलं होतं. मार्च १९४१ मध्यें देवळी कँपामधून त्याला काळयापाण्यावर पाठवण्यांत आलं. डॉक्टरांनीं प्रकृती तपासून त्याला क्षय झाल्याचं उघडपणें सांगितलं. तोंडांतून एकसारखे क्षयाचे बेडके गळत असल्यामुळं सहकारी काळजी करूं लागले. पण अशा स्थितींतही अजयसुद्धां विश्रांती ध्यायला कबूल नव्हता. राजबंद्यांनीं वाईट वागणुकीविरुद्ध अन्नसत्याग्रह सुरू केला. अजय यांत माघार कशी घेणार? तो तर त्याच्याबरोबरीच्या कैद्यांतला मोठा पुढारी होता. त्याची घडाडी नेहमीं सर्वांच्या पुढें!

कम्युनिस्टांचं धोरण बदललं होतं. तें फॉसिस्टांचा पराजय करण्याकरितां जिवाचं रान करण्यास उतावीळ झालं होत.

पण उद्दाम नोकरशाहीला त्याचं काय? तिनं अजयला मरणोन्मुख होईपर्यंत सोडण्याचं नाकारलं. जुलै १९४२ मध्यें अजयची दोनहीं फुप्फुसं निकामी ठरलीं गेल्यानंतर त्याला सोडण्यांत आलं. डॉक्टरांनीं त्याला मानसिक व शारिरिक क्लेश सोडून देण्याची विनंती केली. आणि डॉक्टरापेक्षांही कडक असा कम्युनिस्ट पार्टीचीही तशी आज्ञा होती. कारण त्याच्या जीवनमरणावर पार्टीची केवढी तरी मदार होती!

कितीतरी महिने अजय तळेगांव सॅनिटोरियममध्यें राहिला. पण तो रोगराज क्षयरोगाच्या भयंकार अवस्थेंत होता. डॉक्टरसुद्धां हताश झाले. मार्च १९४३ पासून तीन महिनेपर्यंत मद्रासच्या मदनापल्ली सॅनिटोरियममध्यें त्याला ठेवण्यांत आलं. डॉक्टरनं

सांगितलं कीं जखम भरत आली आहे. आतां त्याला कोणत्या-तरी थंड पण समशीतोष्ण जागेत ठेवलं पाहिजे. सात महिने त्यानं पूर्ण विश्रांती घेतली. त्याची प्रकृति सुधारत असलेली ऐकून त्याच्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसूं लागली. त्याचं दीड फुप्फुस सुधारलं आहे. अर्ध्या फुप्फुसावर इलाज करण्या-करितां अजय बरेच महिने काश्मिरला होता. हिंदुस्थान अजयला आपल्या हातचा जाऊं देणार नाहीं. पूर्वीच्या अनेक प्रसंगांप्रमाणं याही वेळेस अजयनं मृत्यूवर विजय मिळविला. आतां तो आपल्या सहकाऱ्यांत येऊन राहिला आहे. व नुकतीच त्यानं "भगतसिंह आणि त्यांचे कॉम्रेडस्' ही एक इंग्रजींत लिहिलेली पुस्तिका तुमच्यासमोर सादर केली आहे. यांतही त्यानं आपण समाजसत्ता-वादाकडे कसे आलों याचा ओझरता उल्लेख केला आहे. पुष्कळ दिवसांपासून त्याच्या लिखाणाला पारख्या झालेल्या व सत्य राजकारणापासून अलिप्त राहिलेल्या वाचकांना ही एक देणगी आहे.

अनुक्रम २८८३८
विभाग का वा
१०९२
३१/८/५९

# गोपेन्द्र चक्रवर्ती

**श्रावणभाद्रपदांतली** अंधारी रात्र आहे. एकसारखी पावसाची झिम् झिम् चालू आहे. मध्यरात्रींचा समय आहे. पावसाच्या थेंबांच्या आवाजापलीकडे सर्वत्र शांतता आहे. बनारस शहरांतल्या भव्य सडकेवरल्या एका दोन मजली इमारतींतली खिडकी एकदम उघडली गेली. अन् थपकन् आवाज होऊन कोणतीतरी वस्तु जमिनीवर पडली. पण पावसांतल्या आवाजांत हा आवाज कुणाला ऐकूं गेला नसावा. खालीं पडली ती निर्जीव वस्तु नव्हती. सजीव व्यक्ती होती. थोड्यांच वेळांत पांच फूट आठ इंच उंचीचा देह उभा राहिला. त्याच्या अंगावर धड कपडे नव्हते. कमरेभोवती गुढघ्यापर्यंत एक धोतर आणि दुसरं एक धोतर डोक्याला गुंडाळलेलं. तो सडकेच्या कडेकडेनं चालू लागला. वाटेंत चवाठ्यावरील रस्ता ओलांडणार तेवढ्यांत त्याला पोलीस कॉन्स्टेबलनं धरलंच शेवटीं. रात्रीचा कुणाला तरी मंत्राग्नी द्यायला चालला असेल हा ब्राह्मण. त्याला तुरुंगांत पाठवून फायदा काय? असा पोलिसानं विचार केला. त्याच्याजवळील तुटपुंज्या दक्षिणेंतून आपला खिसा गरम करून पोलीस चालता झाला. तो इसम वेगानं चालूं लागला. लंका पार करून त्यानं हिन्दू विश्वविद्यालयाचं सीमान्तर गाठलं. पण त्याचं हिन्दू विश्वविद्यालयाशीं कांहींच काम नव्हतं. तो वळणावरून गंगानदीकडे जाणाऱ्या रस्त्यानं चालूं लागला. श्रावणभाद्रपदांतली ती गंगा नदी कांठोकांठ तुडुंब भरून मैल न् मैल वहात होती.

अंधारांत तिचं विशाल पात्र दिसतही नव्हतं. पण तें त्याला परिचित होतं. एका क्षणाचाही विलंब न लावतां त्यानं पाण्यांत उडी घेतली. किती तरी वेळ तो पोहत होता. कांहीं वेळानं तर त्याचे हात पाणी मारतां मारतां थकून गेले. बराच वेळ त्यानं पाण्यावर पडून विश्रांती घेतली. आशानिराशेच्या तुमुल युद्धांत हातपाय हालवीत तो किती वेळानं किनाऱ्याला लागला याचं त्याला भानही राहिलं नाहीं. हो. पण त्यानंतर मात्र आपल्याजवळ एकच धोतर शिल्लक राहिलं आहे हें त्याच्या ध्यानांत आलं.

बनारसमधील श्रावणभाद्रपद महिन्याची ही गंगा नदींतली घटना २७ वर्षांपूर्वींची आहे. समुद्राकडून निघालेल्या ब्रह्मपुत्र नदीच्या सहस्रधारेपैकीं एका धारेच्या कांठीं **लोहाजंग** ( ढाका जिल्हा, विक्रमपूर ) नांवाचं एक मोठं गांव आहे. आतां सध्यां तो भाग पद्मा नदीच्या भागांत मोडला जातो. तिथंच हरीन्द्रनाथ चक्रवर्ती आणि त्याच्या सुकेशिनीदेवीला १८९९ मध्यें फाल्गुन (३) वद्य तृतीयेला पुत्रप्राप्ती झाली. त्याचंच नांव आहे गोपेन्द्रनाथ. त्या बालकानं लहाणपणापासूनच पद्मानदीच्या विशाल प्रवाहाला पाहिलं होतं. त्यांत पोहण्याच्या कामांतही तो तरबेज झाला होता. आणि म्हणूनच त्या रात्रीं त्यानं बेडरपणानं पाण्यांत उडी घेतली होती.

**गोपेन्द्रचे वडील हरीन्द्रनाथ चक्रवर्ती चाँदपूर-मध्यें वकिली करीत होते.** त्यांनीं आपल्या साऱ्या कुटुंबाला तिथंच बोलावून घेतलं होतं. गोपेनला अक्षरांची ओळख प्रथम तिथंच झाली. तरीपण हसनअली ज्युबिली हाय स्कूलमध्यें त्याला १९०७ मध्यें दाखल करण्यांत आलं. त्या वेळेस, स्वदेशी असहकरिता आणि नव्या युगाची चळवळ सुरू झाली होती. देशाच्या इतिहासांत विशेषतः बंगाल प्रांत एक नवचैतन्य उत्पन्न करित होता.

अजूनपर्यंत लोक इंग्रजांच्या मर्जीनुसार देशाच्या उद्धाराची मार्ग-प्रतीक्षा करीत ईश्वराची करुणा भाकीत होते. पण आतां नव्या बंगालनें जनतेसमोर देशाच्या स्वातंत्र्याचा एक नवीन मार्ग ठेवला होता. तो रस्ता होता. सर्वस्व पणास लावण्याचा, प्राणार्पण कर-ण्याचा; दांत ओठ खाण्याचा नव्हे तर मान ताठ करून भृकुट्या-वर करण्याचा. तरुणांत आत्मसमर्पणाची तर शर्यत लागली होती. आणि इंग्रजसरकारनें तर जनतेला निःशस्त्र अन् नामर्द करून टाकलं होतं. सरकारला वाटलं कीं अशातऱ्हेनं त्यांची स्वातंत्र्याची अभिलाषा आम्ही पूर्णपणें मातींत गाडून टाकीत आहो. पण बंगालच्या तरुणांनीं कोन्याकोपऱ्यांतून अशा तऱ्हेचीं सूत्रं हालवायला सुरवात केली कीं इंग्रजांची दे माय धरणी ठाय झाली.

या उसळत्या वातावरणाचा बाळ गोपेनवर बराच परिणाम झाला. त्याच्या शालेय सहकाऱ्यांत, मोहल्यांतल्या संगतींत असे कांहीं तरुण मित्र होते कीं त्यांच्या सान्निध येतांच त्याला समजलें, वकिली, कारकुनी, सरकारी नोकरी या सर्वांहूनही एक उच्चतम अशी गोष्ट जगांत आहे आणि तिच्याकरितां आयुष्य कारणी लावण्याची गरज आहे. हळू हळू गोपेनच्या(१९११)क्रान्ति शिक्षणांत(१) विवेकानंदांचा वेदांत, राजयोग, आणि देशभक्तिचं धार्मिक ज्ञान तसंच ( २ ) राष्ट्रीय भावना जागृत करण्याकरितां आणि त्याहीपेक्षां प्रचलित राजनीतीचा तिटकारा उत्पन्न होण्याकरितां अतिशयोक्तींनी भरलेला इतिहास आणि कथा सामील करुन घेण्यांत आल्या. याशिवाय तरुणांना अहिंसा आणि भीक मागून स्वातंत्र्य प्राप्त करण्याचा मार्ग पसंत नव्हता म्हणून ते शस्त्रें वापरणं शिकत. विशेषं करुन बंदूकीनं नेम मारण्याची विद्या हस्तगत करीत. शरीराला सुदृढ करण्याकरितां दंड बैठका मारण्याचा व्यायाम करीत व शरीर आणि मनाला खंबीर

करण्याकरितां जे जे कांहीं प्रयत्न करता येत होते ते ते प्रयत्न ते करीत असत. गोपेन्द्रनें हें सर्व शिक्षण हस्तगत केलें.

मागील महायुद्धाच्या दुसऱ्या वर्षांत म्हणजे १९१५ मध्यें गोपेन मॅट्रिकमध्यें होता. वडील आपल्या मुलाला समजावून समजावून थकले पण मुलावर त्याचा कांहींच परिणाम दिसेना. शेवटीं त्यांनीं मुलाला सुधारविण्याचा हाच योग्य मार्ग समजून त्याला कलकत्याच्या रिफॉर्मेटरी शाळेंत पाठवून दिलें. ही शाळा म्हणजे एक तऱ्हेचा तुरुंगच. पण एक खाजगी तुरुंग एवढंच. गोपेन्द्रवर पोलिसांची नजर होतीच आणि इथं गोपेन्द्रवर कडक नजर ठेवण्यांत त्यांना मोकळीक होती. मुलांना सुधारण्याकरितां जे जे उपाय अमलांत आणले जात त्यांत हातापायांत बेडी ठोकणंही सामिल होतं. गोपेन्द्र गुन्हेगार तर नव्हताच. त्याची सभ्य वागणूक अन् उच्च विचार यांनीं त्याच्या विद्यार्थी मित्रांवर त्याची छाप पडली. आणि त्यांनीं या शाळेंतून पळून जाण्यांत गोपेन्द्रला मदत केली. मोठ्या युक्तीनं खिडकीचे लोखंडी गज कापले. आणि रात्रीं पावसाची बाहेर रीघ लागली असतांना त्यानं तुरुंगांतून धूम ठोकली. कलकत्त्यांत भटकून त्यानं कितीतरी दिवस घालविले. पार्टींतल्या क्रान्तिकारक मित्रांची नि त्याची भेट होणं मुष्किल झालं होतं. आणि भेट झाली तरी त्यांनीं त्याला कांहिंच कामगिरी दिली नाहीं. पोलिसांनीं तर त्याचा पिच्छा पुरवला होता. कंटाळून शेवटीं त्याला घरचा मार्ग स्विकारावा लागला. पोलिसांना तो घरीं आल्याचा शोध लागतांच त्यांनीं घराला वेढा घातला. त्या वेळेस गोपेन्द्रचं वय सारं सोळा वर्षांचं होतं. पण आतांपर्यंत डोकं थंड ठेऊन काम कसं उरकावं हें तो अनुभवानं शिकला होता. तो पोलीसांच्या हातावर तुरी देऊन घरून पळून गेला. पोलिसांनी त्याला पकडण्याची शिकस्त

केली पण पसार होणं ही क्रान्तिकारकाच्या शिक्षणांतली एक प्रमुख कला होती. मग गोपेन्चा पाठलाग करणार तरी कोण आणि कसा? बरेच दिवस बंगालमध्यें लपतछपत काढून तो बिहारमध्यें येऊन पोहोंचला. बंगालप्रमाणें बिहारमध्यें पोलिसांचं जाळं अजून तयार झालं नव्हतं. बिहार प्रांतांतल्या कितीतरी शहरांत बंगालमधले बुद्धिजीवि लोक येऊन राहिले होते. म्हणूनच गया, बांकीपूर, भागलपूर, **छपरा पूर्णिया** वगैरे प्रमुख शहरांत १९१६ ते १९१७ पर्यंत लपतछपत त्यानं दिवस काढले. तरीही एकदां पोलिसांनीं पूर्णिया शहरांत तो असतांना घराला वेढा घातला होता पण तरुण गोपेन्द्र निसटला.

नंतर १९१७ मध्यें कुठे पोलिसांनीं भागलपूरला गोपेन्द्र यास पकडलें. पकडल्यानंतर कलकत्त्याच्या खास तुरुंगांत त्याला पोहोंचवण्यांत आलें. अनन्वित जांच देणारा हा खास तुरुंग होता. तेथील त्रासापासून बचाव करण्याकरितां मानवता माफी मागत होती! त्या अत्याचारांना जर प्रसिद्धि मिळाली तर जग तोंडात अंगठा घालून आश्चर्यच व्यक्त करील! ज्या तरुणांनीं देशाकरितां सर्वस्व अर्पण केलं आहे आणि अशा यमयातना सहन केल्या आहेत त्या तरुणांचं मन किती खंबीर असलं पाहिजे. मार हाण तर तिथं नित्याची साधी गोष्ट होती. पण ते यमदूत मार, मरण्याकरितां देत नव्हते. पण मरण्यापेक्षाहीं जास्त त्रास देवून तरुणांच्या मतप्रणालीला तोडण्याकरितां आणि आपल्या सहकाऱ्यांशीं विश्वासघात करून कार्यनाश करावयास ते उद्युक्त करीत असत. सतरा अठरा वर्षांच्या तरुण गोपेन्द्रालासुद्धा कांटेरी मार्गानें जावें लागलें. त्याला **साँसनगढच्या** 'दालदा हौस'मध्यें पाठवण्यांत आलं. तिथं त्याच्यावर तर आपत्तीच गुदरली. पण तितक्यांत एक क्रान्तिकारक तिथल्या जेलमधून पसार

झाला. अधिकारी घावरले आणि गोपेन्द्रला १९१८ मध्यें तिसऱ्या रेग्युलेशन नियमानुसार कैदी बनवून मेदिनीपूर जिल्ह्यांत पाठवण्यांत आलं.

मेदिनीपूर जेलमध्यें त्याला अगदीं साध्या कैद्याप्रमाणं अन्न आणि कपडा दिला जाई. आणि वागणूक तर अतीच कडक, शेवटीं राजकीय कैद्यांनीं आपली स्थिती सुधारून घेण्याकरितां अन्न-सत्याग्रहाचं शस्त्र उपसलं. असे अन्न सत्याग्रह वर्षभर चालूं लागले. आणि कांहीं प्रमाणांत राजकीय कैद्यांना कांहीं सवलती मिळाल्या. युद्धाच्यानंतर १९१८ चा सुमार होता. जेलमध्यें असताना त्याला अभ्यास करायला बराच अवसर मिळाला. बाकीच्या अभ्यासाबरोबर तो फ्रेंच भाषाही तिथेंच शिकला. **सरकारी अधिकारी दहशतवाद्यांना इतके घाबरूं लागले कीं जेलमधील सुपरिंटेंडेंट व मॅजिस्ट्रेट-सुद्धां त्यांच्यासमोर लेनिनची तारीफ करी व लेनिन-वादावरील पुस्तकें त्यांना वाचावयास देई. आणि तशाच तऱ्हेचीं आणखीही पुस्तकें त्यांना वाचावयास मिळतील अशी ते व्यवस्था करीत. कम्युनिझम म्हणजे वैयक्तिक नाश व दहशतवादाविरुद्ध आहे हे ते जाणतही असत पण त्यांचें असें मत होतें कीं निदान कशा का प्रकारानें होईना या तरुणांनी हा दहशतवादी मार्ग सोडून द्यावा. पण त्यांनीं दिलेलं औषध त्यांनाच मारक ठरलं.** अशा तऱ्हेनं तरुण दहशत-वादापासून बाजूला झाले पण त्याहीपेक्षां रशियाचं वातावरण हिंदुस्थानांत यावं या विचारांनीं तरुणांना बेचैन केलं. पण त्यांना हा विचार सुद्धां शिवला नाहीं कीं, या तरुण क्रान्तिकारकांत या नव्या क्रान्तीचीं बीजं रुजतील. मग तेच विचार जनतेंत फैलावून

त्या विचारांचं एक भयानक स्वरूप लौकरच आपल्यासमोर उभं राहील. कदाचित् त्यांनीं त्या वेळेस आपला बचाव आणि चटकन् यशः सिद्धी यांकडेच लक्ष दिलं असावं. १९२२ मध्यें सरकारच्या परवानगीनं गोपेन्द्र मॅट्रीक पास झाला.

नंतर सुधारणेच्या नवीन कालांत बऱ्याच कैद्यांना सोडण्यांत आलं त्यांतच गोपेन्द्रही होता. गांधीजींची असहकारतेची चळवळ सुरू झाली होती. नागपूरला देशबंधु दासांनीही गांधीजींच्या धोरणाचा स्वीकार केला. बंगालच्या दहशतवाद्यांनी एक वर्षाकरितां आपलं धोरण रद्द केलं. १९२०–२१ मध्यें यांनी धोरण तात्पुरतं रद्द करण्याचं एक आणखीही कारण होतं. दहशतवाद्यांना तर थारा नव्हताच. कांहीं उत्साही तरुणांचं देशभक्तीच्या भावना अविचारी व अनावर करून प्रचलित विदेशी राजवटीविरुद्ध हांकाटी पिटवायची हेंच एक धोरण होतं. आणि त्यांतही दहशतवादी बऱ्याचशा संस्थांत काम करूनही आपल्या दहशतवादी पार्टींत कांहीं बाबतींत एकत्र येत असत. पण बौद्धिक शक्तीचा व आत्मविश्वासाचा अभाव या कारणानं तुरुंगवासांतल्या एकांतिक जीवनानं त्यांना निराश बनवून टाकलं होतं. तरी त्यांत जे विद्वान होते त्यांनीं कॉंग्रेसच्या चळवळींत अहमहमिकेनें भाग घ्यायला सुरवांत केली.

या दहशतवादी कार्यकर्त्यांनीं राजकारणाचा अभ्यास केला होता व राजकीय कार्यक्रमावर ते गंभीर मनानं विचारही करीत असत. म्हणून गांधीवादी रहस्यांत त्यांचं मन लागत नसे. आतां कम्युनिझमचा प्रवाह वाहूं लागला व तो या दहशतवादी राजकारणालाही हळूं हळूं आपल्या बाजूनं वहात नेऊं लागला. पण या प्रवाहांत

सामील व्हायला बऱ्याचशा ज्ञानाची अन् ठराविक वेळेची गरज होती.

१९२०–२१ मध्यें गोपेन्द्रनें समाजवादावर बरचसं अध्ययन केलं. पण त्याला त्यावेळेस जास्त अशीं फेबियन समाजवाद्यांचीं किंवा साम्राज्यवाद्यांनीं लिहिलेलीं समाजवादावरचीं पुस्तकें वाचायला मिळालीं.

१९२२ मध्यें **बानर्जी** नुकतेच रशियाहून आले होते. रशिया आतांच कोठें चारीकडून घेरलेल्या साम्राज्यवाद्यांच्या प्रहारांतून अंतिम बलिदान देवून वांचला होता ! आणि पुनर्निर्मितीचा श्रीगणेशा करायला त्यानं आतां कोठे सुरवात केली होती. **रशियन लोकांच्या या नव्या जीवनांत जे जे बदल घडत होते आणि राष्ट्राला नव्या निर्मितीचे जे सोनेरी दिवस दिसत होते त्याची व कम्युनिझमची इत्थंभूत हकीगत बानर्जीकडून गोपेन्द्रला ऐकायला मिळाली.** दहशतवादी पार्टींतल्या कितितरी लोकांनी या दरम्यान समाजवादाचं अध्ययन केलं. येवढंच नव्हे तर कांहीही सफलता न मिळवून क्रान्ती करण्यापेक्षां समाजवादी क्रान्ती व कामगार शेतकऱ्याचं राज्य आणण्याचे प्रयत्न करण्यांतच त्यांना धन्यता वाटू लागली. १९२४ **मध्यें मास्कोला आंतर राष्ट्रीय कम्यूनिस्ट परिषद भरणार होती.**

**दहशतवाद्यांनी तिथें पाठविण्याकरितां गोपेन्द्रला आपला प्रतिनिधी निवडला. पण मास्कोला जाणं इतकं सोप नव्हतं.** पासपोर्ट मिळणं अशक्य होतं अन् जहाजांत बसून तसाच प्रवास करायचा म्हटलं तर तेथील अधिकाऱ्यांना चिरीमिरी ध्यायला याच्या जवळ तेवढी रक्कम कुठं होती ? पण गोपेन्द्रनं हिंदुस्थानचा किनारा सोडला. त्याच्याजवळ अवघे सव्वा-

तीन रुपये होते. गोपेन्द्र ( जानेवारी १९३३ ) मध्यें २३।२४ वर्षांचा तरुण होता. इतक्या दिवसांत त्याला आलेल्या कटु अनुभवांनी प्रसंगाला खंबीर मनानं तोंड देण्याकरितां त्याला हिंमत मिळाली होती. जहाजांत नाविकांची गरज होती. गोपेन्द्रनें एका मुसलमान मजुराच्या नांवानें जहाजावरील नोकरी मिळवली. ही नोकरी मिळवण्याकरितां त्याला त्याच्या वेतनांतून चिरीमिरी द्यावी लागत होती. जहाज होतं सामानानें भरलेलं. पगार होता दरमहा २५ रु. जहाज विजगापट्टम्, मद्रास, सीलोन, एडन आणि मग तेथून मोठमोठीं पोर्टसैयद मार्सेल्स वगैरे बंदरें घेत हाम्बुर्गला पोहोचलं. एकदां जहाजावर एक मौलवी आला होता. तेव्हां गोपेन्द्रनींसुद्धां आपल्या " इतर धर्मबांधवां "बरोबर त्याचं स्वागत केलं. येवढंच काय पण नित्याचीं नमाज पढण्यांत तो सर्वांच्या पुढें होता. व आपण स्वतः एक अज्ञानी अशिक्षीत मुसलमान आहों अशी बतावणी करण्यांत तर त्यानं कमालच केली. बिहारमध्यें लपून छपून राहून तिथल्या परिभाषेचं त्यांनीं त्यावेळेस जें ज्ञान करून घेतलं होतं, त्याचा बराच फायदा झाला. मार्सेल्स बंदरावरच त्यानं जहाजवरून पळून जाण्याचा विचार केला होता. व त्यानुसार कांहीं परिचित लोकांना त्यानं पत्रेंही पाठवलीं होती. पण पळून जाण्याची त्याला संधी मिळाली नाहीं. आतां हंबुर्गला पोहोचल्यावर तर त्यानं पळून जाण्याचा निश्चयच केला. अशा तऱ्हेनं सात आठ महिने खलाशाचं जीवन कंठून एक दिवस हाम्बुर्गमधून तो बेपत्ता झाला. त्यावेळेस जर्मनींत कम्युनिस्ट पक्ष इतका प्रबळ झाला नव्हता. पण बऱ्याच प्रमाणावर प्रगति करीत होता. गोपेन्द्रनं बोलतां बोलतां कुणाशीं ओळखी करून घेतल्या. बर्लीनला गेला. मग तेथून अंधारा अंधारांतून सुरुंग लावून आणि भुयारांतून लपत छपत तो

रशियाला कसा पोहोंचला हें सर्व लिहायला या लेखांत जागाही नाहीं. व तसं लिहिणं येथें उचितही दिसणार नाहीं. आठ तास तर तो सडकी घाण नि कुंद हवेच्या मोरींत बेशुद्धावस्थेंत पडून होता. पण कांहींही असो एक वर्षाच्या भयंकर हाल अपेष्टांशीं झगडत व सव्वातीन रुपये कलकत्त्याहून घेवून गेलेला गोपेन्द्र शेवटीं १९२३ मध्यें लेनिनग्राडला पोहोंचला तर खरा!

लेनिनग्राडला एक आठवडा राहून १९२४ मध्यें तो मास्कोला पोहोंचला व मग तिथचं त्यानं एक वर्षभर मुक्काम ठोकला. आंतर राष्ट्रीय परिषदेंत भारताचा प्रतिनिधी म्हणून बसण्याचं भाग्य गोपेन्द्रला लाभलं. नुकताच हिंदुस्थानाहून आलेला एकटाच प्रतिनिधी या नात्यान त्याला सोवियटचीं निरनिराळीं नगरें व संस्था बघायला मिळाल्या. सोवियत रशियांत त्यानं जें कांहीं बघितलं त्याचा त्याच्या मनावर भलताच पगडा बसला. आणि आंतरराष्ट्रीय परिषेदेच्या बाबतींत तर तो असं म्हणतो कीं कोणत्याही माणसावर या परिषदेचा एवढा परिणाम होतो कीं तो बुजणं अगदीं अशक्य आहे. काळ्यासांवळ्या, गोऱ्या आणि पिवळ्या रंगाचे निरनिराळ्या जातींचे निरनिराळ्या देशाचे हे सर्व लोक इथं या एका ठिकाणीं बसून अन् बंधुभावानं निगडित होवून गंभीर मनानं नवं जग बांधण्याची खलबतं करीत असतांना पाहून कुणाला आनंद वाटणार नाहीं! आणि त्याचा परिणाम मनावर झाल्याखेरीज कसा राहील? कुणी-तरी त्याला तिथं अध्ययन करण्याची एक लांबलचक योजना सादर केली. पण पुस्तकीविद्या व विश्वविद्यालयीन शिक्षणाच्या गोष्टी त्यांनीं बऱ्याच प्रमाणांवर शिकून घेतल्या होत्या व आपला अमूल्य वेळ अध्ययनाच्या बाबतींत घालवायला आतां तो तयार नव्हता.

त्याला आपल्या देशांत जावून काम करण्याची इच्छा अनावर झाली.

एक वर्षानंतर त्यानं हिंदुस्थानला येण्याकरितां पाय उचलले. तिथं त्याला मार्सेल्सच जहाज धरायला पाहिजे होतं. पण पासपोर्टशिवाय यायचं संकट उभं होतंच. येतांना हाम्बुर्ग, बर्लीन वगैरेच्या त्याच्या प्रवासांतील गोष्टी सोडून देत आहे. परत येतांना फक्त एकाच संकटाचा जातां जातां उल्लेख करावासा वाटतो. ब्राझील ( स्विल्झर्लँड ) मध्यें त्याला एका ठिकाणावरून जायचं होतं पण त्याजागीं जर्मनी, फ्रान्स व स्वित्झरलंड या तीनही राष्ट्रांच्या सीमा येवून भिडल्या आहेत. त्या १९२५ च्या काळांत क्रान्तीच्या वावटळीनं साऱ्या युरोपमध्यें देशोदेशींची सत्ता पागल बनून गेली होती. सुदैवानं गोपेन्द्र स्वित्झरलँडच्या पोलिसांच्या ताब्यांत सांपडला म्हणून बरं, नाहींतर फ्रेन्च किंवा जर्मन पोलिसांनीं त्याला सीमा पार करतांना बघितलं असतं तर तो बंदूकीनं ठार मारला गेला असता व हिंदुस्थानांत गोपेन्द्रचा शोधही लागला नसता. गोपेन्द्रानें बंगाली भाषेशिवाय आपल्याला दुसरी भाषाच बोलतां येत नाहीं असा बहाणा केला. त्याच्या अवतारावरून व भाषेवरून तो खलाशी आहे असा पोलिसांचा समज झाला. व तो तेथून सुटला. स्वित्झरलंडपासून पॅरिसला तो असाच छपत येत मार्सेल्सला येऊन पोहोंचला. जहाजावरून खलाशी असेच पळून जात असतात व नित्य नवी भरती होत असते. आणि आतां तर गोपेन्द्रनें खलाशी बनण्याची कलाही अवगत करून घेतली होती. त्याला एका जहाजावर खलाशाची नोकरी मिळाली. मग असाच आगींत कोळसा टाकीत व नमाज पढत पढत तो (ऑगस्ट १९२६ )मध्यें मुंबईस येवून पोहोंचला.

त्यानं बरोबर आणलेल्या एका पत्रामुळें तो पोलिसांच्या हातीं सांपडला. पोलिसांनीं त्याला मार दिला. पण गोपेन्द्रानें यांहीपेक्षां भयंकर यातना काढल्या होत्या. पोलिसांनी मग असा विचार केला कीं, त्याला मोकळा सोडून द्यावं व त्याच्यामागें कांहीं सी. आय. डी. पोलिस टेहळणीवर पाठवून द्यावे म्हणजे दुसऱ्या कांहीं लोकांचा शोध तरी लागेल. गोपेन्द्रनी मुंबई सोडली आणि तशी त्याच्या छायेमागें सहा पोलीसही चालूं लागले. अलाहाबादला तो पंडीत जवाहरलाल नेहरूंना येवून भेटला. पोलिसांच्या पाठलागाचं वर्णन ऐकून जवाहरलालजींनी त्याला पोलिसांच्या स्वाधीन होण्याचा सल्ला दिला. पण गोपेन्द्र या गंभीर सल्लेचा मोकळ्या मनानें अव-मान करीत आहे असं बघून पंडितजी त्याच्यावर चिडून बोलूं लागले. त्यावर गोपेन्द्रनेंही त्यांना कटू सत्य ऐकविलं. आणि मग या प्रकरणानंतर बनारसला त्या रात्रीं धर्मशाळेंतल्या खिडकींतून त्या पावसांत तो कसा निसटून गेला याचं वर्णन या लेखाच्या सुरवातीला केलंच आहे.

गंगानदी पार करून त्यानं गुराख्याचं सोंग घेतलं. त्याचा सावळा रंग आणि तारुण्यांतल धष्ट पुष्ट शरीर या सोंगाला साजेसंच होतं. तो कितितरी दिवस पायीं चालत होता. मग आगगाडीनं आग्रा शहरीं आला. त्याला समजलं कीं आपल्या पाळतीवर चिटपांखरुसुद्धां नाहीं. तेव्हा तो बंगालला गेला. दहशतवादी पुढाऱ्यांबरोबर तो सात दिवस एकसारखी चर्चा करींत होता. शेवटीं दहशतवादी पुढाऱ्यांनी त्याच्या समाजवादी कार्यक्रमाचा ' जय काली 'ला थोडीशीं जागा ठेवूनच स्वीकार केला.

कोणती पार्टी असो वा समाज असो, नित्य पुढें पुढें धावत असतांना तीं नदीच्या प्रवाहाप्रमाणें नवीन नवीनं कण जमा करीत असतात. इकडे

दहशतवादी पार्टीतसुद्धां कांहीं नवीन आलेले तरूण आपल्या जुन्या पुढाऱ्या प्रमाणें हातांत शस्त्र घेवून 'जय काली'च्या नावानं अविचार करण्यास तयार नव्हते. त्यांनाहीं समजूं लागलं कीं भोंवतालच्या वातावरणानुसार आम्हालाही बदल करण्याची आवश्यकता आहे. या नवीन तरूणांना गोपेन्द्रानं शिस्तशीर राजकीय शिक्षण देण्याची व्यवस्था केली. अभ्यासमंडळ स्थापन झालं. त्या साऱ्या प्रश्नांवर खुल्या मनानं, विशालदृष्टीनं चर्चा होऊं लागली. व नंतर हळू हळूं मार्क्सवादाची प्रमेयें पुढें ठेवण्यांत आलीं. पण आंतल्या पुढारी-दादांना या गोष्टींची कल्पना आली. त्यांनी आतांपर्यंत तर तरुणांचे व पुढाऱ्यांचे संबंध गुरुशिष्याप्रमाणें कायम केले होते! गोपेंद्रच्या या नव्या वागणुकीनं आपली इमारत खच्ची होत आहे असा त्यांचा समज झाला, यांत नवल नाहीं. त्यांनीं गोपेन्द्रकडून तें काम काढून घेतलं व त्याजागीं एक विश्वासपात्र दादा जो सर-कारी सी. आय. डी. गोटांतही विश्वासू समजला जात असे; असा पुढारी राजकीय शिक्षणाकरितां देण्यांत आला!

पण तरुणांना एक नवं क्षितिज दिसूं लागलं होतं व पुन्हां मागें हटायला तर ते तयार नव्हते. गोपेन्द्र, मुजफ्फर आणि इतर सहकाऱ्यांनी प्रगतिचा मार्ग बांधायला सुरवात केली. १९२५ मध्यें **नादियांत** एक मोठी किसान परिषद भरली. मुजफ्फरच्या सह-काऱ्यांनीं व दहशतवाद्यांतल्या कांहीं मार्क्सवादी तरुणांनीं मिळून कामगार, शेतकरी पार्टी स्थापन केली.

अजूनही गोपेन्द्र लपून छपूनच राहात होता व कार्य करीत होता. पोलिस सारखे त्याचा पाठलाग करीत होते. एकदां ढाक्याच्या पोलिसांना त्याच्या घराचा शोध लागला व त्यांनीं घराला वेढा घातला. गोपेन्द्रानं वीस फूट उंचीच्या छतावरून उडी मारली. या

उत्साहांत आपला पाय तुटेल कीं राहील याचंही त्याला भान राहिलं नाहीं. बरं झालं पाय तुटला नाहीं; आणि शेजारच्या घराला कुलूप लागलेलं नसतं तर येव्हांना त्यानें पोलिसांच्या हातावर केव्हांच तुरी दिली असती. पण शेवटीं अशा प्रकारें त्याच्या एका जुन्या दोस्ताच्या मदतीनं १९२६ मध्यें पोलिसांनीं त्याला धरण्यांत यश मिळवलं. त्याला पुष्कळ आडवे उभे प्रश्न विचारले गेले. पोलिसांना समजलं कीं त्याचा आतां दहशतवादावर मुळींच विश्वास राहिलेला दिसत नाहीं. त्याचा 'सोशालिझम' वर विश्वास आहे. गोपेन्द्रनी त्यांना आपण सोशालिस्ट असल्याचं सांगितलं. पोलिसांत कांहीं मूर्ख लोक अजूनही 'सोशालिस्ट'चा अर्थ सोशलवर्कर किंवा सामाजिक कार्यकर्ता असा करीत होते. शेवटीं पोलिसांनी त्याचा पिच्छा सोडला. आणि त्याला मोकळेपणानं काम करायला अवसर मिळाला.

आतां मार्क्सवादी विद्यार्थ्यांनी कामगारांत काम करायला सुरवात केली होती. १९२८ मध्यें गोपेन्द्रनी शिकवलेल्या तत्त्वांची कितितरी राजकीय कार्यकर्त्यांना सत्यता पटली होती. बंकिम मुकर्जी व सोमनाथ लाहिरी त्यावेळेस **कॉंग्रेसचे काम करीत होते. पण कॉंग्रेसचें राजकरण मजूरांपर्यंत जात नाहीं असा अनुभव त्यांना आला. ते भाटपाड्याच्या मजुरांत काम करणाऱ्या गोपेन्द्रकडे आले. गोपेन्द्रानं आपल्या न्याय, विद्वता, त्याग, साहस आदि गुणांनीं कितीतरी लोकांना व कार्यकर्त्यांना जवळ ओढलें. पुष्कळशा तरुणांना त्यानं मार्ग दाखवले.**

१९२८ मध्यें कलकत्ता अधिवेशनांत कॉंग्रेच्या मंडपांत कामगारांनी निदर्शन भरवलं होतं. १९१९ मध्यें कलकत्याहून जाणाऱ्या

सायमन कमिशनचा तीव्र निषेध करण्याकरितां बंगालच्या वतीनें गोपेन्द्र आपल्या सहकाऱ्यांसह पुढें आला. २४ तासांच्या आंत मजुरांनीं येवढ्या विराट स्वरूपांत निषेधाचं प्रदर्शन केलं कीं, ती घटना कलकत्त्याच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील. या निदर्शनांत ४ लाख लोकांनीं भाग घेतला असं 'स्टेट्समस' पत्रानंही कबूल केल होतं. हिंदुस्थानांतील इतर ठिकाणीं कामगारांनीं प्रचंड संप करून राष्ट्रीय चळवळींतील आपल्या अग्रेसर पुढारी-पणाची जाणीव एकंदर जनतेला दिली. दहशतवाद्यांपासून बंगालची नोकरशाही अगदीं त्रासून गेली होती. तेव्हां कम्युनिझम हीं काय चीज आहे हें त्यांना माहीतही नव्हतं. ते लेनिनची प्रशंसा करीत व त्याची पुस्तकें या लोकांना बळजबरीनें वाचायला देत. पण आतां कम्युनिस्टांनीं मोठमोठ्या संपांची संघटीत तयारी केली. आणि कामगारांची स्थिती जितकी जितकी ते सुधारत चालले तितका तितका त्यांच्यात आत्मविश्वास वाढत चालला होता. **बिलुआ** मधला रेल्वे कामगारांचा प्रचंड संप, **खरगपूरचा** संप. तसंच बंगालच्या बाहेर मुंबईतले लहान मोठे संप या सर्वांनीं भांडवलदार आणि त्यांचें भाईबंद नोकरशाही यांचे डोळे खाडकन् उघडविले. स्टेटसमन् अन् टाईम्सनी कम्युनिस्टांवर बंधन घालण्याकरितां लेख लिहिले. जूट धंद्याच्या ब्रिटिश भांडवलदारांचें आसन हालूं लागले. दिल्ली आणि लंडनमध्यें या प्रश्नावर खडाजंगी होऊं लागली. शेवटीं त्यांनीं मार्क्सवाद्यांना पकडून चळवळीचा कांटा काढायला सुरुवात केली. त्यावेळेस कॉम्रेड गोपेन्द्र आणि त्याचे साथी जूट कामगारांच्या तक्रारी दूर झाल्या नाहींत असं पाहून संपाची तयारी करूं लागले होते. तोंच १९ मार्च १९२९ मध्यें कॉ. गोपेन्द्र, कॉ. मुजफ्फर अहमद आणि इतर कम्युनिस्टांना कलकत्त्यांत धरण्यांत आलं. १९२९ पासून

अनुक्रम २८८३८
विभाग आ-८
क्रमांक १०९२

१९३३ पर्यंत त्यांच्यावर मिरत कटाचा खटला चालला होता. हायकोर्टच्या फेर-तपासणींत त्याला कांहीं प्रमाणांत शिक्षा कमी करण्यांत आली. साडेपांच वर्ष तुरुंगवास भोगल्यानंतर १९३४ ऑगस्टमध्ये तो बाहेर आला. इथं त्याला विनासायासच पांच वर्ष अभ्यास करण्याची संधी मिळाली होती. या साडेपांच वर्षांच्या अभ्यास-क्रमांत सरकारनं जेवण्याराहण्याची व्यवस्था केलीच पण त्यांहीपेक्षां हिंदुस्थानांतल्या प्रांताप्रांतातले विद्वान मार्क्सीस्टच नव्हे तर इंग्लंड-मधले हुषार कम्युनिस्ट एकत्र आणून तुरुंगांत त्यांनीं कम्युनिजमची जिवंत लायब्ररीच तयार केली होती. जेलमधून बाहेर आल्यावर कॉ. गोपेन्द्र बंगालच्या कामगार संघटनेत गढून गेला. आतां त्याच्या सहकाऱ्यांची संख्या वाढली होती. अन् कार्यक्षेत्रही विशाल झालं होतं. पण कम्युनिस्टपार्टी बेकायदा समजली जात होती.

या वेळेस पार्टीनं असं ठरविलं कीं प्रत्येक पुढाऱ्यानं अगदीं खालच्या कमिटींत जावून काम करावं, शिस्त पाळावी व आपल्या तरूण सहकाऱ्यांना उदाहरण घालून द्यावं. कॉ. गोपेन्द्रनीही १९३९–४० मध्यें प्रांतीय पार्टी सहायक मंत्रीची जागा सोडून. खालच्या स्थानिक लहान कमिट्यांत संघटणेचं काम ते करूं लागले. या सर्व गोष्टींचा पार्टीवर योग्य तोच परि-णाम झाला.

साम्राज्यशाही युद्ध सुरूं होतांच सरकारनं कम्युनिस्टांच्या विरुद्ध वॉरण्ट जारी केलें. १९११ पासून यांत तरबेज झालेला गोपेन्द्र चक्रवर्ती या वावटळींत सांपडल्याशिवाय कसा राहिला असतां ! पण आतां त्याला धरणं कांहीं सोपी गोष्ट नव्हती. सर्व गोष्टी समजत असतानांही पोलीसांची त्याला पकडायची हिंमत होत नव्हती.

ग्रा. क्र. २३७४
वि.



मागचे हे दहशतवादी कांहीं त्यावेळसारखे मूठभर तरूणांचे नेते नव्हते. सारे शेतकरी कामकरी, सारं गांव न् गांव त्यांच्याबरोबर सहमत होतें. त्यांना कळलं कीं यांनीं कामगारांच्या हितासाठीं लढण्याकरितां धार्मिक भावना अन देशी विदेशी भेदभावांना तिलांजली दिली आहे. कधीं कधीं तर गांवांत एकीकडे पोलीस गोपेन्द्र आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा पाठलाग करीत असत तर ते दुसऱ्या बाजूनें पसार होत. पोलिसला याचा अंदाज लागत असे. पण गांववाल्यांची सहानुभूती नि मदत त्यांना अनुकुल असल्यामुळें पोलीस आपल्या प्राणखर्ची घालायला भिऊं लागले.

१ मे १९४१ ला पार्टीच्या कांहीं कामानिमित्त गोपेन्द्र मैमनसिंगला गेला व तिथंच पकडला गेला. ९ जून १९४२ पर्यंत त्याला जेलमध्यें स्थानबद्ध करण्यांत आलं.

१९११ मध्यें वयाच्या अकराव्या वर्षी त्याच्या नाजूक हृदयांत देशप्रेमाची आग लागली. ती आग वयाच्या वाढत्या प्रमाणांत कमी होत गेली नाहीं. तर ती जास्त प्रखर होत गेली. वेळ येतांच त्याला आपला आदर्श स्पष्ट अन् तेजस्वी दिसूं लागला, त्या आदर्शाच्या रोखानं धांव घेण्यांत त्याला यश मिळालं कारण त्याचा आत्मविश्वास दांडगा होता. त्यानं आपल्या आयुष्याची एक घटिका किंवा एक क्षणही वाया दवडला नाही.

त्याची आई चाँदपूरच्या स्त्रीसंघटणेची उत्साही पुढारी होती. १९४१ मध्यें ती मरण पावली. त्या माउलींत प्रचण्ड उत्साह होता. तोच प्रचंण्ड उत्साह गोपेन्द्रला वारसा हक्कानं मिळाला आहे. आणि धैर्यानं अविरत कार्यांत गढून जाणं कळकळ अन् समाजतेनं वागणं हे गुण त्यानं आ[illegible] आहेत.

२२३८
वा. वी.
१०१२
नों. दि. ३१/३/५
IRBK-0102374